म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. 9322

# अमृतधारा

REFBK-0012409

३७३७७
अ.शा.
६२/१९९८

अनुक्रम ...३/८/३/०/८...... दि: ..................
क्रमांक ........................ नों दि: २२/१२/५८

॥ श्री ॥

# अमृत धारा

★

यदुनाथ थत्ते

72808

किंमत दोन रुपये

REFBK-0012409

ग्रंथप्रकाशक
व
ग्रंथविक्रेते

श्रीराम प्रकाशन

ठाकुरद्वार
मुंबई
क्रमांक २

@ यदुनाथ थत्ते
पहिली आवृत्ति
श्रीगणेश जयंति
माघ शु. ४ शके १८८३
८ – २ – १९६२

प्रकाशक
सौ. शैलजा भावे
श्रीराम प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २

मुद्रक
हरि महादेव गद्रे
जनवाणी मुद्रणालय
४५ बुधवार, पुणे २.

# अनुक्रम


| | |
|---|---|
| कामगारांचे कैवारी | १ |
| राजरत्न | ९ |
| लोकसभापति | १६ |
| मानवधर्माचे बुद्धिनिष्ठ उपासक | २३ |
| सुजन शासक | ३० |
| वेदाचे खंदे प्रचारक | ३८ |
| भलाईचे वतनदार | ४५ |
| आचार्य | ५५ |
| विधायक पुरुषार्थी | ६५ |
| मायेची पाखर | ७४ |
| साम्ययोगी | ८३ |

# भाग्यविधाता अणु

अणु हा आधुनिक जगाचा
भाग्यनियंता बनला आहे.

या पुस्तकांत
अणु कल्पनेपासून तो अणु-ऊर्जेपर्यंत
एक धावतें चित्र रेखाटलें आहे.

लोकसुलभ विज्ञान
या दृष्टीनें पुस्तक मोलाचें आहे.

अणूची अशी ओळख प्रत्येकाला
असलीच पाहिजे.

**किंमत रु. १–७५**

अनुक्रम ३५३५५ ........ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि: २-३-२२-५४

# कामगारांचे कैवारी

भारतीय कामगार संघटनेचे एक जनक श्री. ना. म. जोशी ता. ३० मे १९५५ रोजीं अचानक निधन पावले. न्या. रानडे म्हणत ‘काम करतां करतां मला मृत्यू यावा.’ न्या. रानडे, गोखले यांची तेजस्वी, अभ्यासु आणि निःस्वार्थी परंपरा चालविणारे खरे ‘लिबरल’ ना. म. जोशी, यांना अगदीं असाच मृत्यू आला! त्यांचे नित्याचे कार्यक्रम व्यवस्थितपणें चालू होते. वयाची पंचाहत्तरी ओलांडली तरी मनाची उमेद कोठल्याहि प्रकारें कमी झालेली नव्हती. निःस्पृहपणें कामगार कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचें अविरतपणें चार तपें चाललेलें त्यांचें कार्य अखेरच्या दिवशींहि चालूच होतें.

श्री. ना. म. जोशी म्हणजे भारतीय कामगार चळवळीचे चालतें बोलतें प्रतीक होतें. कामगार चळवळींतील ते सर्वात वृद्ध पण न थकलेले खंदे अग्रणी होते. कामगार संघटनांवर त्यांचा नैतिक वचक असे. त्यांच्यासारखा अजातशत्रु इसम कामगार संघटनांत तरी दुर्मिळ !

कोकणांत जोसपण चालविणाऱ्या एका घराण्यांत त्यांचा जन्म झाला. घरची साधारण गरिबीच होती. त्यांत ऐन तारुण्यांत वडील वारल्यामुळें मुलांवर आपत्तिच कोसळली ! वडील बंधु पुण्याला शिकत होते. विद्याभ्यासांत ते फार हुशार. तेव्हां त्याच्या शिक्षणाला खंड पडूं नये म्हणून नानासाहेबांनीं

वडिलांचें जोसपण अंगावर घेतलें ! परंतु धाकट्या भावावर अशा प्रकारें लहान वयांत कुटुंबपोषणाचा भार पडून त्यानें शिक्षणाला मुकावें, हें वडील भावास बरें वाटेना. म्हणून त्यानें धाकट्या भावाला पुण्याला बोलावून घेतलें व त्याचें शिक्षण सुरू झालें ! रानडे-गोखल्यांचा नेमस्तपणा आणि आगरकरांची समाज-सुधारणेची निःस्पृह कळकळ यांचें त्यांना तेव्हांपासून आकर्षण वाटे. कोठलेंहि अतिरेकी वा एकांतिक धोरण त्यांना कधीं मानवलें नाहीं.

ना. गोखले व आगरकर यांनीं जी अपरिग्रही जीवनाची आणि निःस्पृह व निष्काम सेवेची परंपरा घालून दिली, त्या मार्गानें आपण जावें, असें त्यांनीं ठरविलें होतें. त्यामुळें पदवी पदरांत पडतांच नगर जिल्ह्यांतील दुष्काळी कामावर ' किचन–सुपरिंटेंडेंट 'ची जागा त्यांनीं पत्करली. अनाथ–अपंग आणि बायका व मुलें यांना जेवण पुरविण्याचें काम त्यांच्याकडे होतें. त्या प्रसंगांत त्यांचें हृदय करुणेनें ओसंडूं लागे. ह्या आपल्या दीन-दरिद्री बांधवांची स्थिति कशी सुधारेल ही एकच चिंता त्यांना असे. ते म्हणत असत, " मी पुस्तकें वाचून नाहीं समाजवादी बनलों. दुष्काळी कामावर मला जें दर्शन झालें त्यानें मला समाजवादी बनविलें. " गरिबांची ही जी कणव त्यांच्या मनांत निर्माण झाली तीच त्यांच्याकडून अखंड कार्य करवून घेत होती.

उगवत्या पिढीला योग्य संस्कार देऊन तयार केलें तर उद्यांच्या हिंदुस्थानचें रंगरूप पालटेल अशा कल्पनेनें ते शाळाखात्यांत दाखल झाले. घटकाभर भूमि सस्यश्यामल केल्याच्या समाधानापेक्षां शंभर वर्षांनीं फळें येणारें आक्रोडाचें झाड लावण्याची त्यांची तयारी असल्यानेंच त्यांनीं शिक्षण-क्षेत्रांत पदार्पण केलें ! समाजांतील अनेक दुःखें हीं केवळ अज्ञानामुळें आणि परंपरागत रूढींमुळें निर्माण झालीं आहेत; तेव्हां त्या अज्ञान व रूढींवर आपला सर्व रोख असला पाहिजे, असें त्यांचें धोरण होतें. शाळाखात्यांत त्यांनीं आठ वर्षें काम केलें. मुलांना शिकविण्याचें खरें स्थळ भिंतीआडचे वर्ग नसून खेळाचें मैदान हें आहे, हें ध्यानांत घेऊन ते विद्यार्थ्यांना मैदानी खेळांची गोडी लागावी म्हणून झटत असत. मुलांमध्यें नवजीवनाचा ते

संचार करीत आहेत, याची जाणीव शाळाखात्यांतील लोकांना होऊं लागली होती. १९०८ सालीं टिळकांना काळ्या पाण्याची सजा झाल्यानंतर त्यांच्या शाळेंतल्या विद्यार्थ्यांनीं जो असंतोष व्यक्त केला त्याचा ठपका नानासाहेबां-वरच अप्रत्यक्षपणें आला.

याच सुमारास ना. गोखल्यांनीं 'भारत-सेवक-समाज' स्थापण्याची कल्पना देशासमोर मांडली. "आज आपल्या देशाला जर कशाची गरज असेल तर कार्यकर्त्यांच्या महान् संघटनेची. ऐक्याचा व देशभक्तीचा दैवी संदेश देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पसरविणें हें आपलें काम, असें त्यांना वाटलें पाहिजे. मातृभूमीबद्दलचें आपलें प्रेम इतकें तीव्र, इतकें भावोत्कट असलें पाहिजे कीं मातृभूमीसाठीं मोठ्यांत मोठा त्याग केला तरी त्याचें ओझें वाटतां कामा नये. ज्यांचें जीवन देशभक्तीनें ओसंडत आहे, निष्ठेनें कांठोकांठ भरलें आहे, त्यागाच्या उदात्त भावनेनें भारलेलें आहे, त्यांच्या आटोक्यांत न येणारी एकहि वस्तु या जगांत नाहीं. आपल्या सेवेला अशा पुत्रांनीं पुढें यावें, मोठ्या सख्येनें पुढें यावें, हीच भारतमातेची इच्छा आहे." असें त्यांनीं तरुणांना आवाहन केलें. गोखल्यांची ही हांक नानासाहेबांनीं ऐकली, आणि नोकरी सोडून भारत-सेवक-समाजांत ते दाखल झाले.

भारत-सेवक-समाजांत दाखल होतांच त्यांनीं सेवासदनाच्या देवधरांच्या हातांखालीं काम करण्यास आरंभ केला. देवधरांच्या मिशनरी वृत्तीची त्यांच्यावर फार छाप पडली. 'ज्ञानप्रकाश'मध्यें त्यांना काम असेच, शिवाय खेडोंपाडीं सहकारी चळवळीचें लोण पोंचविण्यासाठीं ते देवधरांच्या बरोबरीनें फिरूं लागले. पुढें 'ज्ञानप्रकाश'ची मुंबई आवृत्ति निघण्याचें ठरलें तेव्हां ते मुंबईत आले. 'मुंबई वैभव' छापखान्यांतून 'कामगार समाचार' नांवाचें वृत्तपत्र चालविण्यांत येई. त्याच्याशीं त्यांचा संबंध आला आणि त्यामुळें मजुरांशींहि संबंध आला.

लालबाग–परळ भागांत त्यांनीं मजुरांत काम सुरूं केलें. भांडवलशाही समाजांत कामगारांवर जी दास्यवृत्ति लादण्यांत येते ती नाहींशी करावी, व

त्याच बरोबर शिक्षणानें त्यांना अधिक चांगलें जीवन जगण्याला पात्र करावें, यासाठीं प्रयत्न करण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यासाठीं सोशल सर्व्हिस लीगची त्यांनीं स्थापना केली. प्रथम होलिकासंमेलनें सुरू करून बीभत्स प्रकार बंद करून त्याऐवजीं कामगारांतले कलागुण प्रकट होण्यासाठीं विविध कार्यक्रम त्यांनीं आंखले. वेगवेगळ्या कारखान्यांतून कामगारांसाठीं समाज शिक्षण देणारे कार्यक्रम त्यांनीं सुरू केले. मालक यांच्या योजनांना बराच पाठिंबा देत. त्याच्या बदल्यांत त्यांनीं कामगारांऐवजीं मालकांकडे झुकतें राहावें अशी मालकांची अपेक्षा असे. परंतु ना. म. जोशी यांच्या निःस्पृह बाण्यामुळें तें जमेना. तेव्हां 'कामगार–मालक झगड्यांत तुम्ही निदान न्यायाधीश व्हा' अशी गळ त्यांना घालण्यांत आली. तेव्हां त्यांनीं स्वच्छच बजावलें, "मी कामगारांचा वकील आहें, मी न्यायाधीश कसा होऊं?" त्यावेळीं कामगारांचें जें वकीलपत्र त्यांनीं घेतलें तें आमरण ! कामगारांची सामाजिक जाणीव वाढविण्याच्या प्रयत्नाबरोबरच त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठीं त्यांनीं औद्योगिक शिक्षण देणाऱ्या योजनाहि चालविल्या. आपल्या देशांत लोकशाही पद्धतीची राज्यव्यवस्था होणार, याबद्दल त्यांना खात्री होती. पण जनता सुबुद्ध झाल्याशिवाय लोकशाही सार्थ होत नाहीं, म्हणून शैक्षणिक संस्थांची तीव्र गरज असते, हें त्यांनीं ओळखलें होतें.

पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली. राष्ट्रसंघाचा एक विभाग म्हणून जागतिक मजूर संघ–इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन (आय्. एल. ओ.) काम करूं लागला. भारताला ह्या संघावर प्रतिनिधित्व मिळालें होतें. आणि पहिल्याच प्रतिनिधि मंडळांत कामगार प्रतिनिधि म्हणून ना. म. जोशी यांचा समावेश झाला ! ह्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाचे ते एक तपावर सभासद होते. आय्. एल. ओ. मध्यें त्यांनीं फार महत्त्वाची कामगिरी बजावली. आशियायी राष्ट्रांतील मजुरांची बाजू तेथें ते सतत पुढें मांडीत. जागतिक शांतता निर्माण व्हायची असेल तर देशोदेशींच्या मजुरांच्या जीवनमानांत जी विषमता आहे ती नाहींशी झाली पाहिजे; त्यासाठीं मागें पडलेलीं आशियायी राष्ट्रें बरोबरीला येईपर्यंत त्यांना खास अधिकार मिळाले

पाहिजेत, असें ते प्रतिपादन करीत. आशियायी वसाहतींच्या नांवावर पाश्चात्य साम्राज्यवादी आपलेच हस्तक प्रतिनिधि म्हणून पाठवीत. ना. म. जोशी याचा निर्भीडपणें समाचार घेत. सर्व आशियायी राष्ट्रांतील मजुरांची गाऱ्हाणीं जागतिक वेशीवर ते टांगत. आशियायी राष्ट्रांची विभागीय परिषद भरवावी, कारण आशियायी कामगारांची परिस्थिति वेगळी आहे, आणि दुःखें तीव्र आहेत, असें प्रतिपादन करून दुसऱ्या महायुद्धानंतर आपली मागणी त्यांनीं यशस्वी झालेली पाहिली. दिल्लीला भरलेल्या आशियायी मजूर परिषदेचें अध्यक्षपदहि त्यांनीं भूषविलें. पाश्चात्य मजुरांच्या जीवनदर्जाशीं तुल्य दर्जा आशियायी मजुरांना मिळाल्याशिवाय स्पर्धा नाहींशी होणार नाहीं व शांतता धोक्यांत राहील, हें आवर्जून ते सांगत. आशियायी मजुरांचें जीवनमान त्या पातळीवर आणण्यासाठीं कालमर्यादित योजना आंखण्याची गरज आहे, असें आय्. एल्. ओ. च्या कार्यकर्त्यांच्या मनावर ठसविण्याचा त्यांचा अखंड प्रयत्न होता.

आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेसाठीं ब्रिटिश राष्ट्रकुलांतील देशांतून जे प्रतिनिधि येत त्यांच्या परिषदाहि पुढें होऊं लागल्या. ह्या परिषदांच्या वेळीं भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न ते सतत उपस्थित करीत असत. स्वायत्त राष्ट्रांच्या बरोबरीनें हिंदुस्थानला आंतरराष्ट्रीय संस्थांत प्रतिनिधित्व मिळालें असल्यानें हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याची ब्रिटिशांची नैतिक जबाबदारी आहे, असें तें सांगत. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनमध्यें मजूर सरकार अधिकारावर येतांच मंत्रिपदीं असलेल्या आपल्या मित्रांना त्यांनीं सल्ला दिला कीं, हुजूर पक्षाप्रमाणें मुस्लीम लीगचा बागुलबुवा करून स्वतःची बदनामी करून घेऊं नका. तुम्ही निर्वाणीची भाषा उच्चारल्याखेरीज भारतांतील पक्षोपपक्षांचे मतभेद व्यावहारिक पातळीवर देखील कधीं मिटणार नाहींत. हिंदुस्थान सोडण्याचा तुमचा निश्चय आहे, याची प्रचीति भारतीय नेत्यांना आणून दिली कीं वाटाघाटींचें गुऱ्हाळ थांबून निर्णायक अवस्थेला सर्व प्रकरण येईल. मजूर पक्षीयांना त्यांचा हा सल्ला पटला. आणि माउंटबॅटन यांनीं निर्वाणीची भाषा उच्चारतांच हिंदी स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा झाला.

मध्यवर्ती असेंब्लींत सरकार-नियुक्त सभासद म्हणून दोन तपांवर त्यांनीं कामगिरी बजावली. सामान्यतः इतर सरकार-नियुक्त सभासदांचें धोरण लाचारीचें असे तर ना. म. जोशी यांनीं आपला निःस्पृह बाणा कधींच सोडला नाहीं. सरकारविरुद्ध मत नोंदविण्याला प्रसंगी ते कचरले नाहींत, एवढेंच नव्हे तर कॉंग्रेसतर्फे दिवाण चमणलाल यांच्यासारखे मजूर कार्यकर्ते निवडून येऊं लागले तेव्हां या उभयतांची संयुक्त आघाडीच असे. १९२१ सालीं देशी उद्योगधंद्यांना संरक्षण मिळण्यासाठीं भांडवलदारांच्या प्रतिनिधींनीं आग्रह धरला, त्यावेळीं ना. म. जोशी यांनीं त्यांना सरळ रोकडा सवाल टाकला कीं त्या संरक्षणामुळें जो फायदा मिळणार आहे त्याचा कितवा हिस्सा मजुरांच्या पदरांत टाकणार आहांत? त्यांचा हा रोखठोक स्वभाव लोकांना त्यावेळीं अप्रिय वाटे, पण अंतिमतः तोच हितावह ठरेल अशी त्यांची खात्री असल्यानें त्यांनीं आपलें हें धोरण कधीं सोडलें नाहीं. १९२३ चा कामगार नुकसान-भरपाई कायदा, १९२६ चा ट्रेड युनियन ॲक्ट, १९२९ चा ट्रेड डिस्प्यूटस् ॲक्ट, १९३४ वेतन कायदा ह्या सर्व प्रसंगीं त्यांचा साक्षेपी निःस्पृह बाणा सर्वांच्या प्रत्ययास आला. मजुरांच्या परिस्थितीची चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या रॉयल कमिशनचे ते सभासद होते. १९४७ सालीं सेंट्रल पे-कमिशनचे सभासद म्हणूनहि त्यांनीं काम केलें.

मध्यवर्ती असेंब्लींत त्यांच्या इतका नियमित सभासद क्वचितच दुसरा कोणी असेल. प्रत्येक बिलाचा बारकाईनें व चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करून ते मतप्रदर्शन करीत. समाज-जीवनावर ज्या ज्या बाबींचा परिणाम होणार त्या त्या बाबत आपली भूमिका निश्चित आणि खंबीर असली पाहिजे असें ते मानीत. कॉंग्रेसनें स्वातंत्र्यपूर्व काळांत जी नियोजन समिति पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं नेमली होती तिचे ते सभासद होते, एवढेंच नव्हे, तर मजूर उपसमितीचे ते अध्यक्षहि होते.

भारतांत कामगार संघटना विखुरलेल्या होत्या. त्यांना एकत्र केल्याशिवाय प्रभावी असें कामगार संघटन होणार नाहीं, हें ओळखून त्यांच्या

सहकार्यानें देशांत अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना झाली. जवळ जवळ दोन तपें त्यांनीं त्या संघटनेचें अपत्यप्रेमानें संवर्धन केलें. पण एका बाजूनें कम्युनिस्टांचें अतिरेकी धोरण आणि दुसऱ्या बाजूनें सरकारच्या कच्छपीं लागलेली काँग्रेसप्रणीत मजूर संघटना, ह्यांचा त्यांना उबग आला. मजूर चळवळ ह्या दोघांच्या साठमारींत गतप्राण होत होती ! समाजवाद्यांनीं ह्या घातक प्रवृत्तीपासून कामगार चळवळ वांचावी म्हणून हिंद मजदूर सभेची स्थापना केली. तेव्हांपासून ते तिचे सल्लागार म्हणून काम करूं लागले.

आर्थिक न्याय मिळाला कीं समाजाचे सर्व रोग दुरुस्त होतील, अशी अंधश्रद्धा त्यांची कधींच नव्हती. सामाजिक समतेसाठीं कामगार संघटना धडपडत नाहींत, ह्याची त्यांना फार खंत वाटे. 'दुनियाके मजदूरों एक हो जावो.' ह्या घोषणा घुमविणारे कामगार जातिवाद आणि स्पृश्यास्पृश्यता यांना घोरपडीप्रमाणें घट्ट चिकटून बसतात, हें त्यांना दिसत होतें ! सोशल रिफॉर्म असोसिएशन काढून ह्या दृष्टीनें त्यांनीं कार्य सुरूं केलं. कामगारांनीं तरी प्रथम अस्पृश्यता दूर करावी, म्हणजे त्याचा परिणाम समाजांतील इतर थरांवरहि खात्रीनें होईल, अशी त्यांची धारणा होती. मुंबईतील कापड गिरण्यांत हरिजनांना सांच्यावर काम करतां येत नाहीं, ह्या जाणीवेनें त्यांना तीव्र वेदना होत. 'राजकीयदृष्ट्या जहाल तो सामाजिकदृष्ट्या उदासीन किंवा प्रचलित समाजव्यवस्थेचा समर्थक' अशी जी स्थिति लोकमान्यांच्या वेळीं होती तीच आर्थिक न्यायाच्य प्रस्थापनेसाठीं हिरीरीनें झगडणाऱ्यांची आहे, हें पाहून ते व्यथित होत ! जातिवादाविरुद्ध केवळ प्रवचनें करण्याऐवजीं जातिवाद दैनंदिन जीवनांतून नाहींसा व्हावा यासाठीं भरीव कामगिरी कामगार संघटनांनीं बजवावी, अशी त्यांची अपेक्षा होती. पुण्याला सामाजिक परिषदेचें अधिवेशन झालें त्याला ते जातीनें हजर होते. नागरिक स्वातंत्र्याचीं त्यांनीं सतत दक्षतेनें जपणूक केली. त्यासाठीं त्यांनीं 'सिव्हिल लिबर्टिज युनियन' मध्येंहि काम केलें.

अखेरच्या दिवसांत त्यांना देशांतील लोकशाहीचीच एक चिंता होती. ते म्हणत, " आपल्या देशांत इतके राजकीय पक्ष आहेत, पण गरिबांचें म्हणजे बहुजन समाजाचें असें लोकमत येथें निर्माणच झालेलें नाहीं. तें ते निर्माण व्हायचें तर ज्ञानप्रचार आणि अभ्यास हेंच साधन आहे. पण आज हें साधन कोणाला मानवत नाहींसें वाटतें. लोकशाहीचा जप करणारे पक्षहि बुद्धिवादी बाणा जनतेला शिकविण्याऐवजीं नेत्यांच्या नांवानें त्यांच्या श्रद्धेला आवाहन करतांना आढळतात ! रानडे–गोखले यांचा आमचा पंथ. तोच ह्या साधनांची उपासना करीत होता. राजकीय पक्षांचें वास्तविक हें कार्य पण तें आज कोणीच करीत नाहीं. " कधीं ते म्हणत, " लोकशाहीसाठीं लोकशिक्षण हवें व तेंच कार्य करणारीं अभ्यासवृत्तीचीं माणसें हवींत. त्यांतूनच गरिबांचें मत निर्माण होईल. पण ह्या विधायक कामाकडे फारसें कोणी लक्षच देत नाहीं ! लोकशाहीसाठीं लोकशिक्षणाचीं सर्व साधनें सतत उपलब्ध असलीं पाहिजेत. कोणताहि प्रश्न निर्माण झाला कीं त्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून लोकमत तयार करणें हा खरा लोकशाही बाणा होय. न्या. रानडे व गोखले यांचा हा वारसा आहे. " हा वारसा एखाद्या सुपुत्राप्रमाणें नानासाहेबांनीं आमरण निष्ठेनें चालविला.

त्यांचा दुर्दम्य आशावाद, निरलसपणा, लोकशिक्षणांतून समाजपरिवर्तन घडवून आणण्याची त्यांची तळमळ, साक्षेपी अभ्यासू वृत्ति, अपरिग्रही निःस्पृह बाणा, सर्वांचें सहकार्य घडवून आणण्याची तळमळ, लोकशाही रक्षणासाठीं अखंड जागरूकता, जातीयता वा प्रांतीयता यांचा लेशहि-स्पर्श नसलेली त्यांची वागणूक, आढ्यतेचा अभाव आणि निरहंकारी स्वभाव, अनाग्रही सत्यनिष्ठा, हे गुण पुढच्या पिढ्यांनीं आदर्श म्हणून त्यांच्या चरित्रापासून गिरवावे इतके थोर आहेत.

○ ○ ○

# राजरत्न

एखादेंच समाजसेवेचें कार्य निवडून त्याला आपलें जीवन-सर्वस्व अर्पण करणारीं थोर माणसें गेल्या पिढींत आपल्याकडे बरींच झालीं. आपापल्या सेवाविषयाला आपल्या तपश्चर्येनें समाजांत खास प्रतिष्ठा त्यांनीं मिळवून दिली. राजरत्न माणिकराव यांचेंहि नांव अशा थोर पुरुषांत घ्यावें लागेल. इतिहासाचार्य राजवाड्यांनीं इतिहासा-सारखा रुक्ष व उपेक्षित विषय निवडला. महर्षि कर्वे यांनीं दलित-अनाथ स्त्रियांचा प्रश्न हातीं घेतला तर माणिकराव यांनीं व्यायामाचें क्षेत्र निवडलें. आज इतिहाससंशोधन राजमान्य झालें आहे. विधवा-विवाह करण्याला समाजाचा विरोध राहिलेला नाहीं आणि शाळा-महाशाळांतून व्यायामाचे हसें व्हावें इतकी सक्ति होत आहे! परंतु ज्या काळांत आणि ज्या परिस्थितींत ह्या मंडळींनीं ह्या कामांना वाहून घेतलें, अनंत हालअपेष्टा व उपहास सहन करीत चिकाटीनें आपलें काम चालविलें, त्याचा विचार केला म्हणजे त्यांच्या थोरवीची कल्पना येते.

१८५७ सालचें स्वातंत्र्ययुद्ध आटोपल्यानंतर इंग्रज सरकारची धष्टपुष्ट लोकांवर व व्यायामप्रेमी मंडळींवर खास इतराजी होती. सरकारला संशयानें इतकें पछाडलें होतें कीं अशा माणसांमागें गुप्त पोलिसांचा ससेमिरा लागत असे. याच्याच बरोबरीनें काळ्या रंगाचे पण आपल्या जातीचे नवे राजनिष्ठ लोक निर्माण करण्याची सरकारी कोशिस फार जोरांत चालू होती. इंग्रजी

आदर्श समाजांत प्रतिष्ठित व्हावेत यासाठीं नाना प्रकारचीं उत्तेजनें दिलीं जात होतीं. चार दोन बुकें इंग्रजी शिकलें कीं, सरकारी नोकरीचा हटकून लाभ होत असे. शारीरिक कष्ट आणि मल्लविद्या यांची सुशिक्षितांना लाज वाटावी अशी परिस्थिति निर्माण झाली होती. अशा काळांत १८७८ सालीं माणिकराव यांचा जन्म झाला. त्यांचें मूळ नांव गजानन यशवंत ताम्हणे. पांढरपेशा वर्गातल्या तरुणांचे त्या वेळचे आदर्श ठरून गेल्यासारखे होते, परंतु ह्या तरुणाच्या मनांत वेगळेच विचार होते. ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् – शरीर हेंच धर्माचें आद्य साधन आहे. ' हे पुस्तकांतून शिकावयाचें सुभाषित नसून ते प्रत्यक्षांत आणण्यांतच त्याची सार्थकता आहे, हें ओळखून बलोपासना हेंच आपल्या आयुष्याचें ध्येय त्यांनीं ठरविलें.

त्यावेळीं पाश्चात्त्य विद्यांचें नुकतेंच आगमन झाल्यानें लोकांचे डोळे दिपून गेले होते व जुन्या जीवनदायी विद्यांचीहि उपेक्षा होत होती. सरकारची इतराजी, सुशिक्षित वर्गाची उपेक्षा आणि ज्यांच्याजवळ ही विद्या होती त्यांच्याजवळील सामाजिक दृष्टीचा अभाव, ह्या सर्वांतून माणिकरावांना मार्ग काढावयाचा होता. बलोपासनेसाठीं ज्या मल्लांशीं सख्य जोडायचें त्यांच्याजवळ सुशिक्षित मनुष्य फार काळ टिकणें कठिण, इतकें त्यांचें ओबडधोबड आचरण असायचें. व्यायामाला कोणत्याहि प्रकारें शास्त्रीय दृष्टीची जोड नव्हती. प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं नाना वस्तु तयार कराव्या त्याप्रमाणें मल्ल हीहि एक प्रदर्शनीय वस्तु बनली होती ! या सर्व अडचणी आणि स्वतःच्या स्नेह्या–सोबत्यांचा विरोध सहन करून त्यांनीं बलोपासना आरंभली.

विद्या कोणाकडून शिकायची हाहि त्याकाळीं कमी महत्वाचा मुद्दा नव्हता. शत्रूकडूनहि विद्या मिळवावी, असा प्रयत्न करणाऱ्या कचाचें युग जाऊन इंग्रजी भाषेंतूनच काय तें वाघिणीचें दूध मिळतें असें मानण्यापर्यंत देशाची ' प्रगति ' झाली होती ! बलोपासनेलाच आधीं लोकांचा विरोध होता. पण माणिकरावांनीं एकदां बलोपासना हें ध्येय ठरल्यावर कोणाच्याहि रागलोभाची पर्वा न करतां पावलें टाकायला सुरुवात केली. ' जाती न पूछो साधूकी, पूछी लीजिये ज्ञान । मोल करो तलवारका, पडा रहन दो म्यान ॥

अशी त्यांची दृष्टि होती. प्रत्यक्ष शत्रूकडे विद्यासंपादनासाठीं जाणारा कच, हा त्यांचा आदर्श होता. त्यामुळे लोकांच्या रूढ समजुती डावलून माणिकरावांनीं हबशी मल्ल जुम्मामियाँ यांची शागिर्दी पत्करून विद्या संपादन केली. धर्म, जाति, वर्ण हे क्षुद्र भेद विद्येच्या मार्गांत उभे करणें पाप आहे, अशी त्यांची धारणा होती. त्यांनीं नेटानें आणि नेकीनें सर्व प्रकारची मल्लविद्या शिकून घेतली. नेमबाजींत तर ते विशेष प्रवीण झाले.

मल्लविद्या शिकून गांवोगांवीं तिचें प्रदर्शन करावयाचें व लोकांचे गौरव स्वीकारीत आपली उपजीविका चालवायची, हा त्या काळच्या मल्लांचा शिरस्ता होता. माणिकरावांनीं थोडा काळ हें केलें, पण तेवढ्यानें त्यांच्या मनाला समाधान लाभेना. एकीकडे प्रदर्शनीय चार मल्ल आणि दुसरीकडे सर्वसामान्य लोकांची ‘ पाप्याचीं पितरें ’ बनत चाललेलीं शरीरें ! ही विसंगती त्यांना जाणवली. चार लोक प्रदर्शनीय होण्याइतकें बलिष्ठ करणें हें व्यायाम प्रणालीचें ध्येय नव्हे. सर्वसामान्य जनतेची शरीरप्रकृति अधिक बलिष्ठ करणें जरूर आहे, हा ध्यास त्यांना लागला. व्यापक प्रमाणावर बलोपासना रूढ करण्याची तळमळ त्यांना लागली. त्यांनीं त्या दृष्टीनें प्रयोगांना सुरवात केली.

विवेकानंद म्हणत असत कीं आमच्या देशांत हिमालयासारख्या उत्तुंग चारित्र्याचीं कांहीं माणसें असलीं तरी पाश्चात्य देशांत जें व्यावहारिक चारित्र्य सर्वत्र आढळतें त्याचा मागमूसहि आमच्या समाजांत दिसत नाहीं ! जी गोष्ट चारित्र्याची तीच गोष्ट जीवनाच्या इतर अंगांची. जागतिक कीर्तीचे विद्वान, संशोधक, कलावंत या देशांत झाले, पण सर्वसामान्य बहुजन समाजाचें अज्ञान, शास्त्रविरोध आणि कलाहीनता मात्र कायमच राहिली. पाश्चात्यांची सामुदायिक विकासाची दृष्टि स्वीकारून पौरस्त्य विद्यांचा विकास केला पाहिजे, ही जाणीव माणिकरावांना झाली व त्यांनीं व्यक्तिमर्यादित व्यायाम पद्धतींना सामूहिक स्वरूप देण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालवला. आपले देशी व्यायाम सामूहिक पद्धतीनें करतां येणार नाहींत अशी लोकरूढ समजूत. ती बदलावयाची तर आपल्या व्यायामपद्धतींत शास्त्रीय दृष्टि दाखल करण्याची गरज होती. माणिकरावांनीं त्या दृष्टीनें भारतीय मल्लविद्यांचें संशोधन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत • : ११
अनुक्रम ..... दि: ..........

चालविलें व प्रयोगहि सुरू केले. स्वतःच्या मनाशीं एक आराखडा तयार करून तो प्रयोगसिद्ध झाला तेव्हां त्यांनीं व्यापक प्रमाणावर कार्याला प्रारंभ केला.

त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र म्हणून बडोद्याची निवड केली. कारण कांहीं संस्थानांत अशा कामांना त्या काळांत खास अनुकूलता होती. १९२१ सालीं त्यांनीं आपल्या गुरुजींच्या स्मरणार्थ जुम्मादादा व्यायाम मंदिर सुरूं केलें. सुशिक्षितांच्या मनांत व्यायामाबद्दल असलेली अनास्था दूर करून भारतीय व्यायामपद्धतीबद्दल प्रेम निर्माण करण्याची कामगिरी त्यांनीं बजावली. लाठी-काठी बोथाटीपासून तों कुस्तीमल्लखांबापर्यंत सर्व कला तेथें शिकवल्या जाऊं लागल्या. कवायतीचीहि त्यांनीं उपेक्षा केली नाहीं. हुकमांचे हिंदी बोल प्रतिष्ठित करण्यांत त्यांचा हिस्सा मोठा आहे. हुतूतू, आट्यापाट्या, खोखो हे खास भारतीय खेळ. गांवोगांव हे खेळ खेळले जात होते. पण त्यांत कांहीं शास्त्रीय नियम किंवा खेळण्याच्या पद्धति नव्हत्या. पहात आणि खेळत शिकवायचे. खेळांतलें कौशल्य हस्तगत करण्यासाठीं कांहीं खास सोयी नव्हत्या. माणिकरावांनीं या खेळांतहि लक्ष घातलें, त्यांना एकसूत्री नियमांची बैठक दिली.

व्यायाम करणें, शरीर कमावणें या गोष्टी पुरुषांपुरत्याच मर्यादित झाल्या होत्या. घरकामांत स्त्रियांना होईल तो व्यायाम ! व्यायाम क्षेत्रांत स्त्रियांनीं पडणें म्हणजे पाप, अशी कांहींची एकांतिक व्यायाम निष्ठा तर दुसऱ्या समतावाद्यांचा आग्रह भिन्न शरीररचना ध्यानांतहि न घेतां त्यांना सर्व पुरुषी व्यायाम शिकविण्याचा.पण जुन्या व्यायामपध्दतींत रुळलेल्यांनीं स्त्रियांची सामान्यतः उपेक्षाच केली. स्त्रिया ह्या जन्मापासून मृत्यूपर्यंत रक्षणीय अशी खुळचट कल्पना पसरली होती ! बापानें बालपणीं, नवऱ्यानें मोठेपणीं आणि मुलानें म्हातारपणीं स्त्रियांचें रक्षण करायचें. ती स्वतःचें रक्षण करण्याला असमर्थ आहे, अशी मध्यकाळांत कल्पना रूढ झालेली. प्राचीन स्त्रियांची तेजस्वी कर्तबगारी विस्मरणाच्या गर्तेत नाहींशी झालेली. या दुष्ट कल्पनेवर माणिकरावांनीं आघात केला. कन्या-आरोग्य मंदिराची त्यांनीं १९२५ सालीं स्थापना

करून आधुनिक काळाचीं पावलें ओळखल्याचा प्रत्यय आणून दिला. व्यायामशिक्षक तयार करून व्यायामप्रचार करण्याचेंहि श्रेय त्यांना आहे. व्यायामासंबंधीं मराठी, गुजराती व हिंदी भाषांत त्यांनीं साहित्य निर्माण केलें. त्यांच्या देखरेखीखालीं तयार झालेलें, ' बोधक-पत्रक ' अनेकांना मार्गदर्शक झालें. जुन्या विद्या शास्त्रांत बसविण्याच्या त्यांच्या कसोटीच्या प्रयत्नांचें तें द्योतक आहे. सर्व भारतभर त्यांचा शिष्यवर्ग पसरलेला आहे. शाळांतून आज जें शारीरिक शिक्षण सुरू झालें आहे त्याचा पाया माणिक-रावांनीं घातला म्हटलें तर फारसें वावगें होणार नाहीं.

पाश्चात्य विद्यांना असलेली सरकारमान्यता आणि आमच्या विद्यांतील अशास्त्रीयपणा ह्यामुळें आपल्याकडील विद्यांना मरणकळा आली होती. त्यांतून त्यांच्या शिक्षणाची चांगलीशी सोयहि कोठें नव्हती. गुरुजींच्या मर्जीवर शिक्षणाची सारी मदार. यामुळें कुठें एखादा मनुष्य नांवाजलेला मिळायचा व त्याचें कसब हें चमत्कारांत गणलें जायचें ! आपली विद्या समाजासाठीं उपलब्ध करून देण्याची व्यवस्था कोणी केली नाहीं. मालिश आणि अस्थिसंधान ह्या विद्या अशाच उपेक्षित होत्या. माणिकरावांनीं या दोन्ही कलांचा अभ्यास करून व्यायामाबरोबर ह्या दोन कलाहि अनेकांना शिकविल्या. त्यांचें शिष्य आज ह्या दोन्ही विद्यांचा समाजासाठीं उपयोग करतांना आढळतात.

बुद्धि, शक्ति किंवा पैसा या सर्व बळांचा विनियोग समाजसेवेंत झाला तरच त्यांना महत्त्व. परंतु विद्या विवाद करून पांडित्यप्रदर्शन करण्यासाठीं, धन तोरा मिरवण्यासाठीं आणि परपीडेसाठीं शक्ति असेंच दृश्य अनेक वेळीं आढळतें. माणिकरावांच्या बलोपासनेला सेवेचें अधिष्ठान होतें. समाजसेवेसाठींच त्यांना बलोपासना हवी होती. बडोद्याला महापूर आला तेव्हां माणिकराव व त्यांचें व्यायामपटु शिष्य जनतेच्या सेवेला धावून गेले. ह्या प्रसंगानें त्यांच्या कार्याचें महत्त्व विशेषत्वानेंच लोकांना जाणवलें. बडोद्याच्या महाराजांनीं त्यांना ' राजरत्न ' हा बहुमानाचा किताब याच प्रसंगानें दिला. बडोद्याच्या आसपास गुजरातेंतहि त्यांनीं व्यायाम प्रचार केला.

त्यांची ही कामगिरी महत्त्वाची आहे. ह्याचसाठीं गुजरातीचे महाकवि न्हानालाल यांनीं त्यांना ' प्रजारत्न ' असें संबोधलें !

माणिकरावांची उंचीपुरी आणि कळकासारखी वाळकुडी पण ताठ मूर्ति, त्यांचा साधा पण ठाकटीक वेष आणि डोळ्यांतला करारीपणा यांची छाप पहिल्याच दर्शनांत पडत असे. पण ते कठोर नव्हते. स्नेहप्रेमानें माणसांचा संग्रह करण्यांत ते पटाईत होते. प्राचीन शस्त्रास्त्रें जमविण्याचा त्यांना छंद होता. त्यांनीं अशीं कितीतरीं शस्त्रें जमविलीं आहेत. जुन्या घर्तीच्या कोंदट तालमींच्या ऐवजीं त्यांनीं प्रेक्षणीय अशी कायम शाळा बडोद्यांत उभी केली. तेथील स्वच्छता व टापटीप आदर्श असते. बडोद्याच्या वैभवसंपन्न इमल्यां-प्रमाणेंच ही व्यायामशाळा हेंहि एक प्रेक्षणीय असें स्थळ झालें आहे ! माणिकरावाच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याचा अमृतोत्सव मुंबईत साजरा झाल्यानंतर ते इतक्या लवकर दिवंगत होतील अशी कोणालाच कल्पना नव्हती. हुतूतू वगैरे भारतीय खेळांना पुन्हां प्रतिष्ठा आणण्याची तळमळ त्यांना लागून राहिली होती. दिल्लीला जाऊन पं. नेहरूंना हुतूतूचें महत्त्व पटवून देण्याची इच्छा त्यांनीं बोलून दाखविली होती. भारतीय व्यायाम पद्धतींचा उत्कर्ष एवढाच एक ध्यास त्यांना होता.

क्रांतिकारकांशीं संबंध असला तरी प्रत्यक्ष उघड राजकारणाच्या रंगणांत राजरत्न माणिकराव कधी उतरले नाहींत. राजकीय पक्षांनीं निर्दिष्ट केलेल्या सांचेबंद विधायक कार्याची धुरा त्यांनीं वाहिली नाहीं. त्यांनीं एकच केलें आणि तें म्हणजे तरुणांना त्यांनीं बलोपासना शिकविली. भारतीय मल्लविद्या आणि देशी खेळ यांची तरुणांना गोडी लावली आणि मृतवत् विद्येला नव्या दृष्टीची व शास्त्रीय वृत्तीची अमृतसंजीवनी पाजून त्यांनीं त्यांच्यांत नवचैतन्याचा संचार केला. उगवती पिढी बलवान् बनविणें एवढेंच त्यांचें ध्येय होतें आणि त्यासाठीं मृत्यूशीं हस्तांदोलन करीपर्यंत ते तरुण राहिले !

उपेक्षित विषय निवडून त्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा त्यांनीं केलेला चिकाटीचा प्रयत्न, नवज्ञानाशीं जुन्याचा मेळ घालण्याची त्यांची समन्वयी

वृत्ति, सामाजिकतेंतच विद्येचें सार्थक आहे ही त्यांची भावना; निवडलेल्या कामाला जीवन समर्पण करण्याची त्यांची ध्येयनिष्ठा, ह्या सर्व गोष्टी आदर्श अशा आहेत. शुद्ध चारित्र्य, निःस्पृह बाणा आणि सेवावृत्ति यांमुळें माणिकरावांच्या स्मृतीचा सुगंध दरवळत राहील.

◎ ◎ ◎

# लोकसभापति

भारतीय लोकसभेचे कर्तबगार, कुशल व स्नेहसौजन्यशील सभापति ना. दादासाहेब मावळंकर सोमवार दि. २७ फेब्रुवारी १९५६ रोजीं अहमदाबाद येथें निधन पावले. मरणसमयीं त्यांचें वय ६८ वर्षांचें होतें. दादासाहेबांची प्रकृति हृदयविकारानें ह्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांतच बिघडली. त्यानंतर आशा-निराशांचे हेलकावे खात गेल्या सोमवारीं अचानक तिनें गंभीर स्वरूप धारण केलें व त्यांतच त्यांचा अंत झाला. भारतीय लोकशाहीच्या इतिहासांत त्यांचें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवावें लागेल. भारतासारखा अफाट लोकसंख्येचा देश, लोकशाही राज्ययंत्राशीं पूर्णतः अपरिचित असे लोक, लोकशाही परंपरांचा अभाव, लोकसभांतील राजकीय पक्षांच्या बळांतील जमीन-अस्मानाची विषमता, राजकर्त्या पक्षाचें अलौकिक असें नेतृत्व व त्या मानानें विरोधी पक्षांतील ठेंगू पुढारीपण, या सर्व बिकट परिस्थितींतून संसदीय लोकशाहीचा भक्कम पाया घालण्याची कामगिरी दादासाहेबांना बजवावयाची होती. उतारवयांत हा भार त्यांच्यावर येऊन पडला तरी त्यांनीं तो अत्यंत समर्थपणें उचलला व आपल्यावरील जबाबदारी उत्तमप्रकारें पार पाडून लोकसभेच्या अध्यक्षपदाचा एक आदर्श घालून दिला.

केवळ एवढें कामहि कोणी करतां तरी तें अत्यंत गौरवास्पद गणलें गेलें असतें. परंतु संसदीय कारभाराव्यतिरिक्त जीवनाच्या इतर पैलूंबाबतहि

त्यांना आकर्षण असे. विशेषत: शिक्षण आणि विधायक कार्य यासाठीं तें इतर सर्व जबाबदाऱ्यांतूनहि वेळ काढीत. गुजरात सभेपासून गुजरात विद्यापीठापर्यंत अनेक सार्वजनिक व शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थांशीं त्यांचा घनिष्ठ संबंध होता. कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक निधि व गांधी स्मारक निधि या दोन अखिल भारतीय सेवा संघटनांचें अध्यक्षपद त्यांच्याकडेच होतें. आपलें ऊर्वरित आयुष्य या संघटनांमार्फत चाललेल्या नवजीवन निर्माण करणाऱ्या विधायक कार्यांत व ग्रामीण जनतेच्या सेवेंत खर्च करावें, अशी त्यांना तीव्र तळमळ वाटत होती. अनेक वेळां सहज बोलतां बोलतां ती व्यक्त होत असे. त्यांच्या निधनानें संसदीय लोकशाही कारभारांत बराच काळ जशी त्यांची उणीव जाणवेल, तशीच या विविध संस्थांनाहि पोकळी जाणवल्यावांचून राहाणार नाहीं.

२७ नोव्हेंबर १८८८चा त्यांचा जन्म. बडोद्याला आजोळीं ते जन्मले. त्यानंतर कोंकणांत देवरूख व राजापूर येथें प्राथमिक शिक्षण त्यांनीं पूर्ण केलें. १९०३ सालीं ते अहमदाबादला गेले. तेथूनच मॅट्रिक व बी. ए. झाल्यावर मुंबईच्या लॉ कॉलेजांत त्यांनीं नांव दाखल केलें. वकिलीच्या परीक्षेंत ते सर्व विद्यार्थ्यांत पहिले आले. १९१३ पासून त्यांनीं अहमदाबाद येथें वकिलीचा व्यवसाय सुरू केला. दादासाहेबांचा पिंड नेमस्त. कोठल्याहि कामांत बेहोशीनें ते कधीं पडले नाहींत. विजेच्या झगझगाटापेक्षां नंदादीपाचें सातत्य राखणारें मंद शांत तेज त्यांना आकर्षक वाटे. त्यांच्या जीवनांत भावनेचीं तुफानें नाहींत. बुद्धीचा निकष लावूनच प्रत्येक गोष्ट पत्करावयाची, विचारानें पटल्याशिवाय पाऊल उचलावयाचें नाहीं, कोणाचें व्यक्तिमत्त्व कितीहि प्रभावी असलें तरी त्यामुळें झपाटून जावयाचें नाहीं, अशी त्यांची वृत्ति असल्यानें लोकशाही प्रवृत्ति त्यांच्या हाडींमासीं खिळलेली होती. आग्रहीपणा त्यांच्याजवळ नसे. स्वमताची कदर करीत असतांहि मतपरिवर्तनासाठीं लागणारा मोकळेपणा त्यांच्याजवळ असे. सरदार पटेल आणि म. गांधी यांच्यासारख्या थोर विभूतींच्या इतक्या निकट संपर्कात असूनहि आपलें व्यक्तिमत्त्व त्यांनीं महादेवभाईप्रमाणें कधीं विलीन होऊं

दिलें नाहीं. गांधी-पटेलांचें अनुयायित्व त्यांनीं पत्करलें तरी ते कोणाचे चेले बनले नाहींत. गंगा स्वतंत्र वाहत असते व अंतिम अवस्थेत सागरांत विलीनहि होते त्याप्रमाणें राष्ट्रीय संग्रामांत ते लढ्यांशीं एकरूप झाले तरी अन्य वेळीं त्यांचें व्यक्तिमत्त्व स्वतंत्र तेजानें झळकत असे. गुजरातनें सरदारांच्या नेतृत्वाखालीं संघटनेचें, शिस्तीचें व ऐक्याचें अपूर्व बळ मिळविलें. तेथील कार्यकर्ते एकरूप झालेले दिसतात. सरदारांच्या आधारामुळें स्वतंत्र बाण्याऐवजीं एकाधार नेतृत्वाचा प्रकार तेथें निर्माण झाला आहे. पण अशाहि परिस्थितींत दादासाहेबांनीं आपलें स्वतंत्र स्थान निर्माण केलें.

महाराष्ट्रानें गुजरातला ज्या थोर व्यक्ति दिल्या त्यांत श्री. दादासाहेब मावळंकर व आचार्य काका कालेलकर यांची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. अखिल भारतीय नेते हे एका प्रांताचे रहात नाहींत या अर्थानें हें म्हटलेलें नाहीं, तर गुजराती जीवनाशीं पूर्णतः एकरूप होण्याच्या अर्थानें हें म्हटलें आहे. काकासाहेबांनीं गुजराती साहित्यमंदिरांत अढळ स्थान मिळविलें तर दादासाहेबांनीं गुजरातच्या सार्वजनिक जीवनांत. सामान्यतः वेगवेगळ्या प्रांतांत नोकरीधंद्यानिमित्त किंवा नशीब काढण्यासाठीं लोक जातात, पण ते तेथले होऊन रहात नाहींत. आपल्या मूळ प्रांताचें एक जबरदस्त आकर्षण त्यांना कायमचें राहातें. काकासाहेब व दादासाहेब दोघेहि गुजरातशीं पूर्णतः एकरूप झालें होते, हे कोणाहि सुसंस्कृत गुजराती माणसाशीं बोलतांच ध्यानांत येते. अन्य भाषिक प्रांतांत जाऊन राहून स्वतःला सतत अल्पसंख्य मानून खास अधिकारांची मागणी करणें, हें आपल्यामधील परस्पर अविश्वासाचें व राष्ट्रीय भावनेच्या अभावाचेंच द्योतक म्हटलें पाहिजे. काकासाहेब व दादासाहेब यांच्यासारख्या व्यक्ति म्हणजे आन्तर भारती वृत्तीचे प्रतीकच होत.

१९१६ सालीं गुजरातच्या सार्वजनिक जीवनाशीं दादासाहेबांचा प्रथम संबंध आला व तेव्हांपासून तो सतत वाढतच गेला. इतका कीं, अलीकडे गुजरात-मधील कुठलेंहि सार्वजनिक कार्य दादासाहेबांच्या सल्ल्याशिवाय होत नसे. गुजरात सभेमार्फतच सरदार पटेल व नंतर गांधीजी यांच्याशीं त्यांचा

संबंध आला. परंतु हे संबंध इतके घनिष्ठ आणि घरगुती असत कीं, गांधीजींशीं प्रत्येक बाबतींत सल्लामसलत करून आपलें म्हणणें त्यांना सांगून त्यांची बाजू समजून घेऊन दादासाहेब वागत. त्यांच्या प्रथम पत्नीच्या निधनानंतर त्यांच्या जीवनांत असाच समरप्रसंग आला. घरचीं माणसें दुसऱ्या लग्नासाठीं घाई करीत होती, तर गांधीजींनीं प्रथम पत्नीच्या निधनानंतर पुरुषांनीं स्त्रियाप्रमाणेंच दुसरें लग्न करूं नये, असें जाहीरपणें लिहिलेलें. कोणच्याहि आहारीं जावयाचें नाहीं अशी वृत्ति असल्यानें दादा-साहेब घरच्या उतविळीला बळी पडले नाहींत आणि गांधीजींच्या आग्रही ध्येयवादाची कदर करण्यापायीं त्यांनीं आपल्या सामर्थ्याबाहेरची गोष्टहि केली नाहीं. गांधीजींशीं मनमोकळेपणानें विचारविनिमय करून त्यांनीं आपली बाजू गांधीजींना समजावून सांगितली. ध्येयवाद्यांची एकांतिकता व व्यवहारवाद्यांची सुखस्वार्थपरायणता हे दोन्ही मार्ग टाळून त्यांनीं ध्येयवाद्यांच्या एकांतिकतेमागील प्रेरणा आणि व्यवहारवाद्यांच्यामधील मानवी सामर्थ्याचें भान या गोष्टींचा मेळ साधला. त्यांच्या जीवनांत सर्वत्र ही मध्यममार्गी वृत्ति दिसून येते. पण अन्य नेमस्तांप्रमाणें ते परधार्जिणे, आत्मसामर्थ्यावर विश्वास नसलेले नव्हते, त्यामुळें ते काँग्रेसमध्यें कर्तबगारी दाखवूं शकले.

१९२८ मध्यें त्यांनीं अहमदाबादच्या विद्यार्थिलढ्यांत उत्तम मार्गदर्शन केलें. अहमदाबाद नगरपालिकेंतील त्यांची कामगिरीहि उल्लेखनीय आहे. असहकाराच्या आदेशाप्रमाणें राजीनामे देण्याची वेळ आली तेव्हां त्यांनीं मतदारांना विश्वासांत घेऊन त्यांना आपली बाजू समजावून सांगून त्यांच्या सल्ल्यानेंच राजीनामा दिला. लोकशाही बाण्याचा एक नवा आदर्श त्यांनीं तेथें घालून दिला. नाहींतर नेहमीं होतें असें कीं, निवडणुकीपर्यंत 'दास हनुमान' असलेले उमेदवार निवडून आल्यावर 'वीर हनुमान' बनून बेपर्वाईनें वागूं लागतात! आपण ह्या मतदारांचे प्रतिनिधि आहोंत व पक्षाच्या आदेशांनीं जरी आपण बद्ध असलों तरी आपलें खरें काम लोकमत व्यक्त करण्याचें आहे, हें त्यांनीं त्यावेळीं दाखवून दिलें. हें भान नसलें

म्हणजे ‘ प्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार मतदारांना असला पाहिजे. ’ अशी मागणी करावी लागते.

पुढें सर्व राष्ट्रीय चळवळींत ते सहभागी झाले. तुरुंगवासहि त्यांनीं भोगले. गांधीजींच्या विविध विधायक चळवळींत ते असत. विशेषतः हरिजन सेवेच्या कार्यांत त्यांनीं ठक्करबाप्पांना पुष्कळच साहाय्य केलें. प्रांतिक स्वायत्ततेच्या काळांत ते मुंबई विधिमंडळाचे अध्यक्ष झाले. त्यावेळीं त्यांनीं जी न्यायप्रियता, दक्षता, अभ्यासू वृत्ति व लोकशाही बाणा दाखविला त्यामुळें स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर येतांच भारतीय लोकसभेचे सभापति म्हणून त्यांची निवड झाली. विठ्ठलभाई पटेलांच्या वेळच्या प्रमाणेंच ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. घटनासभेच्या संसदीय कार्याच्या वेळीं दादासाहेब अध्यक्ष होतेच. त्यानंतर अखेरपर्यंत ते सभापतिपदावर राहिले. भारतांतील पहिल्या लोकसभेच्या कामकाज पद्धतीवरून देशांतील लोकशाहीचें भवितव्य ठरणार होतें. दादासाहेबांनीं आपली कामगिरी चोखपणें बजावली. त्यांना विरोधी पक्षांच्या अल्पबळाची खंत वाटत असे. लोकशाहीच्या यथार्थ कारभारासाठीं तुल्य विरोधी पक्षाची आवश्यकता असते. अल्पबळ विरोधी पक्षाची उपेक्षा होऊं नये, याची त्यांनीं सतत दक्षता घेतली. नाहीं म्हणायला त्यांच्या कार-कीर्दीला पुसटसें गालबोट विरोधी पक्षीयांनीं त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव मांडला तेव्हां लागलें ! पण ह्यांत विरोधी पक्षीयांचा उतावीळपणा कितपत होता, हें सांगणें कठिण आहे. दादासाहेबांना ह्या ठरावानें तीव्र वेदना झाल्या. सभागृहांतील एखाद्याहि सभासदाच्या मनांत अशी भावना निर्माण होणें त्यांना अप्रशस्त वाटलें.

संसदीय लोकशाहीच्या विकासार्थ त्यांनीं पुष्कळच चांगले पायंडे पाडले. भारतांतील प्रांतीय विधिमंडळांच्या अध्यक्षांची ते दरवर्षी परिषद बोलावीत आणि संसदीय लोकशाहीच्या विविध अंगांसंबंधीं मार्गदर्शन करीत. येथील लोकशाही बाल्यावस्थेंत असली तरी बाळसेदार व्हावी, अशी तळमळ त्यांना होती. संसदीय लोकशाहीच्या आंतरराष्ट्रीय परिषदांतहि त्यांनीं चांगलीच मान्यता मिळविली होती.

दादासाहेबांचें स्मरण महाराष्ट्राला विशेषेंकरून राहील तें त्यांनीं पंढरपूर मंदिर हरिजनांना उघडण्यासाठीं साने गुरुजींनीं उपवास सुरू केला त्या वेळीं केलेल्या कामगिरीमुळें. रूढींच्या तमांत गाडलें गेलेले बडवे आणि निर्धारानें उपास मांडलेले साने गुरुजी, यामुळें त्यावेळीं .महाराष्ट्राचें हृदय हवालदील झालें होतें. गांधीजींनीं या उपवासाचे स्वागत न केल्यानें गुरुजींना तीव्र वेदना झाल्या होत्या व बडव्यांना जोर चढला होता. त्यावेळीं दादासाहेबांनीं अत्यंत निरलसपणें कार्य केलें व मंदिरप्रवेशाची मागणी तत्त्वतः मान्य होऊन गुरुजींचें उपोषण यशस्वीपणें संपलें. साने गुरुजींवर त्यांचा अत्यंत लोभ होता. ते जरी वरून कठोर बुद्धिनिष्ठ वाटले तरी भावनेचा भरपूर ओलावा त्यांच्या ठिकाणीं होता. साने गुरुजींच्या निधनानंतर गुरुजी रहात त्या मेघा भुवनांत तें मुद्दाम आले होते. गुरुजींच्या स्मरणानें त्यांचे डोळे पाणावल्याचें अनेकांनीं त्यावेळीं पाहिलें. दीनदलितांचा उमाळा आणि कळवळा त्यांच्या ठायीं भरपूर होता. त्यांचे ' मानवतेचे पाझर ' हें पुस्तक याची साक्ष देईल.

विनोबांशीं गांधी-स्मारक निधीच्या कार्याबाबत एकदां त्यांचा तीव्र मतभेद झाला. कांचनमुक्तीचें माहात्म्य प्रयोगानें विनोबा सिद्ध करीत असतांनाची गोष्ट. राष्ट्रीय निधि एकत्र जमा करावयाचे व ते बँकांच्या हवालीं करून ध्येयाशीं विसंगत व्यवहारांत वापरले जावयाचे; पण त्या कामांशीं सुसंगत अशा दुसऱ्या कामांना उपयोगी पडावयाचें नाहींत. असें अनेक वेळां होतें. गांधी-स्मारक निधि स्वातंत्र्योत्तर काळांतील अखेरचा निधि ठरावा, असेंहि विनोबाजी म्हणत. या प्रश्नावर विनोबांचा व त्यांचा वाद झाला. पण वाद, मतभेद झाले, दोन्ही बाजूंनीं आपलें म्हणणें उत्तम रीतीनें पुढें मांडलें व त्यांतील सारासार विवेक केला कीं, नंतर खेळीमेळीनें एकमेकांच्या साह्यास जाणें यालाच लोकशाही वृत्ति म्हणतात. विनोबांशीं मतभेद झाला तरी भूदानाच्या कार्याला लाखो रुपये गांधी स्मारक निधींतून दिले गेले, ही गोष्ट विसरतां येत नाहीं.

दादासाहेबांच्या मागें अनंत कामांचा लकडा असूनहि दैनंदिनी लिहिण्याचा क्रम त्यांचा कधीं चुकला नाहीं. ' कांहीं पीकलें ' या नांवानें

त्यांच्या दैनंदिनींतील निवडक भाग मराठींत प्रसिद्ध झाला आहे. चित्रगुप्ता-प्रमाणें तटस्थपणें त्यांनीं आपल्या जीवनांतील विविध घटनांची नोंद साक्षेपानें करून ठेवली आहे. त्यांचें जीवन-चरित्र कसें घडत गेलें याची माहिती त्यावरून उपलब्ध होते. इंग्रजींतहि ‘ लाइफ ॲट बार ’ हें त्यांचें आत्मवृत्तपर पुस्तक प्रकाशित झालें आहे.

दादासाहेब समर्थ रामदास स्वामींचे परमभक्त होते. समर्थांच्या जन्मस्थानीं जांबला ते वरचेवर जात असत. समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांनीं आधीं नेटका प्रपंच केला व त्याच नेटक्या नेमस्तपणानें त्यांनीं आपलें राजकीय जीवनहि घालविलें. व्यवहार आणि ध्येयवाद यांचा त्यांनीं मेळ घातला होता. त्यांची अभ्यासु वृत्ति, चिकाटी, संघटनाचातुर्य, आंतर भारती मन व लोकशाही बाणा यांचें सर्वांना दीर्घकाल स्मरण राहील.

◎ ◎ ◎

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५०३५५७........ वि: ....................
क्रमांक ....................... नों. दि. १८-११-६४

# मानवधर्माचे बुद्धिनिष्ठ उपासक

देशांत आज पक्षीय वृत्ति वाढत आहे. सत्याचा निःस्पृहपणें कैवार घेणारे, शुद्ध बुद्धिवादाच्या कसोटीवर प्रत्येक गोष्ट घासून पाहणारे, रामशास्त्री व आगरकर यांच्या बाण्याचे लोक दुर्मिळ होत आहेत. रामशास्त्र्यांचा निःस्पृहपणा आणि आगरकरांचा बुद्धिवाद यांची परंपरा चालविणारे महाराष्ट्रांत जे बोटांवर मोजण्याइतके लोक झाले त्यांच्यांत श्री. काकासाहेब बरवे यांची गणना होत असे. निःस्पृहता असली तरी न्यायानिष्ठुरता त्यांच्यांत नव्हती. आगरकरांच्याप्रमाणें बुद्धिवादाचें हत्यार त्यांनीं हातीं धरलें होतें तरी दीनजनांचा कळवळा असल्यानें त्यांचा बुद्धिवाद शुष्क नव्हता. दलितसेवेची त्यांना तळमळ होती आणि जीवनभर मुख्यतः ते हेंच काम करीत राहिले. त्यांच्या निधनामुळें एक कर्तबगार संघटक, साक्षेपी सेवक आणि हिशेबी कार्यकर्ता नाहींसा झाला. हे तिन्ही गुण एकवटलेले फार क्वचित् आढळतात. काकासाहेब बरवे यांना त्यांच्या या वैशिष्ट्यांमुळें महाराष्ट्रीय जीवनांत एक खास असें स्थान होतें.

काकासाहेबांचें घराणें निफाड तालुक्यांतील कोठूर गांवचें. अभिनव भारताच्या क्रांतिकारक चळवळीशीं त्यांच्या घराण्याचा संबंध होता. पुढें वकील होऊन ते धुळ्याला गेले. त्यांचा स्वभाव मूलतः नेमस्त. नेमस्त पुढाऱ्यांचा अभ्यासुपणा, साक्षेप, बुद्धिवाद हे सर्व गुण त्यांच्या अंगीं होतें. तुफानी वक्तृत्व गाजविण्यापेक्षां बिनतोड युक्तिवाद करण्याकडेच त्यांचा

कल असे. त्यामुळें १९३० सालीं ते काँग्रेसच्या चळवळींत पडले तरी काँग्रेसचे नेते म्हणून ते कधींच वावरले नाहींत. मात्र त्यांचा सल्ला काँग्रेस नेत्यांना सतत घ्यावा लागे आणि काकासाहेबहि तो आनंदानें देत.

पुढारीपणाचा त्यांचा पिंडच नव्हता. त्यामुळें १९३३–३४ सालीं गांधीजींनीं हरिजनसेवेची चळवळ हातीं घेतांच काकासाहेब तिकडे आकृष्ट झाले. राजा राममोहन रॉय प्रभृति समाजसुधारकांनीं सुरू केलेलें, आगरकरांच्या सारख्यांनीं संवर्धिलेलें, जडमूढ धर्मकल्पनांतून समाजाची सुटका करण्याचें काम त्यांना पटलें. हरिजन-सेवा हे ह्या सर्व कामांचें प्रतीक होतें व म्हणूनच काकासाहेब या कामांत पडले. १९३७ सालीं पंतप्रधान झाल्यावर बाळासाहेब खेरांनीं हरिजन-सेवक संघाचीं सूत्रें खालीं ठेवतांच काकासाहेबांनीं तीं हातीं घेतलीं. काकासाहेब हे भावनाप्रधान नव्हते व त्यामुळें त्यांच्या कामाला कधीं तुफान भरती–ओहोटी आली नाहीं, पण त्यांनीं सातत्यानें कार्याचा नंदादीप तेवत ठेवला.

काकासाहेबांनीं दलित-सेवेचीं अनेक कामें केलीं. हरिजनांवर होणारा अन्याय व्यक्तिगत म्हणून त्यांनीं त्याकडे कधीं दुर्लक्ष केलें नाहीं. महाराष्ट्रांत कोठेंहि हरिजनांवर अन्याय झाला तरी 'दलितसेवक' त्याविरुद्ध उभा राहात असे. छात्रालयें चालविणें, सहभोजनें करणें हीं कामें तर त्यांनीं सतत केलींच, पण हरिजनांची परिस्थिति सुधारावी म्हणूनहि त्यांनीं खटपट केली. हरिजनांतहि दलित शोभतील असे जे भंगी त्यांचें जीवन सुधारण्याची त्यांना तळमळ लागून राहिली होती. परदेशी जाणाऱ्यांकडूनहि ते तेथील मैला सफाईच्या पद्धतींची माहिती मिळवीत. इंग्लंडमध्यें पां. वा. गाडगीळ गेले तेव्हां त्यांना तेथील सफाई कामाची पाहाणी करण्याचा काकासाहेबांनीं आग्रह केला. आण्णासाहेब सहस्रबुद्धे जपानला गेले तेव्हां जपानमधील मैला-सफाईच्या कामासंबंधीं माहिती त्यांनीं मागविली. भंगी जातीच्या डोक्यावरचें मैल्याचें टिपडें निघालें पाहिजे, अशी त्यांना तळमळ होती. त्यांनीं आग्रह धरल्यामुळें मुंबई सरकारनें त्यांच्या नेतृत्वाखालीं भंगीजीवन सुधार समिति नेमली होती. त्यांनीं भंग्यांची आजच्या हीन स्थितींतून मुक्तता व्हावी

म्हणून सरकारला व नगरपालिकांना ताबडतोब अंमलांत आणण्यासारख्या कितीतरी सूचना केल्या. पण सरकारनें त्याकडे तांतडीनें लक्ष पुरविलें नाहीं आणि नगरपालिकांना त्याचें कधीं विशेष अगत्य वाटलें नाहीं. ह्या अहवाला-प्रमाणें भंग्यांच्या जीवनांत सुधारणा व्हावी, अशी त्यांना तळमळ होती. त्यांच्या नेमस्त स्वभावाला अनुसरून त्यांनीं सहज झेपतील इतक्या माफक, पण अत्यावश्यक अशा सूचना त्या अहवालांत केल्या आहेत. पण त्याहि तांतडीनें अंमलांत येत नाहींत, ह्याचा त्यांना खेद होई. सरकार व नगरपालिका यांच्या दृष्टीनें त्यांच्या शंभर कामांपैकीं हें एक काम होतें तर काकासाहेबांना हेंच एक प्रमुख काम होतें. परंतु विवेकानें ते ही दिरंगाई सहन करीत.

निर्भीड पत्रकार म्हणून त्यांनीं बजावलेली कामगिरीहि महत्त्वाची आहे. ‘ भारत ’ ह्या जिल्हा साप्ताहिकांत प्रथम ते काम करीत. त्यांनीं समजस टीकेचा एक आदर्श घालून दिलेला आहे. ‘ दलित-सेवक ’ हें पाक्षिक ते चालवीत. एकाच विषयाला वाहिलेलें साप्ताहिक चालवायचें तर त्याला अधिक साक्षेप लागतो. वेळप्रसंगीं त्यांनीं अतिरथी, महारथींशींहि न्याया-साठीं ‘ दलित-सेवक ’ मधून झुंज घेतली आहे. महात्मा गांधींना ते मानीत असले तरी ते त्यांचे अंधभक्त नव्हते. दुसऱ्यांच्या जयघोषांत आपला आवाज मिसळवून टाकण्याची कट्टर सांप्रदायिक वृत्ति त्यांच्यांत नव्हती. बुद्धीला न पटणारी गोष्ट कोणींहि सांगितली तरी त्यावर ते टीका करीत असत. दादा धर्माधिकारी यांच्या स्त्री-जीवनविषयक विचारांवर तितक्याच प्रभावीपणें पण समतोल न सोडतां त्यांनीं केलेली टीका प्रसिद्ध आहे. विनोबांच्या भूदानयज्ञाच्या कोणत्या मर्यादा आहेत, हेंहि त्यांनीं डोळसपणें दाखवून दिलें होतें.

ते स्वत: अखेरपर्यंत कॉंग्रेसनिष्ठ होतें, पण होयबा वृत्ति त्यांच्यांत नव्हती. मंदिरप्रवेशासाठीं साने गुरुजींनीं आंदोलन केलें त्यावेळीं सेनापति बापट, हरिभाऊ फाटक आणि काकासाहेब बरवे या तिघांची त्यांना मोठीच मदत झाली. पंढरपूरचें विठ्ठल मंदिर उघडावें म्हणून साने गुरुजींनीं

उपवास सुरू केला तेव्हां काँग्रेसश्रेष्ठींचा त्याला विरोध होता. पण त्यावेळीं काकासाहेब गुरुजींच्या पाठीशीं उभे राहिले. साने गुरुजींच्या उपवासकाळांत त्यांनीं फार मोलाची कामगिरी बजावली. मावळंकर येऊन वाटाघाटी सुरू झाल्या त्यावेळींहि त्यांत ते होतेच. गुरुजींची शक्ति आणि मर्यादा यांची त्यांना जाणीव होती. किंबहुना ही जाणीव हेंच काकासाहेबांचें वैशिष्ट्य होतें. बौद्धिक जाणीव हीच त्यांच्या सर्व कामामागची प्रेरणा होती. आणि म्हणूनच भावनाप्रधान नसूनहि दलित सेवेसारखें काम ते आमरण करूं शकले. त्यांची न्यायप्रियता संस्थानिष्ठेमुळें कधी कलंकित झाली नाहीं. याचमुळें सामाजिक झगड्यांत निवाडा करण्याचा प्रसंग आला तर काकासाहेबांचें नांव सहज पुढें येत असे.

काकासाहेबांची काम करण्याची कुवत फार जबरदस्त होती. तरुण मंडळी त्यांच्या धडाक्यानें हबकून जात. त्यांना तरुणांतला मिळमिळीत आणि मेणचटपणा आवडत नसे. हरिजनांच्या कळवळ्याने बोलणारांच्या प्रत्यक्ष जीवनांतील कोरडेपणा त्यांना जाणवे. ही शाब्दिक सहानुभूति त्यांना नकोशी वाटे. तुकाराम महाराजांना दीनांचा उमाळा असूनहि त्यांच्या तोंडून 'लोक जैसा ओक, धरितां धरवेना' असा उद्‌गार निघाला, त्याच प्रकारची थोडी कटुता आणि कठोरता काकासाहेबांजवळ होती. त्यांचा वक्तशीर साक्षेपी कारभार आणि वेळेची दखल नसलेला आपला समाज, त्यामुळें ते नव्या व्यक्तींना कठोर आणि शुष्क वाटत. वरवरच्या फुकट जिज्ञासेची तर त्यांच्याजवळ बोजच नव्हती. त्यामुळें लोकार्थाचा व्यापक लोकसंग्रह ते करूं शकलें नाहींत, परंतु मूठभर गुणी व तळमळीचीं माणसें दलित-सेवेच्या उपेक्षित कामासाठीं ते जमवूं शकले.

हरिजनांबाबत हिंदु समाजाचा रूढ दृष्टिकोन बदलण्यासाठीं त्यांना स्वतःच्या घरापासूनच सुरुवात करावी लागली. पति असल्याच्या जोरावर घरांत हरिजनांचा प्रवेश न करवितां त्यांनीं हृदयपरिवर्तनाचा मार्ग घरांतहि अवलंबला. त्यांच्या पत्नी पुढें त्यांच्यांशीं समरस झाल्या. गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या साफसफाईत ते जातीनें भाग घेत असत.

आदिवासींच्या जीवनाविषयीं त्यांना आस्था होती आणि मुख्यतः ते हरिजन सेवक-संघाचें काम करीत असलें तरी भिल्ल सुधार मंडळाच्या कामांतहि त्यांनीं बरीच मोलाची मदत केली. जातिनिर्मूलनाची तीव्र तळमळ त्यांना होती. महाराष्ट्र सामाजिक परिषदेच्या कार्यांत त्यांचा वांटा मोठा होता. पुण्याच्या अधिवेशनाला ते हजरहि होते. सामाजिक सुधारणेचें काम म्हटलें कीं, त्यांत भपका नाहीं, लगेच ती सेवा वसूलहि करतां येत नाहीं, व्यक्तिलाभ त्यात नाहीं, यामुळें राजकीय कामांकडे तरुण मंडळी जितकी आकर्षित होतात तितकी हरिजनसेवेसारख्या सामाजिक कामांकडे होत नाहींत. एकप्रकारें सामाजिक काम ही संन्यस्त परंपरा आहे. ठक्करबाप्पा, दीनबंधु अँड्रयूज, वियोगी हरि, काकासाहेब यांच्यासारख्यांनीं ही परंपरा टिकवून धरली. स्वातंत्र्योत्तर काळांत राजकीयेतर कामें कशीं बहरून यायला पाहिजे होतीं, पण तीं आजहि उपेक्षितच आहेत. त्यामुळें काकासाहेबांसारख्यांची उणीव अधिकच तीव्रतेनें जाणवत राहील.

काकासाहेबांनीं मृत्यूपूर्वी एक आठवडाभर आपलें अखेरचें पत्र लिहिलें. त्यांत त्यांचें जीवन-रहस्य समर्पकपणें व्यक्त झालें आहे. मृत्यूच्या सान्निध्यांत असहायता न येतां बुद्धिनिष्ठा अशी प्रखर राहिल्याचीं उदाहरणें क्वचित्‌च सापडतील.

काकासाहेब ह्या पत्रांत लिहितात, " आमुचा राम राम घ्यावा— तुकाराम महाराजांचे किती प्रेमळ हे उद्‌गार ! त्यांना आपल्या गांवाला जायचें होतें. तो गांव म्हणजे वैकुंठ अथवा स्वर्ग. पण मला तर कोठल्याच गांवाला जायचें नाहीं. ना वैकुंठ, ना कैलास; ना स्वर्ग ना पाताळ, ना नरक ! कारण त्यावर माझी श्रद्धा नाहीं. ज्याप्रमाणें महासागरांतील अनंत जलाशयांत एखादा जलबिंदु मिसळून जातो त्याचप्रमाणें मला अनंत विश्वांत विलीन व्हायचें आहे.......

" शेती, गाई, गुरें, व शेतावरील माणसें या सर्वांविषयीं मला अतिशय प्रेम वाटतें. ते सर्व माझ्याशीं विश्वासानें वागलें. त्यांना सोडावें असें मनांत येत नाहीं, पण सोडावें लागणार ! त्यांच्याहि प्रेमाची मला आठवण होते.

“ ...... बुद्धिवादाचा प्रचार व प्रसार हे मोठें विधायक कार्य....... धर्मानें मानवजातीवर घातलेली भुरळ; जात नष्ट केल्यावांचून जातीयता व धर्म नष्ट केल्यावांचून धर्मीयता नष्ट होणारच नाहीं, जोंपर्यंत जातीयता व धर्मीयता आहे तोंपर्यंत खरी लोकशाही नाहींच, या गोष्टीपासून आज कोणतीहि संस्था वा पक्ष सर्वस्वीं अलिप्त नाहीं. असे अनेक विचार माझ्या डोक्यांत सांठलें आहेत– व ते आपल्या समाजापुढें मांडावेत अशी माझी नम्र इच्छा आहे. म्हणून आणखीं दोन वर्षें जगतां आलें तर बरें, असें वाटत होतें. पण महात्मा गांधीजींना १२५ वर्षे जगावयाचें होतें; त्यांच्यासुद्धां मनाप्रमाणें घडलें नाहीं तर मग माझ्यासारख्यांच्या मनाप्रमाणें कोठून घडणार ?

“ जीवनाचें आणि मरणाचें फार मोठें गूढ आहे......... मनुष्याच्या ज्ञानाच्या मर्यादा सतत वाढत आहेत तरीहि हें गूढ पूर्णपणें कधीं उकलेल, तें कोणी सांगूं शकत नाहीं. मनुष्याची ही धडपड सतत चालूं राहील. पण म्हणून त्यानें अंधविश्वास ठेवावा व कांहींतरी बुद्धीला न पटणाऱ्या कल्पना उराशीं बाळगाव्यात, मनाचें खोटें तात्कालिक समाधान करून घेऊन स्वतःला किंवा इतरांना जाणतां किंवा अजाणतां फसवावें, असें मात्र नाहीं. या खोट्या समाधानासाठीं बुद्धीला न पटणाऱ्या शेंकडों गोष्टी सर्व मानवसमाजांत पसरल्या आहेत. खोट्या धर्मकल्पनांनीं मनुष्यबुद्धीवर केवढें आवरण घातलें आहे !

“ मनुष्य स्वतःच्या बुद्धीला भीत आहे ! बुद्धिमान् असून बुद्धिनिष्ठ होण्याची त्याची तयारी नाहीं ! त्यामुळें मनुष्याची सामाजिक प्रगति पुष्कळच कुंठित झाली आहे व मानवतेची पीछेहाट झाली आहे. मानवता अथवा मानवधर्म हा बाजूला राहिला असून त्याची जागा जन्मापासून तों मरेंपावेतों जे आपला प्रभाव गाजवतात असे बुद्धिहीन आचार व विचार; व्रतें, वैकल्यें व चमत्कार ह्यांनीं घेतली आहे.

“ मी मानवतेचा नम्र ध्येयवादी उपासक आहें व बुद्धिवादी विचारक आहें. एवढाच माझा दावा. माझें आजवरचें वाचन व विचार यांनीं

बुद्धिवाद दृढतर बनत आहे.....माझी अंतिम श्रद्धा जातिसंस्थेवर राहिली नसून ती मानवता धर्मावर अथवा मानवतेवर दृढ झाली आहे. या कॅन्सरच्या दुखण्यांतहि ती विचलित झाली नाहीं.''

काकासाहेबांनीं दुर्धर रोगाशीं वीराप्रमाणें झुंज दिली. मृत्यू समोर दिसत असूनहि त्यांनीं आपलें काम खंडित होऊं दिलें नाहीं. मृत्यूची तमा न बाळगतां ते शेवटपर्यंत अविचलित श्रद्धेनें मानवतेचें, दलितसेवेचें कार्य करीत राहिलें. 'डेथ बी नॉट प्राउड–मृत्यो, घमेंड करूं नकोस' असेंच जणूं त्यांनीं मृत्यूला बजावलें आणि आपली जीवितयात्रा संपविली.

◎ ◎ ◎

# सुजन शासक

सत्ता आणि सुजनता यांचे संबंध लक्ष्मी-सरस्वतीप्रमाणेंच आहेत. बहुधा यांपैकीं एकाची निवड करण्याची पाळी माणसावर येत असते. पण सुजनतेमुळें सत्ता पायाशीं चालत आली आणि तरीहि सुजनता अंतरली नाहीं, अशीं उदाहरणें सहसा दिसत नाहींत. अशा अपवादात्मक उदाहरणांपैकीं एक उदाहरण श्री. बाळासाहेब खेर यांचें दाखवतां येईल. १९३७ सालीं मुंबई राज्यांत काँग्रेस पक्षाला विधिमंडळांत बहुमत मिळालें, त्यावेळीं मुख्य प्रधानपदासाठीं वीर नरीमन यांच्यासारख्या ख्यातनाम नेत्याच्या नांवाची चर्चा ऐकूं येत होती. पण एका सुप्रभातीं श्री. बाळासाहेब खेर यांच्या गळ्यांत प्रांताच्या मुख्य प्रधानकीची माळ अचानक येऊन पडली. तीन भाषिकांचें मुंबई राज्य. भिन्न स्वभावाचे लोक. या तीन भागांतील लोकांची संख्या विषम. राजकीय व सामाजिक चळवळी भिन्न प्रमाणांत रुजलेल्या......अशा स्थितींत केवळ राजकीय कर्तबगारीच्या बळावर अशा प्रांताचा कारभार यशस्वीपणें चालण्याचा संभव कमी, हें ओळखून श्री. बाळासाहेबांना काँग्रेसश्रेष्ठींनीं गळ घातली. बाळासाहेबांचें व्यक्तिमत्त्व स्नेह-सौजन्यशील, त्यामुळें प्रसंगी पडतें घेऊनहि ते एखाद्या कुटुंबाप्रमाणें हे तीनहि विभाग संतुष्टपणें एकत्र ठेवतील, असें त्यांना वाटलें आणि बाळासाहेबांनींहि आपल्यासंबंधींच्या सर्व अपेक्षा प्रायः पूर्ण केल्या. चोख कारभार, मंत्रि-मंडळाची अभेद्य एकजूट, जनमनावर प्रभाव आणि जाहीरनाम्यांतील

तत्त्वांच्या मार्गानें झपाट्यानें प्रगति यामुळें मुंबईचें मंत्रिमंडळ फार थोडक्या अवधींत ख्याति पावलें. ' जें शासन कमींत कमी करतें, तें उत्कृष्ट शासन.' असें म्हटलें जातें. बाळासाहेबांच्या कारकीर्दींत प्रांतभर वातावरण असें होतें कीं उत्तम व्यवस्था असूनहि आपल्यावर कोणी राज्य करीत आहे, आपण कोणाची प्रजा आहोंत, असें लोकांना भासत नव्हतें. लोकांशीं सरमिसळ होऊनहि राज्यकर्त्यांसंबंधीं अनादर वा उपेक्षा त्यांनीं निर्माण होऊं दिली नाहीं. मुंबई राज्यांत लोकशाही कारभाराचा उत्तम पाया त्यांनीं घातला. चांगल्या निर्दोष परंपरा त्यांनीं निर्माण केल्या. लोकसंख्येच्याच नव्हे तर राज्यकारभाराच्याहि दृष्टीनें त्यांनीं मुंबई राज्याला भारतांत फार वरचा दर्जा मिळवून दिला.

कोकणच्या जलमातीचा असा कांहीं विशेष गुण आहे कीं त्याच्या घडलेल्या मूर्ति कांहीं अजब गुणांच्या असतात. कोंकणचा मनुष्य कोठलेंहि काम हलकें समजत नाहीं. आणि त्याच बरोबर ' ठेविलें अनंते तैसेंचि रहावें', अशी अल्पसंतोषी वृत्तिहि त्याची नसते. ईश्वरानें पुरुषार्थ करण्यासाठीं आपल्याला पाठविलें आहे, जें कांहीं अल्प-स्वल्प भांडवल -- बुद्धीचें, बळाचें वा पैशांचें वांट्याला आलें असेल त्याच्या आधारावर वैभवाचे इमले उभारण्याची उमेद त्याच्यांत असते. बाळासाहेब खेरांचे आजोबा चार रुपये महिना मिळविणारे पोस्टल-रनर होते. पण त्यांनीं आपला मुलगा गंगाधर याला शिकवून वकील केलें होतें. गंगाधरपंतांना वकिलीपेक्षां शिक्षणक्षेत्रच पसंत होतेंसें दिसतें. बाळासाहेबांनाहि त्यांनीं हा वारसा दिला. गंगाधरपंतांच्या घरीं १८८८ सालीं बाळासाहेबांचा जन्म रत्नागिरी येथें झाला. जमखंडी संस्थानांत कुंदगोळ येथें बाळासाहेब राहिले. त्यांचा कानडी भाषेशीं व जीवनाशीं तेथेंच निकट परिचय आला. बाळासाहेब अकरा वर्षांचें असतांना प्लेगची सांथ आली. त्यांच्या शिक्षणांत खंड पडतो कीं काय अशी शंका वाटूं लागली. पण ना. गोखले त्यांना आपल्याबरोबर पुण्याला घेऊन आले. बाळासाहेब कांहीं काळ त्यांच्याच घरीं राहून शिक्षण घेत राहिले. नंतर नगरहून आपलें माध्यमिक शिक्षण पूर्ण करून मुंबईच्या

विल्सन कॉलेजांत ते दाखल झाले. कॉलेजांत हुशार विद्यार्थ्यांत त्यांची गणना होत असे. बी. ए. च्या परीक्षेंत त्यांनीं आपली चमक दाखवली. त्यांना वीर जीवनदास माधवदास संस्कृत शिष्यवृत्ति व भाऊ दाजी पारितोषिक मिळालें. दक्षिणा फेलो म्हणून त्यांनीं काम केलें. बी. ए. नंतर त्यांनीं कायद्याच्या अभ्यासाकडे आपलें लक्ष वळवलें. १९१२ सालीं त्यांनीं वकिलीची सनद काढली.

वकील झाल्यानंतरचा त्यांचा कांहीं काळ अत्यंत कसोटीचा गेला. त्या काळीं दलालांचें ( टाउट ) फार प्रस्थ असे. वकिलांना केसेस आणून देण्याचें काम हे टाउट करीत आणि वकिलाला मिळणाऱ्या फीपैकीं अर्धा-पाऊण हिस्सा तेच लंपास करीत. बाळासाहेब वकिलीकडे वळले ते मोठ्या उमेदीनें. देशाच्या स्वातंत्र्याची भावना विद्यार्थिदशेंतच त्यांच्या मनांत उद्भूत झाली होती. क्रांतिकारकांच्या जाळ्यांतहि ते सांपडले होते. परंतु स्वभावतःच ते नेमस्त वृत्तीचे. त्यामुळें तें धकाधकीचें राजकारण त्यांना मानवण्याजोगें नव्हतें. त्यापेक्षां टिळक, गोखले यांचें खुलें राजकारण त्यांना पसंत होतें. जनसेवेंतून जनसंघटना उभारायची व प्रखर अभ्यास आणि बिनतोड युक्तिवाद यांनीं राज्यकर्त्यांना जेरीस आणावयाचें, हा मार्ग त्यांना पसंत होता. स्वतंत्र व्यवसाय असला तरच हें अशा प्रकारचें राजकारण सुलभपणें करतां येईल, या कल्पनेनें त्यांनीं वकिलीचा व्यवसाय निवडला. परंतु 'टाउटां'च्या जाचाला ते कंटाळले. क्वचित् उपासमारहि होऊं लागली. पण काय करणार ? शेवटीं त्यांनीं मुंबईच्या एका वृत्तपत्रांत कांहीं वेळाची नोकरी पाहिजे असल्याची जाहिरात दिली. त्यावेळचे मुंबईचे न्यायाधीश बोमन यांना एक 'रीडर' पाहिजे होता. खेरांना त्यांनीं बोलावून घेतलें आणि शंभर रुपये महिन्याची नोकरी त्यांना मिळाली. त्यांचा प्रपंच तरी भागूं लागला. परंतु केवळ प्रपंच चालविण्यांत त्यांना समाधान नव्हतें. आपल्या हातून कांहींतरी देशकार्य घडावें अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठीं त्यांचा आत्मा तळमळत होता.

१९२२ सालीं खेरांनीं राजकीय क्षेत्रांत पदार्पण केलें आणि लौकरच मुंबईच्या राजकीय वर्तुळांत आपल्या कर्तबगारीनें ते चमकूं लागले. दास नेहरूंच्या स्वराज्य पक्षाची चिटणीशी त्यांच्याकडे आली. परंतु तेवढ्यानें त्यांच्या मनाला समाधान लाभेना. गांधीजींचा भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला होता. बाळासाहेबांना त्यांच्या नेतृत्वाचें आकर्षण वाटूं लागलें. कारण गांधीजी ही समन्वयमूर्ति होती. टिळकांचा लढाऊ बाणा, ना. गोखल्यांची अभ्यासु वृत्ति व सौम्यशीतलता आणि आगरकरांची समाजसुधारणेची तळमळ गांधीजींमध्यें एकवटलेली दिसत होती. आधीं राजकीय कीं सामाजिक, शठं प्रति शाठ्यं की सत्यं, हे सर्व वाद गांधीजींनीं पचवले होते. लढाऊ बाणा ठेवूनहि सौजन्य कायम ठेवतां येते, समाजसुधारणा करतां करतांच राजकीय दास्यविमोचनाची शक्ति उत्पन्न करतां येते, हें गांधीजी दाखवीत होते. चंपारण्याच्या व खेड्याच्या लढ्यांत हा सौजन्यशील लढाऊबाणा गांधीजींनीं दाखवला होता. विधायक कार्यावांचून निरंतर लढाऊ वृत्ति टिकवतां येत नाहीं, हें उघड दिसत होतें. खेरांना गांधीजींचें राजकारण पटलें व ते नकळत गांधीजींच्या परिवारांत सामील झाले.

बाळासाहेबांचा पिंड तसा भक्तिमार्गी. तुकारामानें त्यांच्या घडणींत फार मोठा भाग उचलला होता. मुंबई सरकारतर्फे पुढें श्री. पु. मं. लाड यांनीं संपादन केलेले तुकारामाच्या अभंगाचे भाग प्रसिद्ध झाले, ही बाळासाहेबांचीच मूळ कल्पना. धर्माचें रहस्य रंजल्या-गांजल्यांना आपंगिणें हें आहे, असा संस्कार बाळासाहेबांवर झालेला. स्वाभाविकतःच हरिजनांचा कळवळा त्यांना वाटूं लागला व हरिजनसेवेचें काम ते करूं लागले. परंतु एवढ्यांत १९३० सालचा अपूर्व संग्राम सुरू झाला. बाळासाहेब त्यापासून दूर राहणें शक्यच नव्हतें. विलेपार्ले येथील सत्याग्रही छावणींत ते काम करूं लागले. त्यांना कारावासहि घडला. १९३२ सालींहि पुन्हां ते कारागृहांत गेले. या काळांत त्यांना श्री. किशोरलाल मश्रुवाला यांचा सहवास लाभला. किशोरलाल भाई हे गांधी–विचारांचे फार मोठे भाष्यकार होते. ‘गांधी-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



अ.क्र. ३४३६८....... दि: ..................

.... नों दि: २१-१२-८४

विचार दोहन ' हा त्यांचा ग्रंथ गांधी विचारांवरील एक अप्रतिम ग्रंथ आहे. पाल्याला सत्याग्रही ग्रामसेवकांसाठीं जें विद्यालय होतें तेथेंच ह्या ग्रंथाची निर्मिति झाली. बाळासाहेब मनानें पूर्वीच गांधीपरिवारांत दाखल झाले होते. यावेळीं गांधी विचाराच्या सर्व पैलूंचें दर्शन त्यांना झालें आणि ते गांधीजींचे झाले.

वावटळींत पालापाचोळाहि गगनभराऱ्या मारतो, पण वावटळ ओसरली कीं तो पुन्हां निपचित जमिनीवर येऊन पडतो ! १९३२ ची चळवळ ओसरली आणि सत्याग्रह युद्धांत हिरीरीनें पडलेले पुष्कळसे लोक संसारजमा झाले ! पण बाळासाहेबांची वृत्ति मात्र आधिकच सेवापरायण झाली. हरिजनांना विभक्त मतदारसंघ देऊन त्या समाजाला हिंदु समाजापासून तोडूं नये म्हणून गांधीजींनीं प्राण पणाला लावले होते. या कामाचें अनन्य महत्त्व बाळासाहेबांना वाटूं लागलें. महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे ते अध्यक्ष बनले. कॉंग्रेसच्या दैनंदिन राजकारणापेक्षां या कामाचें महत्त्व त्यांना अधिक वाटूं लागलें. हरिजनांप्रमाणें आदिवासींची स्थितिहि फारच दयनीय होती. डोंगरकपारींत ते राहात. जंगल कंत्राटदार त्यांचा अमानुष छळ करीत. किमान मानवी गरजाहि त्यांना उपलब्ध नव्हत्या. हरिजनांचा समाज शहरांच्या परिसरांत वावरत असल्यानें त्यांची अवहेलना झाली तरी अविभाज्य हिंदु समाजाचा ते घटक होते. उलट आदिवासी शहरांपासून दूर रानावनांत राहात असल्यानें अवहेलनेच्या जोडीला उपेक्षाहि त्यांना भोगावी लागत होती. बाळासाहेब या आदिवासींची विचारपूस करूं लागले. हें विधायक कार्य त्यांना अत्यंत प्रिय असें होतें.

१९३७ सालीं विधिमंडळाचें राजकारण सुरू झालें. बाळासाहेब मुंबई विधिमंडळांत निवडून आले व गांधीजींच्या चाणाक्ष निवडीमुळें ते विधिमंडळांतील कॉंग्रेस पक्षाचे नेते झाले. मंत्रिमंडळाची खातेंवाटणी करतांना त्यांनीं शिक्षण-खातें स्वतःसाठीं निवडलें, हें त्यांच्या वृत्तीचें द्योतक आहे. शिक्षणांतूनच राष्ट्र घडत असतें, ही त्यांची भावना होती. शासनानें फारतर लोकांना मारूनमुटकून सन्मार्गी ठेवतां येईल, पण

शिक्षणानें सत्प्रेरणा निर्माण होईल व शासनाची उपयुक्तता कमी कमी होत जाईल, अशी बाळासाहेबांची भावना. इतरांना सत्ता गाजविण्याची इच्छा होती. बाळासाहेबांना सत्तेची आवश्यकताच राहूं नये, असें वाटत होतें. इंग्रज सरकारनें तलवार – तागडीच्या जोरावर देशाला गुलाम केलें असलें तरी इंग्रजी शिक्षणानें त्यांनीं येथील शासन बळकट केलें होतें. शिक्षणाचें हें अनन्य महत्त्व ओळखणारा हिंदुस्थानांतला एकच मुख्य प्रधान म्हणजे बाळासाहेब खेर !

शिक्षणमंत्री होतांच राष्ट्रीय चारित्र्य मुलांत निर्माण व्हावें म्हणून कितीतरी प्रगतिपर गोष्टी बाळासाहेबांनीं केल्या. शाळांतून गणवेश-पद्धति दाखल करून त्यांनीं समानतेचें बी पेरलें. शारीरिक शिक्षणाची दुर्दशा थांबविण्यासाठीं कांदीवलीला शारीरिक-शिक्षण महाविद्यालय स्थापन केलें व तो एक आवश्यक विषय केला. आजची परीक्षांची गैरसोयीची वेळ बदलण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. सरकारकडे तपासणीसाठीं आलेलीं पोतेवारीं पुस्तकें कुजत पडलीं होतीं, तीं नीट आवरून सावरून त्यांनीं प्रादेशिक मुक्तद्वार–ग्रंथालयें निर्माण केलीं. समाजशिक्षण योजना, प्रादेशिक विद्यापीठें, मूलोद्योगी शाळा, प्राथमिक शिक्षकांना लोकलबोर्डाच्या हाताखालून काढून घेऊन त्यांना सरकारी नोकरांचा दर्जा देणें व पगाराची सरकारतर्फे व्यवस्था करणें, असें कितीतरी उपक्रम त्यांनीं आपल्या कारकीर्दीत केले.

सज्जनाला राजकारणाच्या धकाधकींत फार हाल सोसावे लागतात. बाळासाहेबांचे त्यांच्या सहकाऱ्यांनीं कांहीं कमी हाल केले नाहींत ! कुटुंबांतल्या कर्त्या पुरुषाला आपलें कुटुंब कायम टिकविण्यासाठीं सदा पडतें घ्यावें लागतें, तशी बाळासाहेबांची स्थिति होई. आपण पक्षपाती नाहीं, हें सिद्ध व्हावें म्हणून ते जपत व त्यामुळें नकळत नको त्यांनाच पक्षपात होई ! बाळासाहेब गुजराती व कन्नड मंडळींना फार उदारता दाखवतात, महाराष्ट्रावर त्यामुळें अन्याय होतो, अशी भावना लोकांतहि पसरली होती. निःपक्षपातीपणासाठीं ते परधार्जिणेपणा करतात, अशीहि त्यांच्यावर टीका होत होती. शिवाय त्यांनीं अर्थ वा गृहखातें आपल्या हातीं न घेतां

निरुपद्रवी शिक्षणखातें आपल्या हातीं घेतलें, हाहि राग कांहींचा त्यांच्या-वर होता. आधीं मुनशी व नंतर मोरारजी हे गृहमंत्रिपद गाजवून आपणच शास्ते आहोंत, असा भाव निर्माण करीत तोहि लोकांना बोचक वाटे.

स्वातंत्र्याच्या उषःकालीं बाळासाहेब पुन्हां कर्तव्यभावनेनें मुख्य प्रधान झाले, परंतु मंत्रिमंडळांत दिसणाऱ्या अनुदार वृत्तीला ते लौकरच विटले आणि १९५२ च्या निवडणुकींत सर्वांचा आग्रह अव्हेरून त्यांनीं निवडणुकींत उभें राहण्याचेंच नाकारलें ! खारच्या नजीकच जे हरिजन दुर्दशेंत जीवन कंठीत होते त्यांचें जीवन सुधारण्याची तळमळ त्यांना लागून राहिली होती. त्या हरिजनांचा धंदा कातडें कमावण्याचा. तो त्यांनीं शास्त्रशुद्धपणें व किफायतशीर करावा म्हणून बाळासाहेबांनीं कातडें कमावणें व चामड्याच्या वस्तु तयार करणें यासाठीं दोन शाळा त्या भागांत उघडल्या. तेथें अन्य कामेंहि सुरू केलीं. परंतु त्यांच्यासारख्या नेक राज्यकर्त्याला असें रिकामें कोण राहूं देणार ? त्यांना इंग्लंडमध्यें भारताचे वकील म्हणून नेमण्यांत आलें. त्यांच्यापूर्वीं कृष्ण मेनन तेथें वकील होते. त्यांचा कारभार अनागोंदीचा, त्यांच्या कम्युनिस्टांकडील कलामुळें इंग्लंडच्या राजकीय वर्तुळांत त्यांच्या-बद्दल दुरावा, त्यामुळें बाळासाहेबांसारखा चोख कारभारी व सौजन्यशील वागणुकीचा मनुष्य तेथें भारतीय वकिलातीला प्रतिष्ठा आणून देईल, या कल्पनेनें त्यांची तेथें नेमणूक झाली. दोन वर्षांत त्यांनीं इंग्लिश जनतेचें व राज्यकर्त्यांचें प्रेम संपादन केलें. परंतु पत्नीच्या आजारामुळें ते आपलें पद सोडून भारतांत आले. त्यांना येथेंहि नाना अधिकारपदें देऊं करण्यांत आलीं पण त्यांनीं तीं नम्रपणें नाकारलीं. शेवटीं राजभाषा कमिशनचें अध्यक्षपद त्यांनीं स्वीकारलें. राष्ट्रभाषा प्रचाराशीं त्यांचा फार पूर्वींपासून संबंध होता. हें काम त्यांनीं अत्यंत चोखपणें पार पाडलें व आपला अहवाल सरकारला सादर केला.

घार आकाशांत घिरट्या घालीत असली तरी तिचें सारें लक्ष आपल्या पिलांपाशीं असतें, त्याप्रमाणें बाळासाहेब मुख्यमंत्री असोत, कीं लंडनला भारतीय वकील असोत खारच्या गलिच्छ वस्तींत अवहेलनेचें जीवन कंठणाऱ्या

हरिजनबंधूंचा त्यांना कधीं विसर पडला नाहीं. ह्या वस्तीचें नांवच मुळीं खेरवाडी असें पडलें आहे! राज्यांतील इतर वैभवाच्या फेऱ्यांत स्वत:ला गुंगवून मानवी पातळीखालीं जीवन कंठणाऱ्यांना विसरण्याची कला त्यांना अवगत झाली नव्हती! वैभवाच्या तळाशीं असलेली ही वेदना त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. 'अंत्योदयाखेरीज सर्वोदय नाहीं.' हें त्यांना पटलें होतें. त्यांनीं भारतांत परतल्यावर आपलें सर्व लक्ष खेरवाडीच्या विकासाकडे लावलें. तेथें एक कल्याण केंद्र सुरू केलें. शाळा आणली. त्या भागांतल्या लोकांना चार पैसे अधिक मिळावे म्हणून परिश्रमालय सुरू केलें. अंबर चरख्याचें शिक्षण सुरू केलें. ग्रामोद्योगी साबण व काड्याच्या पेट्या करण्याचे छोटे कारखाने तेथें उभारले. सत्कारक्षम मंडळींना ह्या अवहेलनेचें जीवन कंठणाऱ्या आपल्या बांधवांचें स्मरण सतत व्हावें म्हणून खेरवाडींत साप्ताहिक प्रार्थना, प्रवचनें त्यांनीं सुरू केलीं. परंतु एवढ्यानें त्यांना समाधान नव्हतें. खेरवाडींतील त्या उपेक्षितांच्या मध्येंच स्वत: जाऊन राहाण्याची तळमळ त्यांना लागून राहिली होती. परंतु मनाच्या उमेदीला शरीर साथ देत नव्हतें. वयाची साठी ओलांडली होती. 'तुका म्हणे आतां उरलों उपकारपुरता' ह्या अवस्थेंत त्यांना जगायचें होतें, पण त्यांना हृदयविकारानें घेरलें. मनांतील कामाच्या नाना योजना प्रत्यक्षांत आणण्याला पुरेसा अवसरहि त्यांना न देतां त्यांना मृत्यूनें झडप घालून उचलून नेलें. त्यांच्यासारखा रंजल्या-गांजल्यांना आपंगिणारा, अभ्यासू, तळमळीचा देशभक्त आणि अधिकार गाजविण्याची जराहि इच्छा नसणारा तत्त्वचिंतक शास्ता मिळणें कठिण आहे.

◎ ◎ ◎

# वेदाचे खंदे प्रचारक

भारतीय राज्यघटनेंत राष्ट्रभाषा हिंदीच्या स्वरूपासंबंधीं विवेचन करतांना तिचा विकास इतर भारतीय भाषांच्या सहकार्यानें होणार असल्याचा उल्लेख केला आहे. जर अशा प्रकारें राष्ट्रभाषेचा विकास व्हावयाचा तर त्या त्या भाषांच्या शैलींचा हिंदींत अंतर्भाव झाला पाहिजे; त्याचप्रमाणें त्यांचे सोपे सुटसुटित शब्दहि राष्ट्रभाषेंत दाखल झाले पाहिजेत. यासाठीं ज्यांची मातृभाषा हिंदी नाहीं अशा लेखकांनीं हिंदी भाषेंतून लिखाण करण्यास अधिकाधिक संख्येनें पुढें आलें पाहिजे. असें होईल तरच राष्ट्रभाषेंत हळूहळू भारताच्या भिन्नभिन्न प्रांतांतील जीवनाचें प्रतिबिंब दिसूं लागेल व जी समन्वयी संस्कृति आपण या देशांत निर्माण करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे ती पूर्ण होण्याच्या कामीं हिंदी भाषेचें साहाय्य होईल. यासाटीं ज्यांची मातृभाषा हिंदी नाहीं परंतु जे हिंदींतून लिखाण करतात अशा साहित्यसेवकांपैकीं एकाची निवड दर वर्षी करून त्याला १५०१ रुपयांचा पुरस्कार द्यावा, अशी सूचना बाबा राघवदास यांनीं राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या प्रमुखांना १९५० सालीं केली. समितीनें अहमदाबाद अधिवेशनांत या सूचनेला मान्यता दिली व १९५१ सालापासून दरवर्षी १५०१ रुपयांचें पारितोषिक देण्याचें ठरविलें. या पारितोषिकाला महात्मा गांधींचें नांव देणें उचितच होतें. गांधीजींनींच राष्ट्रभाषा प्रचाराचा पाया घातला. दक्षिण भारतांत त्यांच्याच प्रेरणेनें हिंदी प्रचाराचें कार्य चालू

झालें. १९५२ सालचा पुरस्कार पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांना देण्यांत आला.

पं. सातवळेकर यांचें नांव एखाद्या राजकीय नेत्याप्रमाणें गाजत नसलें व फार लोकांना ठाऊक नसलें तरी तें एक संशोधक वृत्तीचे वेदव्यासंगी गृहस्थ आहेत. शंभरीच्या घरांत असूनहि उत्साहानें वेदांचें संशोधन, वेदग्रंथांच्या प्रमाणभूत प्रति तयार करणें, वेदसूक्तांचा आजच्या जमान्यांतहि उपयोगी पडेल असा अर्थ लावणें, संस्कृत भाषेचा प्रचार करणें अशीं विविध कार्यें ते करीत असतात. पाश्चात्य देशांत वृद्धापकाळींहि जिज्ञासा, उत्साह, कार्याची तळमळ हे गुण दिसून येतात. परंतु आपल्याकडील सरासरी आयुष्यमान अगोदर आल्प. वृद्धापकाळ गांठणारे थोडे. त्यांतून 'अंगं गलितं पलितं मुडं' होऊं न देतां शरीर कार्यक्षम ठेवून भारभूत न होतां जनसेवा करण्यांत अखंड गूंतून राहाणारे कमी. वानप्रस्थ व संन्यास यांचे आदर्श आपल्या संस्कृतीनें घालून दिले असले तरी एक तर त्यांचा विपर्यास तरी झालेला दिसतो किंवा त्यांचें अस्तित्व कागदोपत्रीं राहिलेलें दिसून येतें! अशा समयीं लोकांना कर्मपरायणता शिकविणारे महर्षि अण्णासाहेब कर्वे, सेनापति बापट, पं. सातवळेकर हे वृद्ध तरुण कार्य करीत असलेले पाहून आश्चर्य वाटतें.

श्री. सातवळेकर यांचा जन्म सावंतवाडी संस्थानांतला विद्यार्थिदशेपासून संस्कृतची व वेदाध्ययनाची गोडी त्यांना होती. दक्षिणेकडे कोल्हापूर हें अनेक चळवळींचें केंद्र असल्यानें चळवळ्ये लोक आपोआप तेथें जमत. श्री. अण्णासाहेब विजापुरकरांच्या भोवतीं जी तरुण चळवळी मंडळी होती त्यांतच श्री. सातवळेकर होते. आण्णासाहेबांच्या विश्ववृत्ताशीं सातवळेकरांचा संबंध होता. वेदांतील प्रार्थनांसंबंधींच्या त्यांच्या एका लेखामुळें वा. म. जोशी व आण्णासाहेब यांना 'विश्ववृत्त' गुंडाळावें लागलें व जेलची हवा चाखावी लागली. पण सातवळेकर मात्र निसटले. त्यांनीं उत्तर हिंदुस्थानची वाट धरली. लाहोरला जाऊन त्यांनीं तेथें फोटोग्राफीचा व्यवसाय सुरू केला! वैदिक वाङ्मयाची सातवळेकरांना मुळांतच गोडी होती. त्याला पोषक

असें आर्यसमाजी वातावरण त्यांना तेथें लाभलें. आपला फोटोग्राफीचा व्यवसाय सांभाळून त्यांनीं वैदिक वाङ्मयाचें अध्ययन चालू ठेवलें. पं. सातवळेकर यांची प्रसिद्धि वेदाभ्यासी संशोधक म्हणूनच असली तरी ते उत्तम चित्रकारहि आहेत. हिंदुस्थानांतल्या कांहीं म्युझियम्समध्यें त्यांचीं चित्रें टांगलेलीं आहेत व तीं वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

'वेद' हेंच एक वेड त्यांच्या डोक्यांत असल्यानें वेदाध्ययन, वेदप्रचार यांना योग्य काळ व संधि येतांच त्यांनीं लाहोर व सिमला येथील आपला फोटोग्राफीचा व चित्रकलेचा सारा पसारा सोडला व ते औंधला आले. बाळासाहेब पंतप्रतिनिधींचा व त्यांचा स्नेह जमला. औंध येथें त्यांनीं 'स्वाध्याय मंडळ' नांवाची संस्था स्थापली व 'पुरुषार्थ' नांवाचें एक मासिक सुरू केलें. त्यांत वैदिक वाङ्मय व तदनुषंगिक अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण लिखाण ते लिहितात. औंध संस्थान विलीन झाल्यानंतर त्यांनीं आपला मुक्काम हलवला व सुरतजवळ अंबा पारडी येथें 'आनंदाश्रम' या नांवानें संस्था स्थापून आपलें कार्य चालू केलें.

पं. सातवळेकरांची वेदभक्ति विलक्षण आहे. वेदांचा प्रचार हें त्यांना आपलें जीवितकार्य वाटतें. एखाद्या मिशनऱ्याच्या तिडिकेनें ते वेदकार्य करीत असतात. भारतीय जनतेची वेदादि वाङ्मयापासून फारकत झालेली असल्या-मुळेंच ती आज सांस्कृतिक दृष्टीनें अवनत, पराक्रमशून्य, आळशी व अंधश्रद्ध बनली आहे, असें त्यांना वाटतें. काळ व परिस्थिति बदलली असली तरी वेदांपासून आजहि स्फूर्ति मिळूं शकेल व समाजाची पुनर्रचना करतां येईल, असा त्यांना विश्वास वाटतो. जनतेमधील अज्ञान दूर करून तिला वेद, गीता इत्यादींचें ज्ञान दिलें पाहिजे, अशी तळमळ त्यांना आहे. हें स्थान त्यांना द्यावयाचें तर वेदांचें अध्ययन सामान्य शिक्षितांनाहि करतां आलें पाहिजे. यासाठीं त्या वाङ्मयाचा प्रचार करावा म्हणून त्यांनीं मराठी, हिंदी व गुजराती साहित्य प्रसिद्ध करावयाला आरंभ केला. शुद्ध स्वरूपांत मूळ संहिता सर्वसामान्य लोकांना परवडेल इतक्या किंमतींत देण्याचें त्यांनीं ठरविलें. लोकांपुढें झोळी पसरण्यांत त्यांनीं कधीं लाज

मानली नाहीं ! समाजहिताचें कार्य करतांना तें चालविण्यासाठीं जनतेनें मदत केली तर ते त्यांचे उपकार नसून कर्तव्यच आहे. ही कर्तव्यभावना विस्मृत झाली असेल तर ती जागृत करतांना लाचारी वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. समाजसेवकांच्या कार्याचा व संसाराचा भार समाजानेंच घेतला पाहिजे. सातवळेकरांनीं हा मार्ग पत्करला आणि तो अजूनहि चालविला आहे. सबंध हिंदुस्थानच्या सामान्य जनतेसाठीं हिंदींतून त्यांनीं वेदवाङ्मय प्रचार सुरू केला. गुजराती भाषेंत मराठी पुरुषार्थाच्या धर्तीवरच 'वेदसंदेश' म्हणून मासिक ते काढतात. 'वैदिकधर्म' या नांवानें एक हिंदी मासिकहि निघतें. अशा एकांगी व अभ्यासपूर्ण वाङ्मयाला साधारणत: जेवढी लोकप्रियता असते तेवढीच त्यांच्या वाङ्मयाला आहे. 'बॅक टु वदोज् पुन्हां वेदांकडे' ही घोषणा आर्यसमाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांनीं केली होती. तेंच आपलें जीवितकार्य आहे, असें सातवळेकर मानतात.

सातवळेकरांनीं वेदांच्या सर्व उपलब्ध प्रतींची पाहाणी करून प्रथम एक शुद्ध प्रत तयार केली. परंतु वेदकालीं लेखनसामुग्री व लेखनक्रिया उपलब्ध नसल्यानें वेदाच्या मिळणाऱ्या प्रतींत पाठभेद येणें अपरिहार्य होतें. ज्ञानेश्वरांच्या काळापासून एकनाथांच्या काळापर्यंत लहानशा अवधींत, ज्ञानेश्वरीसारख्या लोकसुलभ ग्रंथांत जेथें अनेक पाठभेद झाले व नाथांना ज्ञानेश्वरीचें संपादन करून 'ज्ञानेश्वरी' बद्दल इशारा द्यावा लागला तिथें हजारों वर्षांचे वेद शुद्ध स्वरूपांत जतन करणें कठीणच. परंतु वेदांतील अर्थसंपृक्ततेमुळें वेद हा अभ्यासाचा एक अखंड विषय बनलेला आहे. मॅक्स मुल्लरसारख्या सिद्धहस्त संशोधकांकडूनहि 'वेदसंहिता' संपादन करतांना कांहीं दोष राहिले. मुखोद्गत रीतीनें जो ग्रथ जतन झाला, त्याची शुद्धता केवळ पोथ्यांतून न अजमावतां पं. सातवळेकर यांनीं वेगवेगळ्या प्रांतांतील वेदपाठक ब्राह्मणांकडून वेद म्हणवून घेतलें व लिखित वेदसंहिता सुधारल्या. मॅक्स मुल्लर आदींनीं 'स्थन्द्रा', 'मथ्ना' अशीं पदें शुद्ध म्हणून छापलीं होतीं. वेदपाठकांच्या मदतीनें ही पदें 'स्पन्द्रा',

' मथ्ना ' आहेत, असें सातवळेकरांनीं दाखवून दिलें. अशाप्रकारें वेदसंहिता संशोधून त्यांनीं त्या प्रसिद्ध केल्या. पुण्याच्या वैदिक संशोधक मंडळानें टिपण्याइत्यादींसह जो वेद तयार केला आहे त्याची किंमत साठ रुपयांवर आहे, तर एकाकी प्रयत्न करून श्री. सातवळेकर यांनीं वेदसंहिता संपादून त्या चारी वेदांच्या मूळ संहिता पहिल्या वेळीं केवळ ५ रुपयांत दिल्या होत्या ! युद्धकाळांत महागाई वाढली तरी चारी संहितांची किंमत त्यांनीं १४ रुपयेच ठेवली होती. ब्राह्मण, आरण्यक, उपनिषत्, रामायण महाभारत, गीता यांच्याहि शुद्ध संहिता सार्थ व स्वस्त देण्यासाठीं त्यांची धडपड चालू आहे. ह्या ग्रंथांचें हिंदी अनुवाद छापले जात आहेत. त्यांच्याच जोडीनें गुजराती व मराठी ग्रंथहि ते छापीत असतात. गीतेवरील त्यांची ' पुरुषार्थबोधिनी टीका ' प्रसिद्ध आहे. आजच्या लोक-कल्पनापेक्षां वेगळा व स्वतःच्या दृष्टीला अनुकूल असा गीतेचा अर्थ त्यांनीं ह्या टीकेंत विवरला आहे. हिंदींत वेद, महाभारत, गीता, उपनिषत्, योगसाधन इत्यादि विषयांवर त्यांचीं साठांवर पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत.

वेदांचा वारसा कायम टिकवावयाचा तर वेदांच्या संहिता शुद्ध स्वरूपांत व स्वस्त किंमतींत छापूनच भागणार नाहीं. त्यांचे अनुवाद छापून ते प्रसृत केलें तरी त्यामुळें वेदांसंबंधींचा एक विचारप्रवाह काय तो समजेल, जर वेदांचें अध्ययन स्वतंत्र रीतीनें व्हावयाचें असेल तर ह्या सामग्रीबरोबरच संस्कृतचा अभ्यास सहज रीतीनें करतां येईल अशी सोपीं पुस्तकें तयार झालीं पाहिजेत. संस्कृत जाणणारे लोक नसतील तर वेद हा पूजेंतील अनेक देवतांप्रमाणें एक देव बनेल ! पण वेद हें ज्ञान असल्यानें त्याची अशी विटंबना करणें योग्य नाहीं. वेदासाठीं संस्कृत आवश्यक म्हणून पं. सातवळेकर यांनीं संस्कृत पाठमालेचीं चोवीस पुस्तकें तयार केलीं आहेत व संस्कृतच्या परीक्षा सुरू केल्या आहेत. आजचें युग प्रमाण-पत्रांचें असल्यानें त्यांच्या परीक्षांना हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या प्रांतांतून तीन-चार हजार विद्यार्थी दरसाल बसत असतात.

प्राचीन काळीं अलिखित व सहजस्फूर्त वेदांचें रक्षण घनपाठी पद्धतीनें केलें गेलें. आज काळ बदलला आहे. विज्ञानाच्या शोधांमुळें माणसाचा वेळ जसा वाचूं लागला तसें त्याच्या अध्ययनाचे विषय व व्याप्तीहि वाढली. नव्या काळाला अनुसरून पूर्वीची घनपाठी परिपाठी आतां रद्द होणें अपरिहार्य आहे. सर्व विषय डोक्यांत कोंबून लक्षांत ठेवायचें म्हटलें तर तेंहि अशक्य. तेव्हां कांहीं मूलभूत गोष्टी लक्षांत ठेवून पुस्तकांचें साहाय्य घेतल्यानेंच हें व्यापक ज्ञान उपयोगीं पडावयाचें. त्यासाठीं हल्लीं सूचीकरणाचें एक शास्त्र निर्माण झालें आहे. कोणताहि मोठा ग्रंथ त्याच्या जितक्या विविध सूचि केलेल्या असतील तितका उपयोगी पडावयाचा. वेदोपनिषदादि विशाल ग्रंथांचा उपयोग करावयाचा तर त्यांची सूचि करणें आवश्यक आहे, हें पं. सातवळेकर यांनीं ओळखलें. हें सूचीकरणाचें काम अत्यंत जिकीरीचें व माणसाच्या चिकाटीची कसोटी पाहणारें असतें. परंतु आजच्या काळांत सूचीकरणावांचून ग्रंथांचा उपयोग होऊं शकत नाहीं. श्री. सातवळेकरांनीं सूचीकरणाचें काम चांगल्या प्रकारें केलें आहे. भगवद्गीतेंतील श्लोकप्रथमार्धांची सूचि आद्याक्षरांवरून तर त्यांनीं केली आहेच, पण अन्त्याक्षरांची व श्लोकांच्या शेवटच्या पंक्तींची सूचिहि त्यांनीं बनविली आहे.

वेद हे अंतःस्फूर्त आहेत. देश, जाति, वंश, धर्म यांचा संबंध मनांत न आणतां मानवाचा अतिमानव कसा करतां येईल, हाच एक विचार ऋषींच्या मनांत असल्यानें वेद हे मानवधर्माचा विचार करणारे आहेत. अशा या वेदांचें अध्ययन करणारे दुर्मिळ होत आहेत, हें पाहून त्यांनीं १९१८ सालीं ‘ स्वाध्याय मंडळ ’ ही संस्था स्थापन केली. १९३० पर्यंत वैदिक संहितांचें संशोधन करून त्यांनीं त्या प्रकाशित केल्या. १९४० मध्यें त्यांची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली. वेद शुद्ध स्वरूपांत नेहमीं प्रसिद्ध व्हावे म्हणून त्यांचे कायमचे ठसे बनवावे अशी त्यांची कल्पना आहे. वेद म्हणणारे दुर्मिळ होत असल्यानें आज जे वेद म्हणणारे उपलब्ध असतील त्यांच्या ग्रामोफोन रेकॉर्डसहि तयार करतां येतील. आजच्या काळांतहि वेद उपयोगी पडावयाचे तर त्यांच्या शब्दानुवादाच्या भानगडींत न पडतां वेद ग्रंथांचा

रहस्यानुवाद केला पाहिजे, असें ते मानतात व त्याच दृष्टीनें त्यांनीं अनुवाद केलेले आहेत. वेदांतील प्रत्येक ऋषीचे सर्व मंत्र एकत्र करून सानुवाद प्रसिद्ध करण्याची त्यांची कल्पना आहे. वेदाभ्यासासाठीं उपयोगी अशी सामुग्री हिंदी, मराठी, गुजराती व इंग्रजी या भाषांतून तयार करावी, असें त्यांना वाटतें. यासाठीं वेदविद्यालय काढण्याची त्यांची योजना आहे. वेदांचा व इतर ग्रंथांचा अर्थ लावण्याची त्यांची पद्धति विचित्र असेल, संतांसंबंधीं व बुद्ध – महावीर यांच्या संबंधींचीं त्यांचीं मतें न पटणारीं व विक्षिप्त वाटतील, परंतु तळमळीनें, चिकाटीनें ते अखंड कष्ट करीत असतात. आपल्या आवडीच्या विषयाचा त्यांनीं ध्यास घेतला आहे. मिशनरी वृत्तीनें ते काम करतात. त्यांनीं केलेल्या एवढ्या कार्यावर कदाचित् एखाद्या पाश्चात्य विद्यापीठानें त्यांना डॉक्टरेट दिली असती, पण पं. सातवळेकर एकाकी व पैशाची विवंचना करीत आपलें कार्य नेटानें चालवीत आहेत.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८३०८ ...... विः ..................
क्रमांक ..... ... . नों दि: २२-११-८८

# भलाईचे वतनदार

तुफान दर्यामध्यें एखादा दीपस्तंभ असावा, त्याप्रमाणें कांहीं माणसें राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्यें अचल राहून आपल्या प्रशांत व मंगल प्रकाशानें भोंवतालच्या दशदिशा उजळून दिङ्मूढ झालेल्यांना जीवनपथ दाखवीत असतात. अशा पुरुषांना राष्ट्रभेद, जातिभेद, धर्मभेद स्पर्श करूं शकत नाहींत. ' हें विश्वचि माझें घर ' अशी त्यांची वृत्ति असते आणि म्हणून अवघ्या विश्वाला ते आपलेसे वाटतात. वाङ्मयांत ज्याप्रमाणें क्षर आणि अक्षर वाङ्मय असा भेद आहे त्याप्रमाणें आपल्या समाजसुधारकांत व क्रांतिकारी पुरुषांतहि तात्कालिक व चिरकाल टिकणारे असे दोन ढोबळ भेद असतातच.

क्रांति सिंहिणीप्रमाणें आपलीं मुलें खाते, असें ट्रॉट्स्कीनें आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे. क्रांतिकारी अल्पकाळ अलोट पराक्रम, साहस व शौर्य गाजवतात, लोकोत्तर कामें करून दाखवतात; पण ही वीरश्री व हा बाणा जन्मभर सांभाळणें अत्यंत कठिण व दुष्कर असते. कालचे क्रांतिकारक आजचे मवाळ व सनातनी बनतात, असें आपण नेहमीं पाहतों. वृद्धपणीं लष्करीपेशा सोडावा, त्याप्रमाणें कांहीं दमूनभागून किंवा विटून आपला क्रांतिकारी पेशा सोडून देतात, कांहीं शारीरिक किंवा मानसिक रोगानें जर्जर होऊन पडलेले दिसतात. पण क्रांतिकारकाचें एकदां चढवलेलें चिलखत भूषणाप्रमाणें जन्मभर अंगावर वाहणारे व त्याला शोभेल असें चारित्र्य राखणारे अक्षर क्रांतिकारक फारच थोडे असतात.

अशीं माणसें ' दया-क्षमा-शांति ' यांचें माहेरघर बनतात व त्यांचें जीवन निरामय, निर्लोभ व आनंददायी बनतें. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत असा अक्षरक्रांतिकारक कोण, असा प्रश्न विचारला तर मला वाटतें कोणत्याहि पक्षाचा मनुष्य असला तरी पहिल्या तीन नांवांत तो सेनापति बापटांचें नांव घेईल.

जन्मजात उत्कृष्ट बुद्धिमत्ता व थोडीफार अनुकूलता त्यांना लाभली होती. विलायतेंत जाऊन यंत्रज्ञ व्हावें, ही मनीषा धरून ते इंग्लंडमध्यें गेले होते. परंतु भारतीय जनतेचें हीन-दीन-गुलाम म्हणून त्यांना जें दर्शन झालें तें त्यांना स्वस्थ बसूं देईना. आपलें जीवन देशसेवेसाठीं वाहण्याचा संकल्प करून गेलीं पन्नास वर्षें ते महाराष्ट्र जीवनांत उत्कटता, उदारता, पराक्रम, सेवावृत्ति आणि सहिष्णुता यावी म्हणून झटत आहेत. सेनापतींनीं आपल्या जीवनांत एका थोर गोष्टीची साधना यशस्वी केलेली आहे. सेनापतींच्या वागण्याचा अर्थ पुष्कळ वेळां सामान्य व्यावहारिक दृष्टीच्या लोकांना समजत नाहीं आणि ' सेनापति आहेत तरी कोण ? ' असा संभ्रम उत्पन्न होतो. समाजवाद्यांच्या मेळाव्यांत ते दिसतात. हिंदुसभा, आर. एस्. एस्. यासारख्या संस्थाशींहि त्यांचे संबंध आहेत, कम्युनिस्टहि त्यांना निषिद्ध नाहींत. आजचें युग पक्षीय राजकारणाचें आहे. पक्षीय राजकारणाच्या ठराविक सांच्यांत चापूनचोपून बसणारे लोक चांगले, अशी सर्वसाधारण पक्षीयांची अपेक्षा असते. शंभर टक्के निष्ठा पक्षावर पाहिजे व एकच पक्ष म्हणजे सत्पक्ष अशी हिरीरी पाहिजे. अशी अपेक्षा करणाऱ्या लोकांना सेनापति म्हणजे एक गूढ वाटतें. पण सेनापतींच्या जीवनाचें तेंच वैशिष्ट्य आहे. किंबहुना पक्षरहित दृष्टीनें सत्यदर्शन करण्याची त्यांची वृत्ति असल्यानेंच महाराष्ट्रांतील क्षुद्रता, अहंता दवडवून तेथें सहिष्णुता, उत्कटता यावी अशी त्यांची तळमळ आहे.

सेनापति म्हणजे संतसेनापति आहेत. संत आंतरिक झगडा करतो, सेनापति बाहेर युद्ध खेळतो. सेनापतींचा लढा अंतर्बाह्य असा उभयविध आहे. किंबहुना सेनापति म्हणजे महाराष्ट्रांतील सर्व प्रकारच्या लढ्यांतील

चैतन्य म्हटलें तरी चालेल. विलायतेंतून सेनापति भारतांत आले ते दहशतवाद्यांचे अग्रणी म्हणून आले! हिंदुस्थानांत बॉंबची कला आणणारे सेनापतीच व मुळशीच्या मावळ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध साम व शुद्ध सत्याग्रह करणारेहि सेनापतीच! १९३० च्या आंदोलनांतहि ते होतेच. १९४० सालीं युद्धविरोधी सत्याग्रहांत सेनापति होते आणि हैद्राबादमधील सत्याग्रहांतहि ते होते. ज्या ज्या लढ्यांशीं महाराष्ट्राचा संबंध आला त्या त्या लढ्यांत सेनापति होते. सेनापति केवळ राजकीय अन्यायांविरुद्ध लढत होते असें नाहीं; सामाजिक व आर्थिक अन्यायांच्या बाबतींत ते आघाडीवरच होते. मुंबईतील १९२० मधील भंग्यांच्या संपापासून तो १९५० च्या मिल मजदूर सभेच्या नेतृत्वाखालील कापड कामगारांच्या संपापर्यंत आर्थिक अन्यायांच्या सर्व लढ्यांत सेनापति अखंडपणें कामगारांच्या बाजूला उभे राहिले होते. सामाजिक क्षेत्रांत जातिवादाच्या व धर्माच्या नांवें होणारे अन्यायहि त्यांच्या नजरेंतून सुटले नाहींत. साने गुरुजींच्या अस्पृश्यता-निवारणाच्या दौऱ्यांत आणि गांधीजींच्या खुनानंतरच्या जातिवादविरोधी मोहिमेंत सेनापतींचा हिस्सा कांहीं लहान-सहान नाहीं. स्वातंत्र्य मिळालें कीं राजकीय अन्याय संपले असें अनेकांना वाटलें व अनेक स्वातंत्र्य वीरांची स्वातंत्र्य मिळतांच अवतारसमाप्ति झाली! परंतु परकी अंमल जाणें म्हणजेच स्वातंत्र्य नव्हे, परकी अंमलानंतर चतुर्विध स्वातंत्र्यें जनतेला उपभोगतां येण्यासारखी अवस्था निर्माण करण्याची गरज असते. ब्रिटिशांनीं येथील आपला गाशा गुंडाळल्यानंतर जनतेची नैतिक पातळी घसरल्याची ओरड पुढारी करतात, तर जनता पुढाऱ्यांतील सत्तास्पर्धेमुळें ही नैतिक पातळी खालावत आहे असें म्हणतें. ह्या दुष्टचक्रांतून मार्ग काढण्यासाठीं सत्तेपासून फटकून दूर राहाणारे व “ वरम् जनहितम् ध्येयम् , केवला न जनस्तुति ” असें म्हणून समाजाचें केवळ भाट न बनतां सेवेच्या साधनानें समाजांत आदराचें स्थान मिळवून जनतेच्या चुका दाखविण्याचा अधिकार मिळविणारे सेनापतींच्या सारखे थोर पुरुष हवे असतात. सेनापतींचें स्थान वत्सल मातेसारखें आहे. समाजजीवनाची सर्वांगीण शुद्धि, सत्तेपासून सर्वस्वीं अलिप्त

राहणारे लोकच करूं शकतात व समाजाची सहिष्णुता टिकवूं शकतात. सेनापतींचें समाजांतील स्थान हें अशा प्रकारचें आहे. त्यामुळेंच प्रत्येक पक्षांतील सत्प्रवृत्त लोक सेनापतींचा गौरव करतात. सेनापतींसारख्या पक्षभेदातीत सत्यग्रहणासाठीं तळमळणाऱ्या व्यक्तींचे सामाजिक महत्त्व थोड्यांना समजतें व त्यांची उपेक्षा होते. पण सेनापतींच्या सारखे संत क्रांतिकारक एकाकी व उपेक्षित होऊनच समाजाची थोर सेवा बजावीत असतात. समाज-जीवनाची शुद्धि सत्तेच्या मार्गानें कधींच होऊ शकत नाहीं. सत्ता जर लोकशाही स्वरूपाची असेल तर ती जनतेच्या सामान्य पातळीच्या फार पुढें जाऊं शकत नाहीं. विशेषत:. हिंदुस्थानसारख्या सर्व दृष्टींनीं मागासलेल्या दलित देशांत मोठाच बिकट प्रसंग उभा राहतो. तेव्हां समाजाला पुढें नेण्याचें, समाजाचें खरें शिक्षण करण्याचें कार्य अशा संतांनींच केलें तर होण्यासारखें आहे.

आपल्या हुशारीच्या आधारें विलायतेंतून शिक्षण घेऊन आल्यावर ते प्राध्यापक–इंजिनीयर झाले असते, परंतु त्यांनीं आपल्या देशांत असलेली कृतिवीरांची उणीव ओळखली होती. कृतिवीर होण्याचा त्यांचा निश्चय त्यांच्या विद्यार्थिदशेपासून दिसून येतो. ते इंग्लंडमध्यें असतांना लाला लजपतरायांना अटक झाली. अर्जविनंत्या, ठराव, चर्चा यांचें राजकारण सुरू झालें. सेनापति म्हणाले, “ या वायफळ गोष्टी बंद करा. तीन महिन्यांत जर लालाजींना नाहीं सोडलें तर ब्रिटिश पार्लमेंटवर बॉंब टाकला जाईल अशी कांहीं कृतीची योजना करा. ” त्यावेळेपासून तों आजतागायत त्यांच्यामध्यें ही वृत्ति दिसून येते. विद्यार्थी-शिक्षकांना राजकारणांत भाग घेण्याला प्रतिबंध करणारा एक हुकूम मध्यंतरी सरकारनें काढला होता. त्याच्या निषेधार्थ साने गुरुजींनीं प्राणांतिक उपवास करण्याचें ठरविलें. तेव्हां गुरुजींना उपवासापासून कसें परावृत्त करतां येईल याचा विचार सुरू झाला. सेनपाति म्हणाले, “ ह्या हुकुमाच्या निषेधार्थ आपापलीं शाळा-कॉलेजें सोडून पांचशें विद्यार्थी बाहेर पडून सेवेला वाहून घेणार असतील तरच गुरुजींना उपवास करूं नका म्हणण्याचा आपल्याला अधिकार ! ”

आपणहि कांहीं करावयाचें नाहीं आणि दुसरा कांहीं करीत असेल तर त्याला परावृत्त करावयाचें ही गोष्ट सेनापतींसारख्या कृतिवीराला कशी सहन होणार ? सेनापतींना कर्ममय जीवन आवडतें, अजूनहि ते आपल्या वाड्यांत व गल्लींत सफाईचें काम नित्य यज्ञाप्रमाणें करीत असतात.

**दिला झाडू, दिलें खोरें, दिलें खापर ते करीं**
**रस्ते गटारें झाडावीं, दिली ही मज चाकरी ॥**

श्रीहरीनें ही चाकरी दिली आहे असें ते मानतात.

सेनापति मूळचे राहणारे नगर जिल्ह्यांतील पारनेर तालुक्यांतले. पारनेर गांवीं त्यांचे एक बंधु राहात असत. दर वर्षी नगरला आले कीं ते पारनेरला दोन दिवस तरी जाऊन येत. १९४७ सालीं नगर जिल्ह्याच्या दक्षिण भागांत दुष्काळ होता. कर्जत, श्रीगोंदें वगैरे तालुक्यांत सरकारनें दुष्काळी कामें काढलीं होती. पारनेर गांवीं पण दुष्काळी कामें काढण्याची आवश्यकता होती, पण लोक कामावर येत नाहींत या सबबीवर दुष्काळी काम सरकारनें सुरू केलें नव्हतें. सेनापति नेहमींप्रमाणें दोन दिवसांसाठीं पारनेरला गेले होते. त्यांनीं जनतेचे हाल पाहिले व दुष्काळी कामें ताबडतोब सुरू करण्या-बद्दल जिल्हा अधिकाऱ्यांना कळविलें. चार दिवसांचे आंत पारनेर भोंवतालच्या गांवोगांव फिरून दुष्काळी काम सुरू होणार असल्याची त्यांनीं दवंडी दिली व स्वत: खोदण्याच्या कामास प्रारंभ केला ! आठ दिवसांत जवळजवळ एक हजार माणसें कामावर आलीं. आश्चर्य म्हणजे सेनापति स्वतः त्या मजुरांबरोबर काम करीत असत. पुढें कामावर येणाऱ्या महार-मांग वगैरेंचीं मुले सांभाळीत. त्यांच्यासाठीं गांवांत घरोघर फिरून भाकऱ्या गोळा करीत. पारनेर गांवीं आज गांवांतील विहिरींना पाणी दिसत असेल तर सेनापतींच्या नेतृत्वाखालीं सुरू झालेलें तळ्याचें काम पुरें झालें आहे म्हणूनच तें दिसत आहे. कुठेंहि दु:ख पाहिलें कीं त्यांना कळवळा येतो.

**मृदु सबाह्य नवनीत । ऐसें सज्जनांचें चित्त ।**
**ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ।**

**दया करणें जें पुत्रासि । तेचि दासा आणि दासी ।**
**तुका म्हणे वानूं किती । तेचि भगवंताची मूर्ति ।**

अशा वृत्तीचे सेनापति आहेत.

सेनापति सर्वत्र शिव दृष्टीनें पाहतात. सामान्य माणसांना जेथें संशय वाटतो त्या बाबतींत सेनापति संशयातीत असतात. वाईट गोष्टीहि हरीच्या नाटकांत चांगल्या उद्देशानेंच योजलेल्या असतात असें त्यांचें मत आहे. त्यांची शिवदृष्टि त्यांच्या आस्तिक्य बुद्धीमुळेंच सतत टिकून आहे.

**सुई शिवी वा उसवी शिवीलें**
**चाले जसें कां तिज चालविलें**
**सुई परी मी उसवी शिवीतो**
**चाले जसा चालक चालवितो**

असें सेनापति म्हणतात. सेनापतींची ही श्रद्धा पाहून महात्मा गांधी आणि अबदुल गफारखान यांची आठवण होते. इतकी ईश्वरशरणता ज्याच्या जीवनांत असेल त्याच्या जीवनांत दुःख ही वस्तूच कशी असेल ? गांधीजीहि ‘ त्याचे ’ गुलाम व्हावयाला सांगत. सेनापति एका ठिकाणीं म्हणतात, “ **हरीचा मी सदा बंदी, स्वातंत्र्य मुळीं ना मशी.** ” मी माझ्या जीवनाचीं सूत्रें श्रीहरीच्या स्वाधीन केलीं आहेत असें म्हणावयाला केवढी आस्तिक्य बुद्धि व निर्मळ जीवन लागतें ! हें असें वाहिलेलें जीवन असल्यानें द्वेष त्यांच्यापाशीं फिरकूंच शकत नाहीं. विश्वनाटकांत प्रत्येकानें आपली भूमिका ठरवून घ्यावी व तीच उत्कटतेनें वठवावी असें त्यांना वाटतें. अफजुलखानाची भूमिका ज्यानें घेतली त्यानें ती उत्कटतेनें पार पाडली तर विश्वनाटकांतला त्याचा भाग संपला ! सेनापतींच्या मनाची ही भूमिका आहे. ईश्वरावर त्यांचा भरंवसा किती आहे ? इतका कीं मध्यंतरी आपल्या जीवनांत जी नास्तिकता होती तीहि श्रीहरीचीच लीला असें त्यांना वाटतें ! इतका तो आस्तिक्य भाव आहे. त्यांच्या जीवनाचा हा रंग न समजल्यानें लोकांचा सेनापतींविषयीं गैरसमज होतो.

मागें सेनापति पुण्याला असतांनाची एक गोष्ट. आदल्या दिवशीं एक लफंगा मनुष्य त्यांच्याकडून दुसऱ्या एका सज्जन माणसाच्या नांवानें, दुसऱ्या दिवशीं आणून द्यायच्या बोलीनें, दहा रुपये घेऊन गेला. दुसऱ्या दिवशीं तो आला नव्हता. कोणी त्यांना म्हणाले, "तात्या, तो लफंगा मनुष्य आतां तुम्हांला कसले पैसे आणून देतो?" पण सेनापतींना त्या पैशांची चिंता नव्हती. ते म्हणाले, "तो आणून देतो म्हणाला आणि आला नाहीं त्यामुळें मला मोठी काळजी लागून राहिली होती. त्याला का अपघात झाला कीं आणखी कांहीं झालें वाटत होतें. तुम्ही सांगितलेंत आतां बरें वाटलें. काळजी तरी दूर झाली!" लफंग्यानें दहा रुपयांना टांग मारली म्हणून ज्या ठिकाणीं खेद वाटावा त्या ठिकाणीं सेनापतींना 'काळजी' दूर झाल्यानें आनंद वाटत होता! दुसऱ्या एका-वेळीं एकजण त्यांच्याकडे आला. आजारांतून नुकताच उठला होता सेनापति म्हणाले: "आजारी पडणें वाईट नाहीं, चांगलेंच असतें. त्यामुळें इतरां-विषयीं खरी सहानुभूति आपल्याला वाटतें. सह-अनुभूतीची शक्ति वाढणें म्हणजे मानवता वाढणेंच आहे!"

त्यानंतरचा एक प्रसंग. सेनापति तेव्हां शीवला रहात. सकाळीं नित्याप्रमाणें सेनापति सफाई करीत होते. ते म्हणाले, "ह्या भागांतल्या लोकांचें सफाईशीं फार सहकार्य असतें!" सेनापतींच्या बरोबर सफाईला तर दुसरें कोणीच नव्हतें. साहजिकच जवळच्या माणसाच्या तोंडावर प्रश्नचिन्ह उभें राहिलें. सेनापति पुढें म्हणाले, "इकडले लोक खूप घाण करून ठेवतात. त्यामुळें सफाईला खूप काम असतें. हें सहकार्य मोलाचें आहे!" घाण करणारांकडेहि सहकारी म्हणून पाहणारे सेनापति पाहून आश्चर्य वाटतें! सर्वांना ज्या ठिकाणीं ईश्वराच्या अवकृपेचा अंधार भासतो, ईश्वराची दयहीनता वाटते व त्याच्या अस्तित्वाविषयींहि संशय वाटतो, तेथेंच सेनापतींना ईश्वरी लीलेचें रुपेरी किरण दिसतात! घाण करणारांचेंहि सफाई करणाऱ्यांशीं सहकार्य आहे, असें त्यांना वाटतें

मराठी ... १२४०९

सेनापतींच्यापाशीं आत्मप्रत्यय आलेल्या तपस्व्याची दृष्टि आहे. त्यांच्यापाशीं आपपर भाव नाहीं. त्यांनीं शुद्ध सत्याग्रह करतांना जेव्हां शस्त्राचा उपयोग विपक्षाला जखमी करण्यासाठीं केला त्यावेळीं आपल्या प्राणाइतकाच दुसऱ्याचा प्राण मोलाचा वा तुच्छ असे ते समजले ! त्यांची वृत्ति देहातीत पाहण्याची आहे. स्वतःच्या देहाला ते फारशी किंमत देत नाहींत; दुसऱ्याच्या देहाची जर त्याच्या विकासार्थ आडकाठी होत असेल तर त्याचा देह दूर करणें ते धर्म मानतात ! त्यांच्या आत्मौपम्य वृत्तीचा दुसरा पुरावा म्हणजे अज्ञातवासांत असतांना त्यांनीं आपल्या पत्नीला व मित्राला लिहिलेलें पत्र ! त्यांनीं आपल्या पत्नीला पुन्हां विवाह करण्याला परवानगी दिली होती व मित्राला त्याबद्दल कळविलें होतें. दुसऱ्याचा विचार जो आपल्या इतक्याच उदारतेनें, सहृदयतेनें करतो तो सर्वांत सुसंस्कृत ! ही आत्मौपम्य दृष्टि सेनापतींच्यापाशीं आहे व हेंच त्यांचें वैशिष्ट्य आहे. आत्मौपम्य वृत्ति म्हणजे सर्वांना सारखें मानणें. सारखें मानणें म्हणजे सारखेंच वागवणें नव्हे. जर एका पहिलवानावर व एका काडी पहिलवानावर आपण सारखेंच ओझें लादूं लागलों तर ती समानताहि अन्यायाचीच होईल ! आत्मौपम्य वृत्ति म्हणजे मातेची वृत्ति. सर्वांच्या हिताची तिला सारखीच चिंता असतें व म्हणून धडधाकट मुलाकडे ती थोडें कमी लक्ष देतें व अशक्त मुलाला थोडें अधिक दूध देतें. ही तिची वागणूक विषमतेची नाहीं, उलट हा पक्षपातच अधिक न्यायाचा आहे ! सेनापतींची आत्मौपम्य बुद्धि निष्प्रेम नाहीं, ती मातेप्रमाणें वात्सल्यानें रंगलेली असते. दीनदलितांचा पक्षपात ते करतात असें लोकांना वाटतें, पण दीन जनांचा कळवळा हेंच आत्मौपम्य बुद्धीचें व्यक्त स्वरूप आहे.

सेनापतींच्या जीवनाचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची उत्कटता. 'उत्कट भव्य तें घ्यावें, मिळमिळीत अवघें टाकावें' अशी त्यांची वृत्ति आहे. त्यांना मिळमिळीतपणा कधींच आवडत नाहीं. हिंदुस्थान परकीयांच्या दास्यांत असतांना तरुण स्वस्थ बसलेले पाहून त्यांच्या जीवाचा भडका उडे.

**रक्ताळलें शरीर भडका जिवांत झाला**
**आईस सोडवाया येणार कोण बोला ?**

असा प्रश्न ते तेव्हां विचारीत. स्वातंत्र्याची किंमत चुकविल्याशिवाय बनियागिरीनें स्वातंत्र्य मिळविणें त्यांना मान्य नव्हतें.

**तेहतीस कोटी स्वतंत्र व्हाया, तेहतीस लाख तरी**
**देह होमिणें पडेल आम्हां, स्वतंत्रता समरीं ॥**

असें ते सर्व स्वातंत्र्य सैनिकांना बजावीत असत. उत्कटता हा त्यांच्या जीवनाचा विशेष आहे. तरुणांचा मुख्य गुण जर तोच म्हटला तर सेनापति आजहि तरुणांत तरुण ठरतील.

सेनापति कुठेंहि बांधलेले नाहींत. सेनापतींनीं स्वतःला कोठेंहि जखडून घेतलेलें नाहीं. त्यांनीं आपल्या एका पद्यांत म्हटलें आहे.—

**मैं न कवि हूँ, न हूँ पंडित, बात यह सच है तू न भूल**
**प्यारका कुछ काम करना, एक यही मेरा उसूल ॥**

सेनापति आपल्या जीवनांत प्रेमधर्माच्या प्रचाराचें काम अखंडपणें करीत आले. त्यांचें प्रेम पक्ष, जात, धर्म, अशा कोणत्याहि गोष्टींनीं खंडित झालेलें नाहीं.

भगवान् बुद्ध म्हणत, " मी मनोमशागत करीत असतों, मनाची शेती करतों. " सेनापति आयुष्यभर एकच काम करीत आले आहेत. आणि तें म्हणजे भलाईची वतनदारी. ' वतन ' ची भलाई ह्या वतनदारींत येऊनच जाते. सेनापतींच्या जीवनाचा संदेश ' मेरा वतन भलाई, मेरा वतन भलाई ' हाच आहे. हाच जप त्यांचा अखंड चालू असतो. त्या आपल्या कवितेंत सेनापति म्हणतात, " जगाचें भलें करणें हें माझें वतन आहे. देवानें जी मला बुद्धीची आणि सद्‌गुणांची शक्ति दिली आहे तिच्यासह मेहनत करून मला भलाई केली पाहिजे. ज्याची जशी दृष्टि तसें त्याला इतरांचें कर्तृत्व दिसतें. देवाची इच्छा एवढीच आहे कीं त्यानें जी बुद्धि दिली, तिला अनुसरून

आपण भलें करावें. माझ्या वाणीनें व करणीनें ईश्वराचा हा संदेश सर्वांना समजावून देणें हें माझ्या जीवनाचें ध्येय आहे. लोभाला व मोहाला माझ्या जीवनांत स्थान नाहीं. माझें जीवन मी कधींचेंच अर्पण केलें आहे. मी देवाचा आहे. मला कोणाची भीति ? देवाची सुद्धां मला भीति नाहीं. मी त्याचा आवडता, त्याच्या घरचा बुलबुल आहे. देवाच्या सर्व लेकरांची सेवा करणें म्हणजे पवित्र जीवन. हेंच एक मी शिकलों. हेंच माझें व्रत. हें व्रत मीं कधीं सोडणार नाहीं. सेवा कधीं विसरणार नाहीं. मी सदा आनंदांत असेन ! ”

ज्यानें स्वतःला भलाईचा गुलाम केलें आहे, सचाईचा गुलाम केलें आहे, श्रीहरीचा गुलाम केलें आहे त्याचें भाग्य कोठवर वर्णावें ? आणि ज्या देशांत देवाचे असे लाडके बुलबुल आहेत, त्या देशाचें भाग्यहि थोरच म्हटलें पाहिजे.

‘ मेरा वतन भलाई ’ असें म्हणणें, तसें वागणें हाच त्यांच्या जीवनाचा संदेश आहे. ज्या दिवशीं आपण हजारों नर-नारीबाळें हा घोष करूं व तो जीवनांत उतरवूं तो दिवस सेनापतींना समाधानाचा वाटेल.

◎ ◎ ◎

# आचार्य

गांधींच्या असहकारयुगांत सर्व हिंदुस्थानभर जे अनेक ध्येयवादी जीवनवीर निर्माण झाले त्यांपैकीं आचार्य जावडेकर हे महाराष्ट्रांतील प्रमुख जीवनवीर होते. १९२० च्या नागपूर येथील राष्ट्रीय सभेच्या आदेशाप्रमाणें त्यांनीं मुंबई विद्यापीठाला रामराम ठोकला. त्या वेळीं एम्. ए. चा अभ्यास करून परीक्षेला बसण्याच्या ते तयारींत होते. परीक्षेची फीहि त्यांनीं भरलेली होती. परंतु राष्ट्राची हांक येतांच त्यांनीं परीक्षेचा मोह बाजूला सारला व पदवीबरोबरच भौतिक प्रतिष्ठेकडेहि पाठ फिरवली.

त्यांचे वडील रावसाहेब जावडेकर या नांवानें ओळखले जात. ते स्वत: पदवीधर असून त्यांचा सर्व काळ दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानी राजकारणांत गेला. शंकररावांचा जन्म २६ सप्टेंबर १८९४ रोजीं विशाळगड संस्थानांतील मलकापूर येथें झाला. त्यांचे वडील त्या वेळीं महाराजांचे खाजगी चिटणीस होते. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय शिक्षणाचे आद्यप्रवर्तक प्रो. अण्णासाहेब विजापूरकर यांच्याशीं त्यांची मैत्री होती. ना. गोखले व लो. टिळक यांच्याशीं त्यांचे निकट संबंध होते. त्यामुळें विशाळगडकरांकडील नोकरी त्यांना सोडावी लागली आणि ते इस्लामपूर येथें येऊन राहिले. शंकररावांच्या मातु:श्री बालपणींच निवर्तल्यानें त्यांच्या वडिलांकडेच त्यांच्या मातेचेंहि काम आलें होतें. वाडिलांकडून त्यांना तीन वारसे मिळाले—राजकारणी बुद्धि, उदार

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अ. क्रम ३५३५५ दि: ..................
क्रमांक ................ लो. दि. २.३.२१५४

स्वभाव आणि जीवघेणा दमा! रावसाहेबांचा स्वतःचा संसार अगदीं बेताचा असतांनाहि त्यांचा मानलेला संसार फार मोठा होता. अनेकांना आपलें मानून त्यांच्यासाठीं त्यांनीं खस्ता खाल्ल्या आणि स्वार्थत्याग केला. संचयाची त्यांनीं कधीं इच्छा धरली नाहीं. ज्यांना आश्रय दिला त्यांच्या दोषांकडे कधीं पाहिलें नाहीं. अशा उदार स्वभावामुळें संस्थानी कारभारांत आयुष्याचीं बरींच वर्षें घालवूनहि ते गरीबच राहिले.

शंकरराव १९१२ सालीं मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊन डेक्कन कॉलेजांत दाखल झाले. तेथें देशभक्तीचे जिवंत धडे त्यांनीं घेतले. नागपूरचे दिवंगत कामगार पुढारी रुईकर हे त्यांचे सहाध्यायी आणि निकट मित्र. त्यांच्यांत देशसेवेची सतत चर्चा चाले. राजकारणाचा उभयतांनीं सखोल अभ्यास केला. १९१५ सालीं त्या उभयतांनीं ठरविलें कीं, शिक्षण संपल्यानंतर व्यक्तिगत सुखाच्या मागें न लागतां राष्ट्रकार्यांत पडावयाचें. राजकारणांतील भिन्न प्रवाहांचा त्यांचा अभ्यास चालू होता. राजकारणांतील कोणत्या प्रवाहाशीं आपण एकरूप व्हावयाचें यासंबंधीं त्यांचा खल चालू असतांच भारताच्या राजकीय क्षितिजावर म. गांधींचा उदय झाला. क्रांतिकारकांची स्वातंत्र्य आणि समता यांची तळमळ व स्वतःच्या बलावरचा भर आणि नेमस्तांच्या राजकारणांतील सौजन्य आणि बुद्धिवाद यांचा अप्रतिम संगम गांधींच्या मार्गांत झालेला दिसत होता. टिळक व गोखले यांच्या राजकारणांतील सर्व चांगुलपणा आत्मसात् करून गांधीविचार पुढें येत होता. समाजवादांतील आर्थिक क्रांतिकारकताहि त्यांत होती. गांधीजींच्या नवविचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता आणि त्यामुळेंच गांधींनीं असहकाराची घोषणा करतांच शंकररावांनीं तिला साद दिली आणि ते कॉलेज सोडून बाहेर पडले.

कॉलेज सोडल्यावर प्रथम ते इस्लामपूर येथें गेले. तेथून जवळच असलेल्या पेठ या गांवीं त्यांनीं हरिजनांसाठीं छात्रालय स्थापन केलें. ज्ञान प्रचाराचें त्यांचें कार्य चालू झालें. शंकरराव देव याच वेळीं राजकारणांत दाखल झाले होते. गांधीजींच्या क्रांतिकारी दर्शनाचें आकलन न झाल्यानें

लो. टिळकांचे वारसदार त्यांना विरोध करीत होते. त्या विरोधाला तोंड देणें ही फार अवघड गोष्ट होती. महाराष्ट्रांतील सुशिक्षित समाज या लोकांच्या आहारीं गेलेला व बहुजनसमाजांत राजकीय जागृतीचा अभाव. त्यामुळें तरुण कार्यकर्त्यांना बऱ्याच अडचणी होत्या. देव आणि जावडेकर यांचा परस्परांशीं फक्त परिचय झालेला होता. जावडेकरांचा पिंड हा तत्त्वचिंतक आचारसंपन्न क्रांतिकारकाचा, तर देवांचा राजकारणी नेत्याचा. जावडेकर काँग्रेसच्या ध्येयधोरणाशीं समरस झाले असले तरी एका बाजूला राहून तत्त्वचिंतन आणि विधायक कार्य यांत रममाण झाले होते. याबरोबरच त्यांनीं लेखनाचें कार्यहि हातीं घेतलें.

महाविद्यालयीन कालांत बी. ए. साठीं त्यांनीं तत्त्वज्ञान हा ऐच्छिक विषय घेतला होता आणि एम्. ए. ला अर्थशास्त्र आणि राजकारण हे विषय घेतले होते. राजकारणाला तत्त्वज्ञानाची बैठक आवश्यक आहे, असें त्यांचें विद्यार्थिदशेपासून मत होतें. तत्त्वज्ञानाचा त्यांचा अभ्यासहि एकांगी नव्हता. पाश्चात्य आणि भारतीय या उभय तत्त्वज्ञानांचा त्यांनीं अभ्यास केला होता. वेदान्त तत्त्वज्ञानांतील शांकर व रामानुजीय मतें त्यांनीं मूळ संस्कृतामधून जाणून घेतलीं होतीं. महाराष्ट्रांतील साधुसंतांच्या तत्त्व-विचारांशीं त्यांचा साक्षात् परिचय होता. ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ व रामदास यांच्या ग्रंथांचा त्यांचा व्यासंग होता. हिंदुस्थानच्या राजकीय व आर्थिक इतिहासाचे सखोल ज्ञान त्यांनीं संपादन केलें होतें. रानडे–राजवाडे आणि टिळक–आगरकर–गोखले इत्यादींच्या लेखनाचें त्यांनीं खोल परिशीलन केलें होतें. अर्थशास्त्रांतील व्यक्तिगत व समाजवादी या दोन्ही शाखांचा त्यांनीं सखोल अभ्यास केला होता. टिळकांचा आध्यात्मिक राष्ट्रवाद व आगरकरांची समताप्रधान बुद्धिनिष्ठा या दोहोंचेहि ते सारखेच उपासक होते. ‘ राजनीतिशास्त्रपरिचय ’ हा त्यांचा पहिला ग्रंथ. त्यांच्या या पहिल्या ग्रंथानेंच महाराष्ट्रांतील विद्वानांचें लक्ष वेधून घेतलें.

१९२४ सालीं बेळगांवच्या काँग्रेसला ते हजर राहिले. तेथें श्री. शंकरराव देवांशीं त्यांचा घनिष्ठ स्नेह निर्माण झाला. ‘ राजनीतिशास्त्र-

परिचया 'मुळें टिळक महाराष्ट्र विद्यापीठांत अध्यापन करण्यासाठीं त्यांना मुद्दाम पाचारण करण्यांत आलें. आचार्य भागवतांचा आणि त्यांचा स्नेह तेथें जमला आणि सतत वाढत गेला. तेथें 'राष्ट्रसंघटन' या नांवाच्या एका नव्या अभ्यासक्रमाची त्यांनीं आंखणी केली. त्यांत इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र या विषयांचा समावेश होता. पौरस्त्य व पाश्चिमात्य दोन्ही पद्धतींनीं हा अभ्यास व्हावा व बळकट तात्त्विक बैठक असलेले क्रांतिकारी वृत्तीचे समाजसेवक राजकीय क्षेत्रांत असावे, या दृष्टीनेंच त्यांनीं ही आंखणी केली होती. राष्ट्रीय शिक्षणाच्या वैचारिक संपत्तींत जावडेकरांनीं घातलेली ही फार मोठी भर समजली पाहिजे.

बेळगांव अधिवेशनानंतर म. गांधींचा महाराष्ट्रांत खादी–प्रचार दौरा होणार होता. शंकरराव देवांचें संघटनाचातुर्य आणि आचार्य जावडेकरांनीं गांधींच्या राजकारणाचें 'स्वराज्य' पत्रांतून केलेलें तात्त्विक, बुद्धिवादी आणि सडेतोड समर्थन यांमुळें महाराष्ट्रांतील प्रतिष्ठितांचा फारसा मन:पूर्वक सहयोग नसतांनाहि गांधींचा दौरा यशस्वी झाला. महाराष्ट्रांतील व्यक्तिनिष्ठेनें विकृत झालेल्या राजकारणाला जावडेकर आणि देव यांच्या कार्यामुळें क्रांतिकारी अधिष्ठान आणि संघटनाबल लाभलें. संकुचित विचारांतून तरुण पिढीला वांचविण्याचें थोर कार्य ह्या दोघांनीं फार मोठ्या प्रमाणावर केलें.

जावडेकरांच्या लेखनशैलींत प्रतिपक्षांचा उपहास किंवा त्यांच्या उद्देशां-बद्दल संशय कधीं व्यक्त होत नसे. प्रतिपक्षांचा त्यांनीं प्रखर समाचार घेतला, पण तो उच्च तात्त्विक पातळीवरून. त्यामुळें त्यांचें लेखन कधीं कोणाला बोचक झालें नाहीं; पण त्याचबरोबर त्यांच्या इतक्याच उच्च पातळीवरून त्यांच्या विचारांचें खंडनहि कोणी करूं शकला नाहीं. त्यांच्या अभ्यासांत सांप्रदायिकता कधींच नव्हती. सर्वांतील चांगला भाग आत्मसात् करून, त्याचा महासमन्वय करून जीवनतत्त्वज्ञान रचण्याची त्यांची वृत्ति होती. त्यांनीं कम्युनिझमचाहि सखोल अभ्यास केला होता. शुद्ध तत्त्वज्ञाना-बरोबरच व्यावहारिक बाजूचेंहि परिशीलन ते करीत. तत्त्व व व्यवहार या दोहो मिळूनच समग्र अभ्यास होत असतो, असें त्यांचें मत होतें.

‘ स्वराज्य ’ पत्राप्रमाणें इतरत्रहि त्यांनीं लेखन केलें. लोकशिक्षणांतील त्यांचें लेखन विशेषच स्मरणांत राहण्यासारखें आहे. जडवाद हा मार्क्सच्या विचारांचा प्राण आहे, हें मत त्यांनीं खोडून काढलें व मार्क्सच्या सामाजिक आर्थिक तत्त्वज्ञानाचा अध्यात्माशीं विरोध नाहीं, असें प्रतिपादन केलें. मार्क्स व गांधी यांच्या विचारांचा समन्वय आवश्यक व हितप्रद आहे, असें १९२८ सालींच त्यांनीं प्रतिपादन केलें होतें.

१९३० च्या सत्याग्रह संग्रामांत ते शिरोड्याच्या आघाडीवर गेले होते. तेथें अटक करून त्यांना रत्नागिरीच्या तुरुंगांत बंदिस्त करण्यांत आलें. ह्या काळांत दोन घटनांचा त्यांच्या जीवनावर फार खोल ठसा उमटला. एक म्हणजे त्यांच्या तुरुंगवासाच्या काळांत त्यांची सहा वर्षांची गोजिरवाणी मुलगी मृत्युमुखीं पडली व दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे म. गांधींच्या अहिंसादर्शनाचा त्यांच्या हृदयानें कायमचा स्वीकार केला. सत्याग्रहाच्या अहिंसक मार्गानेंच समाजवादाची प्रस्थापना होऊं शकेल, असा त्यांच्या बुद्धीचा अंतिम निर्णय झाला. तेव्हांपासून याच जीवननिष्ठेचा आविष्कार अधिकाधिक मनोरम रीतीनें त्यांच्या लेखणींतून घडला आहे.

१९३२ सालीं जावडेकरांना पुन्हा तुरुंगवास पत्करावा लागला. या वेळीं त्यांना नाशिकच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन प्रभृति तेथें एकत्रच होते. नाशिकच्या तुरुंगांत या काळांत सखोल असें तत्त्वमंथन चालू होतें. कदाचित् आधुनिक काळांत इतकें तत्त्वमंथन क्वचित्च कधीं झालें असेल ! मार्क्सवाद व गांधीविचार यांचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास तेथें त्या काळांत झाला. समाजवादी पक्षाचा तेथें पाया घालण्यांत आला. हा समाजवाद पाश्चात्यांची संपूर्ण उसनवारी करणारा असा नव्हता. कॉंग्रेस ही राष्ट्रीय स्वातंत्र्याची आघाडी प्रभावी करीत असतांनाच तिला समाजवादाची दीक्षा द्यावी, असा प्रयत्न करणारांचा तो पक्ष होता. गांधीजींच्या विचारांतील अहिंसक क्रांतिशास्त्राचा तत्त्व म्हणून जरी या नव्या पक्षानें तेव्हां स्वीकार केला नाहीं, तरी त्याची व्यावहारिक अपरिहार्यता त्यांनीं मान्य केली होती.

परिचया 'मुळें टिळक महाराष्ट्र विद्यापीठांत अध्यापन करण्यासाठीं त्यांना मुद्दाम पाचारण करण्यांत आलें. आचार्य भागवतांचा आणि त्यांचा स्नेह तेथें जमला आणि सतत वाढत गेला. तेथें 'राष्ट्रसंघटन' या नांवाच्या एका नव्या अभ्यासक्रमाची त्यांनीं आंखणी केली. त्यांत इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र या विषयांचा समावेश होता. पौरस्त्य व पाश्चिमात्य दोन्ही पद्धतींनीं हा अभ्यास व्हावा व बळकट तात्त्विक बैठक असलेले क्रांतिकारी वृत्तीचे समाजसेवक राजकीय क्षेत्रांत असावे, या दृष्टीनेंच त्यांनीं ही आंखणी केली होती. राष्ट्रीय शिक्षणाच्या वैचारिक संपत्तींत जावडेकरांनीं घातलेली ही फार मोठी भर समजली पाहिजे.

बेळगांव अधिवेशनानंतर म. गांधींचा महाराष्ट्रांत खादी-प्रचार दौरा होणार होता. शंकरराव देवांचें संघटनाचातुर्य आणि आचार्य जावडेकरांनीं गांधींच्या राजकारणाचें 'स्वराज्य' पत्रांतून केलेलें तात्त्विक, बुद्धिवादी आणि सडेतोड समर्थन यांमुळें महाराष्ट्रांतील प्रतिष्ठितांचा फारसा मन:पूर्वक सहयोग नसतांनाहि गांधींचा दौरा यशस्वी झाला. महाराष्ट्रांतील व्यक्तिनिष्ठेनें विकृत झालेल्या राजकारणाला जावडेकर आणि देव यांच्या कार्यामुळें क्रांतिकारी अधिष्ठान आणि संघटनाबल लाभलें. संकुचित विचारांतून तरुण पिढीला वांचविण्याचें थोर कार्य ह्या दोघांनीं फार मोठ्या प्रमाणावर केलें.

जावडेकरांच्या लेखनशैलींत प्रतिपक्षांचा उपहास किंवा त्यांच्या उद्देशां-बद्दल संशय कधीं व्यक्त होत नसे. प्रतिपक्षांचा त्यांनीं प्रखर समाचार घेतला, पण तो उच्च तात्त्विक पातळीवरून. त्यामुळें त्यांचें लेखन कधीं कोणाला बोचक झालें नाहीं; पण त्याचबरोबर त्यांच्या इतक्याच उच्च पातळीवरून त्यांच्या विचारांचें खंडनहि कोणी करूं शकला नाहीं. त्यांच्या अभ्यासांत सांप्रदायिकता कधींच नव्हती. सर्वांतील चांगला भाग आत्मसात् करून, त्याचा महासमन्वय करून जीवनतत्त्वज्ञान रचण्याची त्यांची वृत्ति होती. त्यांनीं कम्युनिझमचाहि सखोल अभ्यास केला होता. शुद्ध तत्त्वज्ञाना-बरोबरच व्यावहारिक बाजूचेंहि परिशीलन ते करीत. तत्त्व व व्यवहार या दोहो मिळूनच समग्र अभ्यास होत असतो, असें त्यांचें मत होतें.

'स्वराज्य' पत्राप्रमाणें इतरत्रहि त्यांनीं लेखन केलें. लोकशिक्षणांतील त्यांचें लेखन विशेषच स्मरणांत राहण्यासारखें आहे. जडवाद हा मार्क्सच्या विचारांचा प्राण आहे, हें मत त्यांनीं खोडून काढलें व मार्क्सच्या सामाजिक आर्थिक तत्त्वज्ञानाचा अध्यात्माशीं विरोध नाहीं, असें प्रतिपादन केलें. मार्क्स व गांधी यांच्या विचारांचा समन्वय आवश्यक व हितप्रद आहे, असें १९२८ सालींच त्यांनीं प्रतिपादन केलें होतें.

१९३० च्या सत्याग्रह संग्रामांत ते शिरोड्याच्या आघाडीवर गेले होते. तेथें अटक करून त्यांना रत्नागिरीच्या तुरुंगांत बंदिस्त करण्यांत आलें. ह्या काळांत दोन घटनांचा त्यांच्या जीवनावर फार खोल ठसा उमटला. एक म्हणजे त्यांच्या तुरुंगवासाच्या काळांत त्यांची सहा वर्षांची गोजिरवाणी मुलगी मृत्युमुखीं पडली व दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे म. गांधींच्या अहिंसादर्शनाचा त्यांच्या हृदयानें कायमचा स्वीकार केला. सत्याग्रहाच्या अहिंसक मार्गानेंच समाजवादाची प्रस्थापना होऊं शकेल, असा त्यांच्या बुद्धीचा अंतिम निर्णय झाला. तेव्हांपासून याच जीवननिष्ठेचा आविष्कार अधिकाधिक मनोरम रीतीनें त्यांच्या लेखणींतून घडला आहे.

१९३२ सालीं जावडेकरांना पुन्हा तुरुंगवास पत्करावा लागला. या वेळीं त्यांना नाशिकच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन प्रभृति तेथें एकत्रच होते. नाशिकच्या तुरुंगांत या काळांत सखोल असें तत्त्वमंथन चालू होतें. कदाचित् आधुनिक काळांत इतकें तत्त्वमंथन क्वचित्च कधीं झालें असेल ! मार्क्सवाद व गांधीविचार यांचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास तेथें त्या काळांत झाला. समाजवादी पक्षाचा तेथें पाया घालण्यांत आला. हा समाजवाद पाश्चात्यांची संपूर्ण उसनवारी करणारा असा नव्हता. कॉंग्रेस ही राष्ट्रीय स्वातंत्र्याची आघाडी प्रभावी करीत असतांनाच तिला समाजवादाची दीक्षा द्यावी, असा प्रयत्न करणारांचा तो पक्ष होता. गांधीजींच्या विचारांतील अहिंसक क्रांतिशास्त्राचा तत्त्व म्हणून जरी या नव्या पक्षानें तेव्हां स्वीकार केला नाहीं, तरी त्याची व्यावहारिक अपरिहार्यता त्यांनीं मान्य केली होती.

जावडेकरांनीं सत्याग्रही समाजवादाचें जें सथित काढलें होतें, त्याची अस्पष्टशी छाया ह्यांत दिसून येते. जावडेकरांच्या विचारांवरच गोरे, एस्. एम्. प्रभृतींचें पोषण झालें. महाराष्ट्रांतील समाजवादी नेत्यांना जावडेकरांचें ऋण कधींच विसरतां येणार नाहीं. भारतीय समाजवादी पक्षानें सर्वोदयाचें अंतिम ध्येय मान्य करावें व गांधीवाद्यांनीं व्यावहारिकदृष्ट्या आज तरी सर्वोदयाला लोकशाही समाजवादाचेंच रूप येणार आहे हें ओळखावें, असें त्यांचें मत होतें. विनोबांना जयप्रकाशांनीं जीवनदान केलें आणि विनोबांनींहि आर्थिक समतेचें आंदोलन अहिंसक मार्गानें यशस्वी करण्याचा अभिनव मार्ग काढला यामुळें आचार्यांना आपल्या तत्त्वविवेचनांतील अचूकपणा सिद्ध झाल्याचें समाधान मिळालें असल्यास नवल नाहीं.

आचार्यांचें व्यक्तिजीवन त्यांच्या वैचारिक जीवनाशीं योग्य अनुबंध राखणारें होतें. रवींद्रनाथांच्या 'साधना' या ग्रंथाच्या वाचनानें आपण अस्तिक बनलों असें ते सांगत. त्यांच्या तर्ककर्कश बुद्धिवादाच्या बुडाशीं भक्तीचा जिव्हाळा असे.

पत्रसृष्टीशीं जावडेकरांचा अखेरपर्यंत अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. शिवराम महादेव परांजप्यांचें 'स्वराज्य' पत्र देवांनीं चालवावयास घेतलें तेव्हां त्याच्याशीं त्यांचा घनिष्ठ संबंध होता. १९३०–३२ च्या चळवळींत तुरुंगवास भोगून बाहेर आल्यावर आचार्य १९३४ सालीं मुंबईच्या 'नवशक्ति' दैनिकाचे पहिले संपादक झाले. वर्षभरानें पुण्याहून 'लोकशक्ति' निघाली तेव्हां मुंबई सोडून तिचीं संपादकीय सूत्रें हातीं घेण्यासाठीं ते पुण्याला आले. 'लोकशक्ति' चे ते अनेक वर्षें संपादक होते. दैनिक विचारपत्र असेंच 'लोकशक्ति' बद्दल लोकांचें तेव्हां मत होतें. आचार्यांचें सडेतोड व मूलग्राही तत्त्वविवेचन अग्रलेखांत असल्यानें 'लोकशक्ति' हें राजकीय अभ्यासाचें साधन बनलें होतें. जावडेकरांच्या लिखाणामुळें महाराष्ट्रांतील तरुण वर्ग जातीयतेच्या विखारापासून वांचला आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य व सत्याग्रही समाजवाद ह्या निष्ठा त्यानें ग्रहण केल्या. 'लोकशक्ति' चालकांशीं पुढें वैचारिक मतभिन्नता दिसून येतांच त्यांनीं संपादकत्व

सोडलें. कोल्हापूरहून निघणाऱ्या ‘अखंड भारत’ साप्ताहिकांत ते नियमानें त्यानंतर कांहीं दिवस लेखन करीत.

महाराष्ट्रांत राष्ट्रीय विचारांचा सार्वत्रिक प्रसार व्हावा, यासाठीं सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेची स्थापना झाली. मराठींतील कितीतरी उत्कृष्ट असे ग्रंथ मालेमार्फत प्रकाशित झाले आहेत. मालेच्या पुस्तकांच्या संपादनाची जबाबदारी आचार्य जावडेकर व आचार्य भागवत यांच्यावर असे. त्यांच्या कसोट्यांना उतरणारे ग्रंथ मराठीला वैभवासारखे न ठरते तरच नवल! सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेसाठीं इतरांचीं पुस्तकें निवडण्या-संपादण्याचेंच काम त्यांनीं केलें असें नाहीं, तर दीर्घ व्यासंगानें ‘आधुनिक भारता’सारखा अमर ग्रंथहि त्यांनीं लिहून या मालेतर्फे १९३८ सालीं प्रसिद्ध केला. जावडेकरांच्या ग्रंथलेखनामुळें विद्यापीठांत बंदिस्त झालेलें ज्ञान सर्वसामान्य जिज्ञासु मराठी वाचकांसाठीं उपलब्ध झालें. ‘आधुनिक भारत’ या ग्रंथाच्या गुजराती व हिंदी आवृत्त्याहि मराठीप्रमाणेंच लोकप्रिय ठरल्या; एवढेंच नव्हे तर ‘आधुनिक भारता’चा त्रोटक सारांश जेव्हां परप्रांतीय इतिहास–संशोधकांच्या हातीं पडला तेव्हां जावडेकरांचें सूक्ष्म विवेचन, प्रगाढ पांडित्य आणि इतिहासाचे प्रवाह जाणण्याची प्रज्ञा पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. हा असा अमोल ग्रंथ इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध न झाल्यानें आपण या ज्ञानाला वंचित राहिलों, अशी त्यांना खंत वाटली. प्रा. वा. म. जोशी हा ग्रंथ वाचून म्हणाले होते : “गीतारहस्यानंतर प्रसिद्ध झालेला महत्त्वाचा मराठी ग्रंथ म्हणून ‘आधुनिक भारताची’ गणना करावी लागेल.”

मानवी समाजाचीं पूर्णतेचीं स्वप्नें कधीं काळीं यशस्वी व्हायचीं असतील तर अहिंसेच्या साधनाचा विकास होत गेला पाहिजे, असें त्यांचें विचारांतीं बनलेलें मत होतें. युरोपीय संस्कृति भौतिक जडवादाच्या व हिंसात्मक साधनांच्या इतकीं आहारीं गेली आहे कीं, आपला नाश टाळण्याचें सामर्थ्य तिच्यांत उरलेलें नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिस्वातंत्र्य, समता, लोकसत्ता इत्यादि जीवनमूल्यांचा युरोपनें आविष्कार केला खरा, पण या सर्व मूल्यांच्या मुळाशीं असणाऱ्या नैतिक सामर्थ्याची त्यानें उपेक्षा

व अवहेलना केली. युरोपचीं उदार सांस्कृतिक मूल्यें मानवासाठीं जतन करण्याची आवश्यकता आहे, पण त्यासाठीं आध्यात्मिक बलाची जोपासना झाली पाहिजे. गांधींच्या अहिंसावादांत हें आध्यात्मिक बल निर्माण करण्याचें सामर्थ्य आहे आणि म्हणून सत्याग्रही भारतच जगाला वरील मूल्यांचा लाभ करून घेण्याचा मार्ग दाखवूं शकेल, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती.

'नवभारत' मासिकाची संस्थापना करण्याचा देवांनीं संकल्प सोडला तेव्हां साहजिकच आचार्य जावडेकर व भागवत यांचीं नांवें संपादक म्हणून पुढें आलीं. उभयतांनीं त्या मासिकाचें संपादकत्व पत्करलें. साने गुरुजी असतांना आरंभीं जावडेकरांचे लेख, प्रवचनें, भाषणें यांचें वृत्तान्त साधनेंत येत असत. साधनेचें तें भूषण होतें. पुढें स्वतः गुरुजी अग्रलेख लिहिनासे झाले. आचार्य जावडेकरांचे लेखच अग्रलेख म्हणून पुष्कळ वेळां साधनेंत येत असत. सत्याग्रह व समाजवाद यांच्या समन्वयाचीच गुरुजींचीहि दृष्टि होती. 'I am synthesis of all' असें साने गुरुजी स्वतःबद्दल म्हणत. जावडेकरहि समन्वय-विचारांचेच. त्यामुळें साहजिकच साने गुरुजींच्या निर्याणानंतर रावसाहेबांच्या बरोबरीनें आचार्य जावडेकरांनींहि साधनेच्या संपादकत्वाची जबाबदारी पत्करली.

आचार्यांचा विद्यार्थ्यांशीं पूर्वापार घनिष्ठ संबंध. बाहेर असो वा जेलमध्यें, त्यांचें ज्ञानदानाचें कार्य अखंड चाललेलें असे. राष्ट्रीय शाळा बंद पडल्यानंतर सेवादलानें राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य अंगावर घेतलें. तरुणांच्या भावनांशीं समरस होण्याची जावडेकरांची शक्ति अद्वितीय होती. त्यामुळें सेवादलाचे ते प्रारंभापासूनच मार्गदर्शक होते. काँग्रेसश्रेष्ठींची इतराजी पत्करून सेवादलानें आपली स्वायत्तता जतन करावयाचें ठरविलें, तेव्हां पुष्कळ मंडळी दलापासून दूर झाली. त्या कठिण कालांतहि आचार्य जावडेकर, रावसाहेब पटवर्धन आणि अण्णासाहेब सहस्रबुद्धे प्रभृति थोर कार्यकर्त्यांनीं सेवादलाच्या संगोपनाची जबाबदारी पत्करली व पारहि पाडली. काँग्रेसशीं दोन हात करण्याला निघालेल्या विरोधी पक्षांना आपलें जीवन कंठणें किती दुष्कर होत आहे, हें दिसतच आहे; पण असें असूनहि

काँग्रेसचा विरोध पत्करूनहि सेवादल उभें राहिलें त्याला या त्रयीचा पाठिंबा बऱ्याच अंशीं कारणीभूत आहे, असें म्हटलें पाहिजे.

१९४७ सालीं कोरगांवकर निधीची योजना अमलांत आली. विचार-भेद असले तरी भ्रातृभाव आणि सौहार्द कायम टिकावें व कार्यकर्त्यांना आपलें कार्य निर्वेधपणें, प्रापंचिक अडचणी निवारून करतां यावें, यासाठीं निधीची ही योजना. श्री. शंकरराव देव आणि आचार्य जावडेकर यांच्यांत विचारभिन्नता असली तरी कोरगांवकर निधीमुळें सतत वैचारिक संबंध राहिला. महाराष्ट्रांतील विचारवंतांचें स्नेहसंमेलन दरवर्षीं कोरगांवकर निधीतर्फें होत असतें. त्यवेळीं होणाऱ्या चर्चा आणि वादविवाद यांचें संचालन सामान्यतः जावडेकरच करीत. 'नवभारत' मासिक आणि 'कोरगांवकर निधि' यांच्यामुळें महाराष्ट्रांतील वैचारिक जगतांत सहिष्णुतेचें वातावरण टिकून रहाण्याला फार मदत झाली आहे. या कार्यांत आचार्य जावडेकरांचा वांटा फार मोठा होता.

आचार्यांनीं व्रतांचें स्तोम स्वतःच्या जीवनांत कधीं माजवलें नाहीं, पण त्याचबरोबर व्रतनिष्ठांची निंदानालस्तीहि त्यांनीं कधीं केली नाहीं. त्यांच्या जीवनांत गाजावाजा न करतां व्रतसाधना चाले. अपरिग्रहाचें व्रत तर त्यांनीं आदर्श रीतीनें चालविलें. समाजवाद्यांनींहि या बाबतींत त्यांचें उदाहरण गिरवावें ! १९४७ सालीं कोरगांवकर ट्रस्ट स्थापन झाला. ह्या निधीतर्फें पक्षभेद न करतां कांहीं कार्यकर्त्यांना मानधन देण्याची योजना होती. आचार्यांना अशी विनंति करण्यांत आली कीं, त्यांनीं १०० ते १५० रुपयांच्या दरम्यान आवश्यक ती रक्कम घ्यावी. पण आचार्यांनीं फक्त ७५ रुपयांचीच मागणी केली ! त्यांना पुढें पुन्हा अशी विनंती करण्यांत आली कीं, लेखनावर त्यांना कांहींच प्राप्ति होत नाहीं, तेव्हां त्यांनीं त्यांची रक्कम वाढविण्याची निधीला परवानगी द्यावी. पण आचार्यांनीं त्यालाहि नकार दिला. त्यांचें लेखन हा त्यांच्या तत्त्वचिंतनाचा सहज आविष्कार होता. त्यामुळें लेखनाच्या मोबदल्याची अपेक्षा त्यांनीं फारशी कधीं केली नाहीं.

स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्वातंत्र्यासाठीं होणाऱ्या लढ्यांत सामील होणें आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्याग्रहाच्या साधनानें लोकशाही समाजवादाची स्थापना व्हावी म्हणून चाललेल्या चळवळींत सामील होणें हा परमधर्म आहे. परमधर्मांत आपण स्वधर्माच्याच साधनानें सामील व्हावें लागतें. परमधर्माचा साक्षात्कार झाला परंतु स्वधर्माचें भान राहिलें नाहीं तर त्या परमधर्माच्या कार्यांतहि विफलता आणि निराशा येते. परंतु जो आपला स्वधर्म ओळखून परमधर्माच्या कार्यांत सामील झाला त्याचा उत्साह निरंतर वाढतच असतो, त्यांच्या जीवनांत परम समाधान नांदतें. आचार्य जावडेकर आणि अन्य बरेच कार्यकर्ते यांच्यांत हाच मूलभूत फरक होता. समाजशिक्षण आणि राजकीय कार्यकर्त्यांना व नेत्यांना मार्गदर्शन हाच आपला स्वधर्म आहे, हें आचार्यांनीं जाणलें होतें. त्यामुळें राजकीय पक्षकार्यांत जरी ते पुढारीपणानें सामील झाले नाहींत तरी राजकीय पुढाऱ्यांना त्यांनीं सतत आणि प्रभावी मार्गदर्शन केलें. आचार्यांना स्वधर्माचें ज्ञान झालें होतें व त्याच्याच साह्यानें ते परमधर्माची साधना करीत होते. त्यामुळेंच त्यांचें जीवन गंगौघाप्रमाणें संथ शांत राहिलें.

◎ ◎ ◎

# विधायक पुरुषार्थी

नेमस्तांची सहिष्णुता व सर्व बाजूंनीं विचार करण्याची पद्धत, क्रांतिकारकांप्रमाणें स्वतःच्या ऐहिकाविषयीं बेफिकीरी व वाटेल त्या दिव्यांतून जाण्याची तयारी आणि सत्याग्रहींची निरंतर सोशिकता क्वचित्‌च एकत्र पाहायला मिळतात. सहिष्णु असतात ते ‘ हेंहि खरें नि तेंहि खरें ’ म्हणून तडफेनें कुठल्याहि कामाला भिडत नाहींत. क्रांतिकारक उतावीळ असतात त्यामुळें सर्व बाजूंनीं विचार करून व सर्वांशीं सल्लामसलत करून काम करण्याचें संघटनाचातुर्य त्यांच्यांत उणें पडतें. सत्याग्रहींची सोशिकता ज्यांच्यांत असते त्यांचें अधिष्ठान पारलौकिक असतें आणि स्वतःला साधनवत् मानल्यानें त्यांच्या निर्णयांतली बुद्धिगम्यता विवादास्पद बनते. श्री. अण्णासाहेबांचें व्यक्तिमत्व ह्या एकेका धातूचें घडलेलें नाहीं. ह्या सर्वांच्या संमिश्रणाचें तें बनलें आहे. त्यामुळें त्यांच्यांत ह्या सर्व गुणांचा सुमेळ साधल्यासारखें दिसतें.

राजकीय पक्षांच्या नेत्यांप्रमाणें लोकसंग्रहाच्या हव्यासानें लोकानुनय करीत नसूनहि त्यांचा लोकसंग्रह विशाल आहे. भारताच्या सर्व प्रांतांत तो पसरलेला आहे. पण तो लोकसंग्रह मित्रपरिवाराच्या स्वरूपाचा असल्यानें त्यांच्यापाशीं हुकमी सैन्य नाहीं. दुसऱ्या अर्थानें त्यांच्यांत गोखले, आगरकर आणि टिळक या महाराष्ट्र नेतात्रयींचें मंगल दर्शन घडतें. गोखल्यांची व्यासंगी वृत्ति, आगरकरांचा क्रियाशील बुद्धिवाद आणि टिळकांची राजकीय

तडफ त्यांच्यांत अंशतः एकवटली आहे. त्यामुळें कुठल्याहि एका सांप्रदायाशीं ते समरस झालेले नसूनहि त्यांचा चाहता वर्ग सर्वत्र आढळतो.

पाळण्यांत असल्यापासून मोठेपणाचीं बीजें असलेला हा महापुरुष नव्हे. उमदेपणानें परिस्थितीशीं झगडा देत व त्यांतून योग्य संस्कार घेत त्यांची घडण झाली आहे. वास्तवदर्शी असें त्यांचें मन आहे त्यामुळेंच अण्णासाहेब सर्वसामान्य लोकांना पटतात, समजतात. त्यांना कोणी ऋषीच्या पंक्तीला नेऊन बसवीत नाहीं कीं अवतारांत त्यांची गणना करीत नाहीं. धडपडणाऱ्या मानवांचे ते प्रतिनिधि वाटतात.

सर्वसामान्य कुटुंबांत त्यांचा जन्म झाला. त्यांना चारचौघांसारखे विद्येसाठीं कष्ट उपसावे लागले. मनांत ध्येयाच्या नाना ऊर्मि उसळल्या तरी शालेय क्षेत्रांत यथातथाच यश त्यांना मिळालें. आपल्याला झेपणाऱ्या पद्धतीनें आपला ध्येयवाद आचरणांत आणावा म्हणून हरिजनांना मोफत शिकवायचें काम त्यांनीं पत्करलें. ह्यांतून जीवनांत नवा आशय निर्माण झाला. दारिद्र्य म्हणजे सकल अमंगलाचें निधान व तें दूर करण्यासाठीं झटणें हा नवा पुरुषार्थ अशी भावना निर्माण झाली. व्याख्यानांत 'माझ्या बंधुभगिनींनो–' म्हणण्यांतली अवास्तवता ध्यानांत आली. मांगवाड्यांत सुधारणा करण्यासाठीं मन तळमळूं लागलें. प्रेम आणि वात्सल्य यांच्याशिवाय सद्‌गुणसंवर्धन करतां येत नाहीं, हें दिसून आलें. प्रेमामुळेंच रागावण्याचासुद्धां अधिकार मिळतो. आई मुलाला रागावली तरी तें तिच्याच ओच्यांत तोंड खुपसून मुसमुसतें. तसें होईल तेव्हां तो रागहि गुणवर्धनाला उपयोगी ठरतो. मांगवाड्यांतील लोकांवर असा अधिकार मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांची वाचा सद्‌वचनांनीं संस्कारित करण्याच्या ऊर्फ त्यांना दंभाचें शिक्षण देण्याच्या भरीस अण्णासाहेब पडले नाहींत. त्यांनीं त्यांचें जीवन संस्कारित करण्याला आरंभ केला. मांगवाड्यांत साक्षरताप्रचार करण्यासाठीं गेलेला तरुण स्वतःच एका वेगळ्या अर्थानें शिक्षित झाला.

वडिलांना स्वतःची माया भौतिक साधनांनीं प्रकट करणें झेपत नव्हतें, मुलाला स्वातंत्र्य देऊन त्यांनीं ती प्रकट केली. घरचा बोजा उचलण्यासाठीं

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

अण्णांनीं अकोल्यांत मास्तरकी पत्करली. पण हरिजनांना त्यांच्या जीवनांत स्थान मिळून चुकलें होतें. सर्वसामान्य माणसाच्या मनाला लागते तशीच तळमळ त्यांनाहि लागली. एका मठाची इस्टेट हस्तगत करण्यासाठीं मठाधिपतीची मर्जी संपादण्याचेंहि मनांत येई. पुढें मुळशीच्या लढ्यांत ते सामील झाले. रणांगणावर लढून शौर्य गाजवण्याचें आकर्षण सर्वांना असतें, पण ज्याच्या आधारावर रणांगणावर सैनिक लढतात तें अज्ञात राहून करायचें काम कोणी पत्करीत नाहीं, आनंदानें आणि दक्षतेनें तें करीत नाहीं. अण्णांनीं तें काम पत्करलें आणि सेनापतींची आज्ञा, न कुरकुरतां, सैनिकाच्या कर्तव्यदक्षतेनें त्यांनीं पाळली.

त्यानंतर चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेंत ते दाखल झाले. तत्त्वाच्या बाबतींत ते हिमालयासारखे अढळ आणि तपशीलांत मिळतें घेण्याबाबत जलासारखे रंगगंधाकाररहित, त्यामुळें जातिवर्णाविरुद्ध त्यांनीं वाचिक नव्हे तर प्रत्यक्षच बंडावा सुरू केला. लोकांच्या मदतीसाठीं मिंधेपणा त्यांनीं पत्करला नाहीं. स्वावलंबनाशिवाय शिक्षणक्षेत्रांत स्वातंत्र्य टिकवतां येणार नाहीं, हें त्यांनीं ओळखलें. अपार कष्टांची त्यांची तयारी होती. कारण, असलें मोल चुकवल्याशिवाय स्वातंत्र्य राखतां येत नाहीं, हें त्यांना ठाऊक होतें.

अण्णासाहेब अनासक्त कर्मयोगी आहेत. आपल्याला कर्माचे भगीरथ सांपडतात पण असक्तीनें ते त्या कर्माशीं जखडलेले असतात. निरासक्त मनुष्य कर्माची बेडी होऊं देत नाहीं, कर्मांतूनहि तो संस्कारित होत असतो. शेतीच्या परावलंबी उद्योगांतून अपार कष्ट करून स्वावलंबन साधणें कठिण आहे, हें त्यांनीं जाणलें आणि रूढिग्रस्तांप्रमाणें ते त्या प्रयोगाला चिकटून राहिले नाहींत.

गांधीजींच्या आश्रमांत खादी विद्या शिकायला ते गेले. वृत्ति असांप्रदायिक आणि व्यक्तिपूजेची भावना शून्य. बुद्धि-प्रामाण्यावर अनन्य विश्वास, पण इतरांनाहि बुद्धीची शक्ति असल्याच्या श्रद्धेमुळें सहिष्णुताहि अपार, त्यामुळें आश्रमांत ते टिकून राहिले, पण तेथल्या साच्यांत ढाळले गेले नाहींत. प्रार्थनेवर विश्वास नसतांना त्यांनीं वरिष्ठांच्या शिस्तीला मान तुकवायची

म्हणून कधीं प्रार्थना केली नाहीं. आत्मचिंतनासाठीं उपयोगी म्हणून त्यांनीं दैनंदिनी लिहिली, पण गृहपतींना ती दाखवायला ठणठणीत नकार दिला. गांधीजी स्वतंत्र बुद्धीची व तेजस्वितेची कदर करणारे होते. लाचार व मठ्ठ अनुयायांपेक्षां आपल्या निर्णयाला स्वतंत्र बुद्धीची कसोटी लावणारे त्यांना अधिक प्रिय वाटत.

गांधीजींच्या तत्त्वांचा अण्णा बुद्धिवादी कसोटीनें विचार करीत, पण त्यांच्यांत उर्मटपणा किंवा औद्धत्य नव्हतें. महाराष्ट्रांतील बुद्धिवाद निष्क्रिय म्हणजे पांगळा व स्वयंमन्य म्हणजे असहिष्णुतेनें उर्मटपणाच्या आहारीं गेलेला आहे. स्वतःला वगळून घटनांना निव्वळ बुद्धिवादी कसोट्या लावण्याऐवजीं आपल्या आचरणाच्या समर्थनार्थ युक्तिवाद शोधण्यांतच हा बुद्धिवाद इतिकर्तव्यता मानीत असल्यानें तो साक्षात्कार घडवीत नाहीं; लाचार वकिली कौशल्याचें मात्र प्रदर्शन करतो. अण्णांचा बुद्धिवाद वेगळा होता. साक्षात्काराची व म्हणूनच सक्रियतेची त्यांत शक्ति होती. त्यामुळें महाराष्ट्रांतील तथाकथित बुद्धिवाद्यांप्रमाणें ते समाजापासून कधीं दुरावले नाहींत. गांधीजीं त्यांना सांगितलें होतें, "तुला कोणी गुरु मिळणार नाहीं. तुलाच स्वतःचें मार्गदर्शक बनलें पाहिजे." आपल्या तत्त्वज्ञानाची स्वतःच्या जीवनांत गांधीजी जी काटेकोर अंमलबजावणी करीत त्या त्यांच्या इमानामुळें अण्णा गांधीजींच्या परिवारांत दाखल झाले.

तीस-बत्तीस सालीं अण्णांनीं रत्नागिरी जिल्हा गाजवला. स्वतःच्या बुद्धीला प्रमाण मानून त्यांनीं कार्य केलें. 'सत्या-असत्यांसीं मन केलें ग्वाही, मानियलें नाहीं बहुमतां' हा त्यांचा बाणा होता. त्यांची धडाडी, संघटना-चातुर्य आणि तळमळ यांचा जणूं कस लागला. बिहारच्या भूकंपाच्या वेळीं सेवेसाठीं ते गेले होते. तिथल्या परिस्थितीचें त्यांनीं सूक्ष्म अवलोकन केलें. भारतीय दारिद्र्याचीं मुळें येथील प्रतिगामी अर्थव्यवस्थेंत आहेत, ही अर्थव्यवस्था बदलली पाहिजे, हें त्यांना दिसून आलें. बहुजनसमाजाच्या सामर्थ्यांतूनच हें घडून आलें तर श्रेयस्कर. पण हा बहुजनसमाज इतका निस्त्राण झाला आहे कीं, त्याच्या सामर्थ्यावर क्रांति करणें

अशक्यच होतें. ह्या बहुजनसमाजांत त्राण निर्माण करावयाचें तर त्याची स्थिति सुधारणारा विधायक कार्यक्रम हातीं घेतला पाहिजे. अण्णासाहेबांनीं त्या दृष्टीनें खादीचें काम अंगावर घेतलें. खादीकार्यासाठीं त्यांनीं प्रचंड खटाटोप केला. पण त्यांना दिसून आलें, कीं अंगीं त्राण येऊं लागतें तशी सुस्तीहि चढत जाते. त्राण निर्माण करतांकरतांच सामूहिक हिताची भावना आणि क्रांतीचे संस्कारहि दिले पाहिजेत. ही दृष्टि नसली तर ससंजसपणानें व्यापार करणारी व गरिबांचा कळवळा दाखविणारी एक कंपनी उभी राहील ! अण्णांना त्यांत रस नव्हता. विधायक कार्याला जपजाप्याचें, कर्मठ आचाराचें स्वरूप आलेलें त्यांना पाहवत नव्हतें. विधायक कार्याचें कर्मकांड झालें कीं तें निस्तेजच नव्हे तर निष्प्राणहि बनतें. विधायक कार्याच्या निमित्तानें शेतकरी जीवनाशीं त्यांचा संबंध आला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा त्यांनीं सखोल अभ्यास केला. ग्रामीण जीवन संपन्न करण्यासंबंधीं त्यांचें चिंतन सुरू झालें. अस्वस्थता वाढत होती. विधायक कार्याच्या चाकोरींतून तें कार्य मुक्त करावें व क्रांतिप्रवण बनवावें ही तळमळ त्यांना लागली.

एवढ्यांत १९४२ चा लढा सुरू झाला. इंग्रजांची राजवट उलथून पाडण्यासाठीं अण्णांनीं कंबर कसली. ज्या शांत निश्चलतेनें ते चरखा खादीचें काम करीत होते त्याच वृत्तीनें त्यांनीं शस्त्रास्त्रें हातीं घेतलीं. देशांतील क्रांतिकारी उठावाची हिंसक म्हणून हेटाळणी करणारें व त्याची जबाबदारी गांधीजींच्या माथीं मारणारें जें चोपडें टॉटनहॅम साहेबांनीं लिहिलें त्यांत अण्णांचा निर्देश करण्यांत आला होता. क्रांतिकारी चळवळी-मधील आपल्या कामाची वाच्यता त्यांनीं कधीं केली नाहीं. चळवळींत तुरुंगांत गेल्यावर ते स्वस्थहि बसले नाहींत. बहुजन समाजांतील जे हजारों तरुण तुरुंगांत जमले होते त्यांचे वर्ग घ्यायला त्यांनीं आरंभ केला. तुरुंगाला त्यांनीं सेवादलाच्या छावणीचें जणूं रूप दिलें. तुरुंगांतून सुटल्यावर कामाला आरंभ झाला. गाजावाजा न करतां ठोस काम कारण्याची त्यांची पद्धत. साने गुरुजींच्या भावना बोलक्या असत. त्यांच्या अंगप्रत्यंगांतून त्या व्यक्त होण्याची धडपड करीत. अण्णांच्या भावना तितक्याच तीव्र आहेत, पण

त्या अंतःकरणाच्या अगदीं खालच्या थरांत दडलेल्या असतात. वाद-विवादांत कालक्रमणा करण्याचा त्यांचा पिंड नाहीं. हिंसा-अहिंसेच्या घटपटांत न पडतां तेजस्वी तरुणांना त्यांनीं कार्यासाठीं तयार करण्याला प्रारंभ केला. साने गुरुजींच्या सत्कारार्थ जमलेला निधि एकमेव विश्वस्त म्हणून अण्णांच्या हवालीं करण्यांत आला, हें त्यांच्यावरील विश्वासाचें फार मोठें प्रतीक आहे.

ध्येयवादी माणसें आपल्या सहकाऱ्यांकडून फार मोठ्या अपेक्षा करतात. त्यांच्या जीवनाशीं समरस होण्याचा प्रयत्न करीत नाहींत. एखादा मुकादम ज्या कठोरपणें काम करून घेतो त्याच कडकपणानें तें काम करून घेतात. उपयुक्तता-वाद हेंच त्यांचें आधारतत्त्व बनतें. एखादा माणूस आपल्या उपयोगी पडेनासा झाला कीं त्याला जीवनांतून उठवण्याची दिक्कत त्यांना वाटेनाशी होते ! ही हि एक भांडवलशाही वृत्तीच आहे माणुसकीचा त्यांत अभाव आहे. अण्णांच्या लेखीं माणुसकीला अग्रस्थान असतें. माणुसकीचें जतन करण्यासाठीं ते वाटेल तें करायला तयार असतात. परदेशीं हद्दपारी कंठणाऱ्या एखाद्या कार्यकर्त्याच्या सुटकेसाठीं प्रयत्न करायचा असो कीं एखाद्या आगतिक मुलीच्या शिक्षणाची व्यवस्था करायची असो–अण्णा मग पैशांचा मुळीसुद्धां विचार करीत नाहींत. इतरांना समजून घेण्याची एवढी शक्ति क्वचितच कुठें दिसते. इतरांबद्दल भिन्न मत असूनहि अण्णा कदर दाखवूं शकतात. अण्णासाहेबांनीं जें प्रेमादराचें स्थान इतक्याव्यापक प्रमाणा-वर मिळवलें तें यामुळेंच. कामाच्या यशावरून मूल्यमापन करण्याचें ढोबळ तंत्र त्यांचें नाहीं. त्यामुळें जिथें अधिक तीव्र धडपड दिसते तिथें आधीं त्यांचा मदतीचा हात पोंचतो. महत्त्वाचीं पत्रें बाजूला सारून आणि चर्चांना टाळा देऊन, खानदेशांतील एका खेड्यांत शेती सुधारण्याचा प्रयत्न करणारांना त्यांनीं आधीं पत्र लिहावयाला घेतल्याचें पाहून त्यांच्या सहकाऱ्यांना आश्चर्य वाटे. अशा अज्ञात सेवकांचे अण्णा वाली आहेत.

शेतीच्या प्रश्नाचा त्यांनीं खास अभ्यास केला आहे. महाराष्ट्राची शेती सुधारण्याची त्यांना तळमळ आहे. त्यांच्या डोक्यांत त्याचे आकडे आणि

योजना तयार असतात. पण त्यांतहि त्यांची असांप्रदायिक अनाग्रही वृत्तीच दिसून येते. विचारांना त्यांनीं कधींच कवाडें बंद केलीं नाहींत. कोणाचाहि विचार त्यांनीं कधीं धुडकावला नाहीं. प्रत्येक बाजूचें तात्त्विक चिंतन आणि व्यावहारिक प्रयोगक्षमता अजमावून पाहण्याला ते सिद्ध असतात. आपलें म्हणणें मांडतांना ते कधीं औपचारिक संकोच बाळगीत नाहींत, पण विचार सांगून झाल्यावर तो मान्य होईपर्यंत त्याच्या अंमलबजावणीचा ते आग्रहहि धरीत नाहींत. त्यामुळें अण्णांच्याकडून सतत स्वातंत्र्य मिळत असतें. त्यांच्यासारखी अनाग्रही सत्यनिष्ठा क्वचित्च पाहायला मिळेल. जपानला जाऊन त्यांनीं शेती-ग्रामोद्योगांची पाहणी केली. नियोजन मंडळाच्या सल्लागार मंडळाचे सभासद म्हणून त्यांनीं काम केलें. खादी ग्रामोद्योग बोर्डाच्या स्थापनेंत व रचनेंत त्यांचा वांटा मोठा आहे. पण याचा लवमात्र अहंकार त्यांच्यांत दिसत नाहीं. कोणाच्याहि भव्य व्यक्तिमत्त्वाच्या दबावामुळें त्यांचे स्वतंत्र विचार शबलित होत नाहीत.

अण्णासाहेबांनीं शरीराचें स्तोम कधीं माजवलें नाहीं. शरीर कणखर ठेवलें आणि राबवलेंहि. सत्य-अहिंसा-अपरिग्रह-ब्रह्मचर्य यांचा सकाळ-संध्याकाळ त्यांनीं कधीं जप केला नाहीं. पण त्यांच्या दैनंदिन जीवनांतून हीं व्रतें आविष्कृत झालीं. आपल्या सहकाऱ्यांच्या जीवनांतील या बाबतींतली विसंगति ते डोळसपणें पाहतात. क्वचित् विनोदाच्या रूपानें त्याचा निर्देशहि ते करतात, पण मानवी मनाच्या कमकुवतपणाची त्यांना कल्पना असल्यानें त्यांत कटुता येत नाहीं.

भूदान आंदोलनामुळें शेतकऱ्यांच्या प्रश्नाला तोंड लागलेलें पाहून त्यांच्या सर्व वृत्ति बहरून आल्या. भूदानाचें त्यांना भावनात्मक आकर्षण नव्हतें. त्यांची दृष्टि सामाजिक व आर्थिक आहे. त्या कसोटीवरहि भूदान उतरतें हें पाहून ते त्यांत दाखल झाले. भूदान मिळवणारीं माणसें देशांत उभीं राहिलीं, पण ह्या ग्रामांच्या पुनर्रचनेचा विचार केलेला व ती जबाबदारी अंगावर घेणारा असा अण्णावांचून दुसरा माणूस नव्हता. ओरिसांत शेकड्यांनीं ग्रामदानें मिळालीं. आदिवासींचीं हीं ग्रामदानें हें

भूदानाला एक आव्हान होतें. शेतीवरील मालकी-हक्काचा जर विकासाला अडथळा होतो तर ती मालकी नष्ट झालेलीं गांवें विकासाची वाट भरधाव चालूं लागलीं पाहिजेत. त्यांच्या रचनात्मक व सृजनात्मक वृत्ति बहरून आल्या पाहिजेत. ह्या वृत्तींना वळण लावण्याचें फार मोठें काम अण्णा-साहेबांनीं पत्करलें. तो निर्णय घेतल्यानंतर आवराआवर करण्याला त्यांना क्षणाचा विलंब लागला नाहीं. त्यांचा अपरिग्रह आणि अनासक्ति ही या कोटीची आहे.

शोषणाचा अंत करण्याची त्यांना तळमळ आहे. देशांतल्या बहुजन-समाजाची विपन्नता नष्ट करण्यासाठीं आपलें जीवन-सर्वस्व देण्याला ते सिद्ध आहेत. पण डोळ्यांवर त्यांनीं झापडें लावलेलीं नाहींत, आंधळेपण त्यांनीं पत्करलें नाहीं, उलट विज्ञान-उपसकाप्रमाणें विविध प्रकारचे प्रयोग चालवून सत्याच्या वाटेनें एकेक पाऊल प्रगति केली पाहिजे, असें ते मानतात. त्यांची विचारपद्धति पुस्तकी नाहीं. अनुभव व निरीक्षण, प्रयोग आणि चिंतन यांच्या आधारें त्यांचे विचार बनत असतात. नवविचारांचें स्वागत करण्याला ते सिद्ध असतात. आणि वास्तवाच्या कसोट्यांवर ते घासून त्यांचा कसहि ते लावतात. डॉ. लोहियांनीं अल्पप्रमाण यंत्रांचा सिद्धांत मांडला. भांडवल-शाही व कम्युनिस्ट उत्पादनतंत्रांतील साम्यामुळें निर्माण होणाऱ्या समस्यांचा त्यांनीं निर्देश केला. लोहियांच्या त्या प्रबंधावर अण्णासाहेबांनीं लिहिलेला लेख त्यांच्या स्वतंत्र विचारपद्धतीची साक्ष देतो. अल्पप्रमाण यंत्रें जनतेच्या त्यावरील काम करण्याच्या कौशल्याच्या प्रमाणांतच यशस्वी होतील, म्हणून स्वयंचलित यंत्रें नको असतील तर काम करणाऱ्यांच्या हातांतील कौशल्य वाढवण्याचा निकराचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, हें त्यांनीं दाखवून दिलें. क्षेत्रस्वावलंबनाच्या तत्त्वाचा अतिरेक करून पुष्कळ वेळां हास्या-स्पदता पदरीं येते. अण्णा म्हणतात, "जर जंगलांचें एकरीं उत्पन्न धान्याच्या उत्पन्नाहून अधिक असलें तर आदिवासींनीं जंगलसंवर्धनाचाच कार्यक्रम हातीं घेणें इष्ट ठरेल." ग्रामीकरणाचा विचारहि ते अशाच वास्तव दृष्टीनें मांडतात, "ग्रामीकरण झालेल्या गांवांतील मुलांनाहि डॉक्टरीचें शिक्षण-

घेतां आलें पाहिजे. गांव किमान निर्वाहाच्या पातळीवर जगत असलें तर तेथें भांडवलसंचय होणें मुष्किल आहे. अशा वेळीं शहरांत नोकऱ्या करून त्या गांवासाठीं भांडवल उभारणेंहि आवश्यक होईल." अशी कल्पना असांप्रदायिक अण्णाच करूं शकतात. ग्रामीकरणाकडे ते भोळ्या भावुकतेनें पाहात नाहींत, निखळ बुद्धीचा त्याला निकष लावतात, हेंच त्यावरून दिसतें.

मोठ्या मंडळींचा आपल्या कर्तबगारीवर असा अपार विश्वास असतो कीं आपापल्या क्षेत्रांत ते पुष्कळ वेळां छोटे हुकुमशहाच बनतात! अण्णांचें नेमकें याच्या उलट आहे. तरुण कामाला लागले, जबाबदारी घेऊं लागले तर ते त्यांना वाट मोकळी करून देतात. त्यांच्या पाठीशीं उभे राहतात. आपल्या वैयक्तिक अडचणी करून घेऊनहि ते त्यांना प्रयोगाचें स्वातंत्र्य देतात. तरुणांच्या आशाआकांक्षा ते समजूं शकतात व त्यामुळें त्यांच्याशीं मैत्री राखूं शकतात. गांधीजींच्याजवळ कार्यकर्त्यांचें एक 'झू' असे. इतके विविध प्रकारचे लोक ते कसे नांदवीत याचें पाहणाराला आश्चर्य वाटे. अण्णांजवळहि असेच विविध प्रकारचे लोक असतात. युक्तिवादानें परिवर्तन करण्याच्या फंदांत न पडतां प्रयोगांतून परिवर्तन होण्याइतका धीर अण्णांना असतो. त्यांची ही दृष्टि वैज्ञानिक आहे. वयाची साठी ओलांडली तरी त्यांच्या उत्साहाला खंड नाहीं, मोकळ्या वृत्तीला उणेपणा नाहीं.

कर्मांत जडता, बुद्धिनिष्ठेंत शुष्क निष्क्रियता आणि भावुकतेंत आंधळेपणा निर्माण होण्याचा धोका असतो. अण्णांनीं हे त्रिदोष वगळले आहेत. त्यांच्या कर्मांत जडता नाहीं, बुद्धिनिष्ठेंत निष्क्रियता नाहीं आणि भावनेंत आंधळेपणा नाहीं. त्यांच्यासारखा मनोबुद्धीनें निकोप माणूस मिळणें कठीण. ह्या निकोपपणामुळेंच त्यांच्याभोवतीं इतके कार्यकर्ते उभे राहूं शकतात. महाराष्ट्राचे ते एक वैभव आहे.

० ◎ ०

# मायेची पाखर

वैधव्याचीं पन्नास वर्षें ! ही कल्पनाच मोठी करुणगंभीर वाटतें.

वैधव्य म्हणजे एक न संपणारी अंधारी रात्र, अगतिकता साक्षात् प्रतिमान होणें म्हणजे वैधव्य ! त्यामुळें एखाद्या विधवेनें वैधव्याची अर्धशताब्दि पूर्ण केली, ही कल्पनाच भयंकर वाटतें. कमलाताई होस्पेट यांनीं वैधव्य सौभाग्यशाली केलें आहे, वैभवशाली केलें आहे. म्हणूनच त्यांना ही पन्नास वर्षें अंधाऱ्या रात्रींसारखी न वाटतां जीवनाला व्यापक बैठक देऊन जीवन उजळवणारीं वाटलीं.

१९६१ च्या धनत्रयोदशीला त्यांच्या वैधव्याला पन्नास वर्षे पूर्ण झालीं. त्या दरवर्षीं श्राद्ध करीत असतात; पण पति ह्या व्यक्तीचें तें श्राद्ध नव्हे. कारण वैवाहिक जीवन असें त्यांच्या वांट्याला आलेंच नाहीं.

मोहनी कुटुंबांतली यमू ही आठ मुलांपैकीं एक मुलगी. तिसऱ्या वर्षांपर्यंत ह्या मुलीला शब्द फुटला नव्हता. चालायलाहि ती उशीराच लागली. परंतु साठ वर्षांपूर्वींच्या त्या काळांत न्हातीधुती मुलगी घरीं राखणें हा समाजाच्या रोषाचा विषय होत असे. त्यामुळें लग्न म्हणजे काय आणि संसार म्हणजे काय, हें कळण्यापूर्वींच लग्न होऊन यमू मोहोनी सौ. कमलाबाई होस्पेट झाली !

गृहस्थाश्रमाचा अनुभव येण्यापूर्वीं, वयाच्या सोळाव्या वर्षीं गृहस्थाश्रम संपला देखील ! लौकिक अर्थानें मातृत्वाचें साफल्य लाभण्यापूर्वीं, जीवनाला वात्सल्याचा बहर येण्यापूर्वींच त्याला आंचवण्याची पाळी आली.

भावंडांनीं बहिणीला घरीं आणलें. साविकेच्या-नर्सिंगच्या शिक्षणक्रमांत कमलाताई दाखल झाल्या. एका अबोध जाणीवेनें त्यांच्या अंतःकरणांत नवदीप प्रज्वलित केला. वैयक्तिक दुःखाचा सामाजिक पातळीवर परिहार करण्याची प्रेरणा निर्माण झाली. अंतःकरण उजळलें. मातृत्वाची भव्य आराधना त्यांनीं मांडली.

चार खाटा आणून सहकारी मैत्रिणींच्या मदतीनें एका अनामिक संस्थेचा एका घरकुलांत पाया घातला गेला. या प्रसूतिगृहांत वैद्यकीय कुशल मदतीबरोबर मायेची पाखर लाभूं लागली. व्यावसायिकांकडे दुर्मिळ असणारी पाखर ! कमलाताई म्हणजे साविका, कमलाताई म्हणजे अंगाला लावणाऱ्या, कमलाताई म्हणजे हगेली-मुतेली धुणाऱ्या, कमलाताई म्हणजे मायेनें शिरा आणि इतर पौष्टिक वस्तु खाऊं घालणाऱ्या, कमलाताई म्हणजे धीर, विश्वासाचें स्थान ! कंटाळा असा त्यांना नसेच. निरलसतेचें एक वरदानच त्यांना जणूं मिळालें आहे. त्यांच्या त्या प्रत्येक कृतींत आईची माया फुलत होती. त्यांचें वात्सल्य बहराला येत होतें. नव्या निःशब्द जाणीवा दैनंदिन वागणी-करणींत प्रकट होत होत्या.

कालाचें निरवधित्व आणि पृथ्वीचें विपुलत्व त्यांना कवीच्या प्रतिभेनें पण निःशब्दपणें जाणवलें. नितान्त आस्तिक्यबुद्धि यांतून उदयाला येते. ही नितान्त आस्तिक्यबुद्धि हें कमलाताईचें खरें बळ आहे. ह्या बळानें कल्पवृक्षाची छाया लाभते. कमलाताईंना अशी ही कल्पवृक्षाची छाया लाभली आहे. त्यांच्या मनांतल्या सर्व इच्छा सफल होतात. पण हा आस्तिक्यबुद्धीचा कल्पवृक्ष असा अजब आहे कीं, त्याच्या छायेंत दुर्वासना मनांत येतच नाहींत आणि वैयक्तिक विचार मूळ धरीत नाहींत. आज गोष्ट घडली नाहीं म्हणून कमलाताईचा उद्यांवरचा विश्वास खंडित होत नाहीं; आणि ह्या जागेंत बीज रुजलें नाहीं म्हणून इतर जागांच्या ओसाडपणाची शंका त्यांच्या मनाला चाटून जात नाहीं ! या आस्तिक्यामुळें त्यांच्या जीवनांत एक अलौकिकत्व आलें आहे. साहसाची दुर्दम्य शक्ति संचारली आहे. कल्पनेच्या आणि व्यवहाराच्या जगांत त्यांनीं केलेलीं

साहसें संख्येनें आणि गुणांनीं इतकीं विविध आणि मोठीं आहेत कीं, त्याच कधीं काळीं त्याची माहिती देऊं शकतील. एका बाळंतिणीचें चालवणें हें देखील कोण जिकीरीचें, पण बावीस सूतिका-गृहांचाहि कधीं त्यांना भार वाटत नाहीं !

कमलाताईंमधील मांगल्यावरील श्रद्धा आणि स्वागतशील वृत्ति म्हणजे आस्तिक्यबुद्धीला फुटलेले लोभस धुमारेच म्हटले पाहिजेत. त्यांच्या मांगल्य-निष्ठेमुळें किती सुप्त जीवनें खुललीं, बहराला आलीं, उजळलीं ! जो जीवनाला पात्र ठरला तो आपल्या मदतीला अपात्र कसा असेल, अशा तऱ्हेचें त्यांचें वागणें असतें. त्यामुळें त्या एक अद्वितीय अशा शिक्षिका आहेत. ‘ मानवा-मधलें सर्वोत्कृष्ट प्रकट करण्याला मदत करतें तें खरें शिक्षण ’ असें म्हटलें जातें. कमलाताईंनीं किती अंधाऱ्या जीवनांत पणत्या लावल्या त्याला गणती नाहीं. ‘ जया न कोणी, प्रभु मी तयाचा ’ अशी त्यांची वृत्ति आहे. आणि त्यांत दया–उपकारबुद्धि यांचा लवलेशहि नाहीं. सगळें आईच्या सहजपणानें होतें. अगतिक आणि अपंग यांचें त्या एक विश्वासाचें स्थान बनल्या आहेत. ही सगळी सर्कस त्या कशी काय चालवतात, त्याचेंच आश्चर्य वाटून जातें ! जीवनाबद्दल उदास निराश झालेल्या, श्रद्धा गमावून बसलेल्या व जगाला भारभूत झाल्याच्या खेदकारक जाणिवेनें जिवाला कंटाळलेल्या मंडळींना कमलाताईंच्या सान्निध्यांत येतांच, जीवनांत नवा आशय निर्माण झाल्याचा प्रत्यय येतो. घरच्यांनीं ज्यांना कंटाळावें त्यांना कमलाताई आईच्या मायेनें जवळ करतात. असें उदात्त मातृत्व त्यांच्या जीवनांत फळास आलें आहे.

टॉल्स्टॉयची एक गोष्ट आहे. त्यांत तीन प्रश्न विचारले आहेत. जगांतलें सर्वोत्कृष्ट काम कोणतें, सर्वांत अनुकूल काळ कोणता आणि सर्वांत लायक इसम कोणता, अशा आशयाचे ते तीन प्रश्न आहेत. त्यांचीं उत्तरें अशीं आलीं आहेत कीं, हातीं असलेलें सहजप्राप्त कर्म हें सर्वोत्कृष्ट काम, समोरचा क्षण हा सर्वांत अनुकूल काळ आणि पुढें असलेला इसम सर्वांत लायक इसम. कमलाताईंच्या जीवनांत टॉल्स्टॉयची ही गोष्ट मूर्तिमान झालेली दिसते. त्या वर्तमान क्षणांत वावरत असतात. भूतकाळाच्या अंधारांत रमत

नाहींत, भविष्याच्या स्वप्नांत गुरफटत नाहींत. तो क्षण त्या इतक्या उत्कटपणें जगतात कीं, त्यानें इतिहास घडतो, भविष्यहि उजळतें. सहजप्राप्त कर्म कोणतेंहि असो, त्याबाबत निवडीची भावनाच त्यांच्यांत नसते. स्वयंपाक-घरांत रसोई करण्याचें काम असो कीं सफाईचें काम असो, सर्वच कामांत त्या अगदीं समान रीतीनें मग्न झालेल्या दिसतात. आणि माणसाबद्दल तर त्यांच्यांत निवडच नाहीं. जो असेल तो माणूस त्यांच्या सान्निध्यांत नवाच होतो! त्यांच्यांतले सद्भाव सहज जागृत होतात. त्यांच्या आस्तिक्यबुद्धीचाच हा पैलू आहे.

अलौकिक कोटींत जे लोक वावरतात, त्यांना सामान्यांच्या जिण्याबद्दल कीव-करुण वाटते. त्यांच्या उद्धाराची तळमळ लागते. खरें म्हणजे सामान्यांचें जीवन त्यांना आकलनच होत नाहीं. त्यामुळें ह्या थोरामोठ्यांची भाषा ह्या सामान्यांना कष्टानें समजून घ्यावी लागते. अपरिचयामुळें ती एक पूजेची वस्तु बनते. व्यवहारांत तिचा उपयोग होत नाहीं. सामान्यांच्यांत आणि त्यांच्यांत आदराचा संबंध असतो; पण प्रेमाचा, जिव्हाळ्याचा असत नाहीं. कमलाताईंचें वैशिष्ट्य म्हणजे सामान्यांना समजणाऱ्या ऐहिकाच्या भाषेंत त्या संबंध जोडूं शकतात. सामान्यांच्या ऐंद्रिय संवेदना आणि ऐहिक गरजा त्यांना जाणवतात. आणि त्या तत्परतेनें पुरवण्याची उत्कंठा त्यांना लागते. त्यामुळें अगदीं सामान्यांतल्या सामान्याशीं त्यांचा संबंध जुळतो. वाणी-विचार हें तसें परस्पर संबंधांचें एक तुटपुंजेंच साधन आहे, त्यामानानें ऐंद्रिय संवेदना आणि ऐहिक गरजा या सामान्यांतल्या सामान्य माणसाचाहि ठाव घेतात. सामान्य माणसाच्या जीवनाचा आविष्कार अशा साध्या साध्या गोष्टींतच होतो. कमलाताईंना ही स्वभावतःच जाणीव असल्यानें त्या इतक्या सामान्य गोष्टींत इतकी माया ओततात कीं अचंबा वाटतो! पण त्यांतूनच त्यांचा सारा लोकसंग्रह उभा झाला आहे.

लोकांना जेवूंखाऊं घाऊण्याची त्यांची दुर्दमनीय वांछा हें याचें एक प्रतीक आहे. कोणाहि मनुष्याला त्यांचें याबाबतचें अगत्य सहजीं जाणवतें. बाहेरगांवीं जाणाराला बरोबर डबा-पुरचुंडी द्यायला त्या कधीं विसरत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा[illegible]

साहसें संख्येनें आणि गुणांनीं इतकीं विविध आणि मोठीं आहेत कीं, त्याच कधीं काळीं त्याची माहिती देऊं शकतील. एका बाळंतिणीचें चालवणें हें देखील कोण जिकीरीचें, पण बावीस सूतिका-गृहांचाहि कधीं त्यांना भार वाटत नाहीं !

कमलाताईंमधील मांगल्यावरील श्रद्धा आणि स्वागतशील वृत्ति म्हणजे आस्तिक्यबुद्धीला फुटलेले लोभस धुमारेच म्हटले पाहिजेत. त्यांच्या मांगल्य-निष्ठेमुळें किती सुप्त जीवनें खुललीं, बहराला आलीं, उजळलीं ! जो जीवनाला पात्र ठरला तो आपल्या मदतीला अपात्र कसा असेल, अशा तऱ्हेचें त्यांचें वागणें असतें. त्यामुळें त्या एक अद्वितीय अशा शिक्षिका आहेत. ' मानवा-मधलें सर्वोत्कृष्ट प्रकट करण्याला मदत करतें तें खरें शिक्षण ' असें म्हटलें जातें. कमलाताईंनीं किती अंधाऱ्या जीवनांत पणत्या लावल्या त्याला गणती नाहीं. ' जया न कोणी, प्रभु मी तयाचा ' अशी त्यांची वृत्ति आहे. आणि त्यांत दया–उपकारबुद्धि यांचा लवलेशहि नाहीं. सगळें आईच्या सहजपणानें होतें. अगतिक आणि अपंग यांचें त्या एक विश्वासाचें स्थान बनल्या आहेत. ही सगळी सर्कस त्या कशी काय चालवतात, त्याचेंच आश्चर्य वाटून जातें ! जीवनाबद्दल उदास निराश झालेल्या, श्रद्धा गमावून बसलेल्या व जगाला भारभूत झाल्याच्या खेदकारक जाणिवेनें जिवाला कंटाळलेल्या मंडळींना कमलाताईंच्या सान्निध्यांत येतांच, जीवनांत नवा आशय निर्माण झाल्याचा प्रत्यय येतो. घरच्यांनीं ज्यांना कंटाळावें त्यांना कमलाताई आईच्या मायेनें जवळ करतात. असें उदात्त मातृत्व त्यांच्या जीवनांत फळास आलें आहे.

टॉल्स्टॉयची एक गोष्ट आहे. त्यांत तीन प्रश्न विचारले आहेत. जगातलें सर्वोत्कृष्ट काम कोणतें, सर्वांत अनुकूल काळ कोणता आणि सर्वांत लायक इसम कोणता, अशा आशयाचे ते तीन प्रश्न आहेत. त्यांचीं उत्तरें अशीं आलीं आहेत कीं, हातीं असलेलें सहजप्राप्त कर्म हें सर्वोत्कृष्ट काम, समोरचा क्षण हा सर्वांत अनुकूल काळ आणि पुढें असलेला इसम सर्वांत लायक इसम. कमलाताईंच्या जीवनांत टॉल्स्टॉयची ही गोष्ट मूर्तिमान झालेली दिसते. त्या वर्तमान क्षणांत वावरत असतात. भूतकाळाच्या अंधारांत रमत

नाहींत, भविष्याच्या स्वप्नांत गुरफटत नाहींत. तो क्षण त्या इतक्या उत्कटपणें जगतात कीं, त्यानें इतिहास घडतो, भविष्यहि उजळतें. सहजप्राप्त कर्म कोणतेंहि असो, त्याबाबत निवडीची भावनाच त्यांच्यांत नसते. स्वयंपाक-घरांत रसोई करण्याचें काम असो कीं सफाईचें काम असो, सर्वच कामांत त्या अगदीं समान रीतीनें मग्न झालेल्या दिसतात. आणि माणसाबद्दल तर त्याच्यांत निवडच नाहीं. जो असेल तो माणूस त्यांच्या सान्निध्यांत नवाच होतो! त्यांच्यांतले सद्भाव सहज जागृत होतात. त्यांच्या आस्तिक्यबुद्धीचाच हा पैलू आहे.

अलौकिक कोटींत जे लोक वावरतात, त्यांना सामान्यांच्या जिण्याबद्दल कीव-करुण वाटते. त्यांच्या उद्धाराची तळमळ लागते. खरें म्हणजे सामान्यांचें जीवन त्यांना आकलनच होत नाहीं. त्यामुळें ह्या थोरामोठ्यांची भाषा ह्या सामान्यांना कष्टानें समजून घ्यावी लागते. अपरिचयामुळें ती एक पूजेची वस्तु बनते. व्यवहारांत तिचा उपयोग होत नाहीं. सामान्यांच्यांत आणि त्यांच्यांत आदराचा संबंध असतो; पण प्रेमाचा, जिव्हाळ्याचा असत नाहीं. कमलाताईंचें वैशिष्ट्य म्हणजे सामान्यांना समजणाऱ्या ऐहिकाच्या भाषेंत त्या संबंध जोडूं शकतात. सामान्यांच्या ऐंद्रिय संवेदना आणि ऐहिक गरजा त्यांना जाणवतात. आणि त्या तत्परतेनें पुरवण्याची उत्कंठा त्यांना लागते. त्यामुळें अगदीं सामान्यांतल्या सामान्यांशीं त्यांचा संबंध जुळतो. वाणी-विचार हें तसें परस्पर संबंधांचें एक तुटपुंजेंच साधन आहे, त्यामानानें ऐंद्रिय संवेदना आणि ऐहिक गरजा या सामान्यांतल्या सामान्य माणसाचाहि ठाव घेतात. सामान्य माणसाच्या जीवनाचा आविष्कार अशा साध्या साध्या गोष्टींतच होतो. कमलाताईंना ही स्वभावतःच जाणीव असल्यानें त्या इतक्या सामान्य गोष्टींत इतकी माया ओततात कीं अचंबा वाटतो! पण त्यांतूनच त्यांचा सारा लोकसंग्रह उभा झाला आहे.

लोकांना जेवूंखाऊं घाळण्याची त्यांची दुर्दमनीय वांछा हें याचें एक प्रतीक आहे. कोणाहि मनुष्याला त्यांचें याबाबतचें अगत्य सहजीं जाणवतें. बाहेरगांवीं जाणाराला बरोबर डबा-पुरचुंडी द्यायला त्या कधीं विसरत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम ३६३६५...... दि: ...... ..........

नाहींत. त्यांचें वात्सल्यच यामागें आहे. त्या अत्यंत उत्साहानें आणि जीव लावून स्वयंपाक करतात. जुन्या बाळंतिणी अद्यापहि त्यांच्या हातच्या साजुक स्वयंपाकाची मिटक्या मारीत आठवण करतात. सामान्य माणसांतली आपुलकी यामुळें जोपासली जाते आणि तो त्यांच्या शब्दासाठीं शक्य तें सर्व द्यायला सदा सिद्ध असतो. बव्हंशः थोरांना न गवसलेलें हें कमलाताईंचें असामान्य वैशिष्ट्य म्हणावें लागेल ! त्यामुळें त्यांच्या वागण्यांत कुठें आर्षता नाहीं. मुलाबाळांचा लळा त्यांना आहे. मुलांमुलींच्या, तरुणांच्या आकांक्षा, भुका त्यांना समजतात. स्वतःचा संसार त्यांनीं उभा केला नाहीं, पण सांसारिकांच्या अडचणी त्यांना कळतात. सेविकांचा कल जाणून, त्यांच्या शारीरिक, मानसिक गरजा ओळखून त्यांनीं त्यांचे संसार थाटून दिल्याचीं कितीतरी उदाहरणें आहेत !

कमलाताईंच्यामध्यें एक विलक्षण मनस्वीपणा आहे. त्यामुळें लौकिकाची त्यांना मुळींच भीड वाटत नाहीं. त्यांना सद्‌भावनेची ओढ सहज जाणवते आणि अनेक कार्यें त्यांच्या प्रभावळींत दाखल होतात. खादीचेंच उदाहरण घेऊं. स्वदेशी त्या वापरीत होत्या. पुढें खादी रूढ झाली. त्या काळांतली खादी ! पासोडीसारखी जाड आणि हातभरच उंच. उभे दंड घालून गरीब बायका पातळें वापरतात. परंतु कमलाताईंनीं खादीचें व्रत घेतलें तेव्हां त्यांना आरपार आडवा जोड दिलेलीं पातळें वापरावीं लागलीं. आणि त्यांनीं तीं वापरलीं ! ती जाडीभरडी खादी अंगाला कांचतसोलत असे. नऊ वारी खादीचीं पातळें वापरण्याच्या कल्पनेनेंच आज कित्येकांचा जीव गुदमरेल, पण कमलाताई ती खादी वापरीत होत्या—वापरीत आहेत. किंबहुना, देहविषयक एक प्रकारची उपजत उदासीनता त्यांच्यांत आहे. इतर जी मंडळी असें वैराग्य जोपासतात, त्यांच्यांत इतरांच्या दैहिक गरजांबद्दलची तुच्छताबुद्धीहि वाढलेली दिसते. पण कमलाताईंची ही देहविषयक उदासीनता त्यांच्या स्वतःपुरतीच मर्यादित आहे. कामाची त्यांना विलक्षण ओढ असते. शहरांत वाहनांची अडचण पडल्यानंतर त्या निःशंकपणें सायकलवर डबल सीट बसूनहि गेलेल्या आहेत, अगदीं

दिल्लीला राजधानींतहि त्या अशा रीतीनें गेलेल्या आहेत ! लोक-लाज अशा प्रकारें त्यांना कुठल्याहि कामांत प्रतिबंधक ठरत नाहीं.

कमलाताईंच्या स्वागतशील वृत्तीमुळें त्यांच्या मनांत जातिधर्माचीं जळमटें टिकणें शक्यच नव्हतें. त्यांच्या संस्थेंत सर्वांना सारखें स्थान मिळतें. ज्यांना कोणी नाहीं, त्यांना कमलाताई सहजच आपल्यांत सामावून घेतात. त्यांची संस्था हें एक गोकुळच आहे ! मुलें त्यांच्याकडे सर्वांगीं विकास पावतात, निःसंकोच जीवन जगूं लागतात. त्या सर्वांशीं सहज समरस होतात. छोट्यांशीं जितक्या सहजपणें त्या नातें जोडतात, तसेंच मोठ्यांशींहि त्यांचें बनतें. शंकरराव देव, अण्णासाहेब सहस्रबुद्धे प्रभृतींच्या निःसंग जीवनांत कमलाताईंनीं घरगुतीपणाचा नाजूक ओलावा निर्माण केला आहे. त्यांनाहि त्यांचें भान होतें आणि आपल्या जीवनांतली ही उणीव दूर झाल्याचें जाणवून ते कमलाताईंच्या नात्यागोत्यांतलें होतात. कमलाताईंची ही शक्ति विलक्षण आहे. हा त्यांच्या भव्य मातृत्वभावनेचाच एक पैलू आहे.

व्यक्तिमत्त्वाचा आदर हें त्यांच्या लोकसंग्रहाचें एक कारण आहे. त्यांच्या लेखीं सर्वांचींच व्यक्तिमत्त्वें आदरणीय असतात. त्यामुळें त्यांच्या सान्निध्यांत येणाऱ्या व्यक्तींचीं जीवनें चुरगळतं, चोळामोळा होत नाहींत. तीं फुलतात, खुलतात. त्यांच्या उत्सवांत जीं मेहुणें घातलीं जातात, त्यांत त्यांच्या संस्थेंतील सफाई-कामगार, मोटार ड्रायव्हर, इतर नोकरवर्ग यांनाहि अन्य सन्मानितांप्रमाणेंच आदराचें स्थान मिळतें. सेवेच्या परी त्या लावीत नाहींत. सेवेचीं सर्व कामें त्यांच्या अंतःकरणांत समान असतात. त्यामुळें कुठल्याहि कामाला त्या कंटाळत नाहींत आणि कुठल्याहि सेवकाला त्यांच्याकडून कमी लेखलें जात नाहीं. मात्र त्यांच्या जीवनांत मृदुतेप्रमाणें एक प्रकाराचा करारीपणाहि आहे. ढोंगी, पाखंडी माणसांना त्या सहजपणें त्यांच्या त्या गुणांची जाणीव देतात. काम न करणाऱ्यांना त्या कामाला लागण्याचें फर्मावूं शकतात. कुठलाहि औपचारिकपणा त्यांत नसतो. आत्मीयता दाखवायची ती गोंजरण्यापुरतीच, अशी उपरी त्यांची वृत्ति नसते. त्या फटकळपणें सहज सुनावूं शकतात. मूक सेवकांबद्दल त्यांच्या मनांत विशेष

स्थान असतें. आळशी बोलघेवड्यांचा त्या तिरस्कार करीत नसल्या, तरी त्यांचा आळस आणि बोलघेवडेपणा झटकण्याची संधि त्या चुकूं देत नाहींत.

स्वतःबाबत तर त्या फारच कांटेकोर असतात. सूतिकागृहाच्या सेवकांत स्वतःला त्यांनीं पहिली सेविका मानलेलें असल्यानें इतर सेविकांना जें लाभत नाहीं तें त्याहि स्वीकारीत नाहींत. आपलीं भावंडें प्रेमानें कितीहि घरीं ठेवून घेऊं इच्छीत असतील, तरी त्या सूतिकागृहांत येऊनच झोपतात. अगदीं आजारी असल्या तरी त्या सूतिकागृहांतच राहायच्या हें ठरलेलें. हा करारीपणा त्यांच्या सगळ्या वागण्यांत सदैव आढळतो.

वयाबरोबर माणसांमधला लवचिकपणा कमी होतांना दिसतो. चाकोरी-बद्दल अनावर मोह असतो. बदलाची भीति वाटूं लागते. कमलाताईंच्या आस्तिक्य-बुद्धीमुळें त्यांच्यांत लवचिकपणा कायम राहिलेला आहे. त्यांनीं कामाची चाकोरी होऊं दिलेली नाहीं. त्यांच्यांतली नवनिर्मितीची क्षमता उतार वयांतहि कायम आहे. नाहींतर वैधव्याच्या अर्धशताब्दीनंतर एखाद्या नव्या उपक्रमाला हात घालण्याची प्रेरणाच त्यांना होतीना. वयाच्या सहा-सष्टाव्या वर्षीं नवें बालपण त्यांना फुटलें आहे ! त्यांची आई स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वारली. तिच्या मुलांनीं तिला मोठी माया लावली होती. परंतु वृद्धापकाळीं आपण इतरांना भारभूत झाल्याचा, आपली अडगळ होत असल्याचा भास होतो, आपली हक्काची एखादी जागा असावी असें वाटतें. त्यांची आई म्हणे, "यमे, तूं बायकांसाठीं इतकें केलेंस, आतां म्हाताऱ्यांसाठीं कांहीं कर ना !" त्यांच्या मनांत ह्या शब्दांनीं घर केलें. हातींपायीं धड असतांना समाजाचीं तीस चाळीस वर्षें सेवा केलेल्यांना, आपण नकोसें झालों आहोंत ही पुसटशी जाणीवहि किती असह्य होत असेल ? आणि सूतिकागृहाचाच संसार तीस-चाळीस वर्षें निरलसपणें केलेल्या कितीतरी त्यांच्या सहकारी आहेत ! तेव्हां कमलाताईंनीं वैधव्याची वैभवशाली अर्धशताब्दी पूर्ण होतांना वृद्धांच्या सेवेचें कार्य अंगावर घ्यायचें ठरवलें.

नागपूरपासून चार मैलांवर उमरेड रस्त्यावर दिघोरीला त्यांनीं

' पंचवटी ' ही संस्था नव्यानें सुरू केली आहे. बालांनीं वृद्धसेवेंत सार्थकता अनुभवावी, तशी नवी सार्थकता त्या मिळवूं पाहत आहेत. वयाचीं सहासष्ट वर्षें पूर्ण झालीं तरी त्यांचें अहर्निश कार्य खंडित झालें नाहीं. जरेनें शरीरावर आपलीं पावलें कुठें कुठें उठवलीं असलीं तरी मनाचा उत्साह कायम आहे. त्यामुळें त्या संस्थेला वृद्धाश्रम म्हणणें कुणालाच खपलें नाहीं ! आणि ह्या वृद्धाश्रमांत ज्यांना कोणी नाहीं अशा मुलांचाहि समावेश होणार आहे. वृद्धत्व आणि बालपण यांचा हा सांधा आहे. वृद्धांची मायेची पाखर त्या मुलांवर राहील आणि त्या अंकुरणाऱ्या आशा पाहातांना वृद्धत्वहि आशान्वित होईल.

ह्या आश्रमाला लक्ष्मीबाई चिटणीस यांनीं दहा हजार रुपये देणगीदाखल दिले. कमलाताईंच्या वात्सल्यामुळें त्यांना जी धन्यता लाभली, त्यामुळें त्यांनीं मृत्युपत्रांत तशी तरतूद करून ठेवली. पुढें कमलाताईंनीं निःसंकोचपणें त्यांच्या कुटुंबीयांकडे आणखी तीन एकर जागाहि मागितली. त्या अशा निःसंकोचपणें कोणाहिकडे कांहींहि मागूं शकतात ! ' आम्ही काय कुणाचें खातो, तो राम आम्हांला देतो ' अशी याबाबत त्यांची भावना असते. त्यांच्यांत जसा संकोच नाहीं, तशीच ऋणाइतीहि नाहीं.

पंचवटीच्या स्थापनेच्या दिवशीं हजारों रुपयांच्या उत्स्फूर्त देणग्या मिळाल्या. सूतिकागृहांतल्या सामान्य सेविकांनींहि आण्यापैशापासून देणग्या दिल्या. अशाच रीतीनें गरीब-श्रीमंतांच्या लहानमोठ्या देणग्यांतून सूतिका-गृहांच्या अलीशान इमारती जागजागीं उभ्या राहिल्या आहेत. आणि त्या सर्वांना एकत्र गुंफणारा ' मातृ-सेवा-संघ 'हि त्यांतूनच निर्माण झाला आहे. अशी भव्य वात्सल्याची उपासना क्वचितच दुसरीकडे पाहायला मिळेल. त्यांच्या व्यक्तित्वाचें वैशिष्ट्य नागपुरांतल्या सामान्यांतल्या सामान्य माणसालाहि जाणवतें, तसेंच तें राष्ट्रपतींनाहि जाणवलें आणि कमलाताईंना ' पद्मश्री ' करून त्या पदवीला राष्ट्रपतींनीं थोरवी आणली.

कमलाताईंमुळें किती सुप्त जीवनें प्रफुल्लित झालीं ! भारतीय नारींमधील दिव्यत्वाची त्यांनीं प्रचीति आणून दिली आहे. संस्थेचा कारभार सांभाळण्याला शेंकडों स्त्रिया पुढें आल्या आहेत. आणि त्या कोणी सगळ्या

भाग्यवान घरांतल्या नव्हेत ! निरक्षरांतूनहि पुढें आलेल्या आहेत. कुठल्याहि सामाजिक किंवा राजकीय संस्थेनें त्यांच्याप्रमाणें स्त्रियांमधली, सामान्यांतली कर्तबगारी अशी फुलवली नसेल.

रंजल्यागांजल्यांच्या त्या अपंगित्या आहेत. त्यामुळें मागें पडलेल्या उगवत्या बाळांची सुटका करणारी ' नंदनवन ' ही संस्था त्यांनीं उभी केली आहे. मागसलेलें मूल म्हणजे नकोसें झालेलें मूल ! आधींच मागसलेल्या ह्या मुलाला तिरस्कार मिळाल्यामुळें त्याची कळी उमलतच नाहीं. वात्सल्याच्या परिस-स्पर्शानें, मायेच्या जाणिवेनेंच त्यांच्यांतले असले गुण प्रकट होणार. त्यांचीं जीवनें आनंदमय होणार. ' नंदनवन ' त्यासाठीं निर्माण झालें आहे.

अनाथांविषयींचा त्यांचा कळवळा असाच अनावर आहे. पानशेतफुटीच्या आपत्तीनंतर सांत्वन द्यायला कमलाताई पुण्याला आल्या. पुराबरोबर वहात आलेलें एक मूल पोलिसांच्या हातीं आल्याची बातमी त्याच दिवशींच्या वृत्तपत्रांत आली होती. ती त्यांनीं वाचली असावी. जातां जातां त्या म्हणाल्या, " तें वाहत आलेलें मूल पोलिसांच्या हातीं लागलें म्हणतात; जरा चौकशी करा. तें मूल आपण घेऊं. " त्या दिवशीं वर्तमानपत्रांत पाळण्यांतून सुखरूप वाहत आलेल्या मुलाची बातमी कित्येकांनीं वाचली असेल. त्या चमत्काराची चर्चा घरोघर झाली असेल. परंतु ज्या सहजपणें आपली मायेची पाखर कमलाताईंनीं पुढें केली तो विचार कितीच्या मनांत आला असेल ? त्यांचें मातृत्व आणि वात्सल्य हें असें व्यापक आहे.

अडचणींतल्या स्त्रियांसाठींहि त्यांची अशीच तत्पर मदत उभी असते. सरकारी नियम, शिक्षणाच्या अटी, वय — कसली कसली अडचण त्यांना जाणवत नाहीं. माणसाची अडचण खरी आहे, एवढें त्यांना जाणवलें कीं त्यांचे दरवाजे उघडलेच. नियम माणसांची कुचंबणा करण्यासाठीं नाहींत, असें त्यांचें वागणें असतें. आणि त्यामुळें किती कळ्या उमलल्या- फुलल्या ! कितीकांच्या विफलतेनें अंधारलेल्या जीवनांत प्रकाश आला ! अशीं धन्य जीवनें राष्ट्र घडवीत असतात !

◎ ◎ ◎

# साम्ययोगी

मनुष्य चाकोरीच्या जीवनाला इतका रुळला आहे कीं स्वयंगतीनें जीवनाचा विकास होऊं देण्याची पात्रता माणसांत फार क्वचित् आढळते. एखाद्या कल्पनेंतल्या सत्याच्या मागें तो झपाटल्यासारखा लागतो आणि लौकिक अर्थाचें प्रचंड यशहि तो मिळवतो. ह्या सर्व खटाटोपांत सुसंगति दिसली तरी मनमोकळेपणानें वास्तव सत्याचा स्वीकार करण्याची निकोप नेकी मात्र क्वचितच आढळते. जीवनांतील नित्य अनुभूतींचा सहज स्वीकार करण्याची पात्रता माणूस पुष्कळ वेळां गमावून बसतो आणि त्यामुळें कार्याचा प्रचंड हव्यास एकीकडे दिसतो, पण दुसरीकडे त्या मानानें आनंदाची वाढ झालेली दिसत नाहीं. मुक्त जीवनाचा स्वीकार करणाऱ्याच्या आयुष्यांत किती विलक्षणता येते! मुक्त जीवन म्हणजे स्वैर वागणूक नव्हे. मुक्त जीवनांतहि एक प्रकारचें अनासक्त संगीत गुंजारव करीत असतें. या संगीताच्या मस्तींत तो मनुष्य अचाट कर्तबगारी करून दाखवतो. अशीं माणसें क्वचित् पाहायला मिळतात. उत्कटता हा त्यांचा फार मोठा गुण असतो. माझ्या पाहण्यांत आलेल्या अशा व्यक्तींत मी श्री. बाबासाहेब आमटे यांची अग्रभागी गणना करीन. अनंत दुःखें, आपत्ति, अडचणी यांनीं वेढून गेलेले असतांनाहि या माणसाचा आनंद कधीं कोमेजत नाहीं, उत्साह कधीं हटत नाहीं, आणि जीवनाच्या वैपुल्यावरची श्रद्धा कधीं ढळत नाहीं. आपलीं जीवनें कद्रू असतात. साहसाची–निरंतर साहसाची–वृत्ति

आपल्यांत निर्माणच होत नाहीं. क्षणिक साहसाचा तरंग उठणें वेगळें. असा तरंग वैफल्यांतूनहि निर्माण होऊं शकतो. परंतु निरंतर साहसाची वृत्ति निर्माण होण्यासाठीं जीवनाच्या वैपुल्यावर नितांत श्रद्धा असावी लागते. हें साहस हा बाबासाहेबांच्या जीवनाचा स्थायी भाव आहे.

जुन्या मध्यप्रदेशांतला बाबासाहेबांचा जन्म. घरची स्थिति सधन, त्यामुळें तशी विवंचना कधींच जाणवली नाहीं. सधन मुलांत शिरणारा आळस तेवढा बाबासाहेबांच्या जीवनांत शिरला नाहीं. शाळा नंतर कॉलेज ही जगपरिपाठी त्यांनींहि अवलंबली. फरक इतकाच कीं ती परिपाठी पाळण्यांतहि उत्कटता असे. कुठलीहि कला आत्मसात् करायची कीं त्यांत निपुणता आपलीशी करण्याकडे त्यांचा कल असे. कलारसिक वृत्ति अव्वल दर्जाची. कला-समीक्षक म्हणून त्यांनीं चांगलेंच नांव कमावलें होतें. इंग्रजी नियतकालिकांत प्रशंसेसह त्यांचे समीक्षणाचे लेख प्रसिद्ध व्हायचे. खेळांची आवड, मोटार चालविण्याची हौस. भरवेगानें शहराच्या कोठल्याहि भागांतून त्यांनीं शिताफीनें मोटार हाकावी ! शिकारीचा चांगलाच नाद. चांद्याच्या जंगलांत शिकारीला जायचें. पण ही शिकार साहेबी थाटाची नसायची, त्यांत व्यवस्थेपेक्षां शौर्याचा भाग अधिक असे ! शिकारीमुळें त्यांना जंगलाविषयीं अनामिक अशी ओढ निर्माण झाली. ह्या जंगलांत राहणाऱ्या कोल जातीच्या आदिवासींचा जवळून परिचय झाला आणि त्यांची मैत्री निर्माण झाली. जंगलांतलें सौंदर्य अनुभवायचें तर निधडी छाती लागते. आपण जंगलांत गेलों कीं भयानें ग्रस्त होतों. तेथली प्रत्येक वस्तु आपल्याला शत्रूसारखी वाटते. साप चावेल का, मधमाशा पाठीस लागतील का, वाघ मटकावील का, एक ना दोन–नाना भीति. त्यामुळें आपण जीवन आक्रसून घेतों. पण बाबासाहेबांच्या खाक्याच वेगळा. जंगलांतले वृक्षवनस्पति, पशु-पक्षी, एवढेंच काय हिंस्र श्वापदेंदेखील त्यांना सौंदर्यवान वाटत ! जंगल म्हणजे परम आनंदाचा ठेवा, असें त्यांच्या अनुभवास येई. आदिवासीं-प्रमाणें ते कधीं लंगोटी लावूनहि तेथें वावरत. गरिबी परिस्थितीची असते, दारिद्र्य मनाचें असतें. त्यामुळें गरीब आनंदी असूं शकतो आणि श्रीमंत

दरिद्री असूं शकतो ! आदिवासींच्या जीवनांतील हा आनंद आमटेजींनीं अनुभवला.

कॉलेजशिक्षण आटोपून वकील म्हणून आमटेजी वरोरा येथें आले. वर्धा-काझीपेठ रेल्वे मार्गावर वरोरा आहे. वरोरा येथें आल्यानंतर वकिली-पेक्षां इतरच गोष्टींवर आमटेजींचें लक्ष केंद्रित झालें होतें. भंगी, चांभार, वडार, बुरुड इत्यादि लोकांशीं त्यांचे संबंध जुळले. त्यांच्या जीवनाचें त्यांनीं जवळून निरीक्षण केलें. अडीअडचणींत त्यांचीं कामें ते करून देऊं लागले. राजकीय चळवळींतहि त्यांचा भाग असे. या सुमारास त्यांचा गांधीजींशीं परिचय झाला. समाजांतली विषमता श्री. आमटे यांना त्रस्त करी. त्यांनीं वेगवेगळ्या राजकीय मतप्रणालींचा परिचय करून घेतला. दारिद्र्य आणि विषमता ही सामाजिक विकृति आहे आणि ती काढून टाकलीच पाहिजे, असा ध्यास त्यांना लागला. समाजोपयोगी सर्व व्यवसाय समान मानले गेले तरच ही विषमता दूर होईल. पण हें घडावें कसें ? सत्ता हातीं आल्याशिवाय हें करतांच येणार नाहीं कीं काय ? आणि सत्ता हातीं आली तरी योग्य मनोवृत्ति आणि प्रायोगिक सिद्धि यांच्यावांचून त्या दिशेनें पावलें तरी कशीं पडणार ? हा विचार आमटेजींना अस्वस्थ करूं लागला.

आमटेजींनीं आपला जीवनौघ वेगळ्या दिशेनें वळवायचें ठरवलें. श्रमाश्रम नांवाची संस्था त्यांनीं स्थापित केली. भंगी, चांभार, वडार अशीं नाना कुटुंबें या आश्रमांत एकत्र आलीं. आश्रमाचें मूळ तत्त्व हें कीं व्यवसाय कोणी कोणताहि करो, सगळे समान आहेत असें मानायचें. सर्वांनीं आपलें उत्पन्न एकत्र करायचें आणि तें सर्वांनीं समान प्रमाणांत खर्च करायचें. सिनेमाला जायचें तरी सर्वांनी एकदम आणि एकाच दराच्या तिकिटांवर. खायचें-प्यायचेंहि सर्वांनीं सारख्या दर्जाचें. या प्रयोगासाठीं आमटेजींना अपार कष्ट करावे लागत. त्या लोकांना स्वच्छतेचे धडे देण्यापासून त्यांना आरंभ करावा लागला. परंतु स्वच्छता व्याख्यानांनीं अंगीं बाणत नाहीं. मग आमटेजी खट्याळभर धुणें घेऊन धुवायला जात.

भांडीं घाशीत. त्यांनीं भाजीपालाहि लावला. तो घेऊन ते स्वतः बाजारांत मध्यभागीं विक्रीला बसत. एक तागडी जवळ ठेवलेली असे. गिऱ्हाईकानें आपल्या हातानें माल तोलून घ्यावा व पाहिजे त्या दरानें पैसे द्यावे! आमटेजी एका शब्दानें बोलत नसत. फक्त समाजांतल्या वेगवेगळ्या थरांतल्या मानवी नमुन्यांचें पाणी तेवढें जोखत! साध्याभोळ्या, निरक्षर जनतेंतील सद्भाव आणि तथाकथित समंजस माणसांचा कावेबाजपणा यांचा त्यांना अनुभव आला आणि दरिद्रीनारायणसंबंधींचें त्यांचें प्रेम वाढूं लागलें.

ह्या काळांतली एक मोठी गंमतीदार गोष्ट लोक सांगतात. आमटेजी श्रमाश्रमांत गेल्यानंतर साहजिकच पूर्वीचे त्यांचे सेवेकरी दुरावले. एका धोब्याला त्याबद्दल फार वाईट वाटे. आपले असे दिलदार गिऱ्हाईक तुटलें, आमटेजींसारख्या देवामाणसाची सेवा आपल्या हातून घडत नाहीं, याची त्याला खंत वाटली. एक दिवस तो त्यांच्याकडे गेला. आमटेजींनीं परोपरीनें त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला व आतां कपडे धोब्याकडे देतां येणार नाहीत असें सांगितलें. पण तो हट्टालाच पेटला. तो म्हणाला, "बाबाजी, एवढी सेवा घ्याच. धुलाई मी मागणार नाहीं. द्या कांहींतरी कपडा धुवायला. नका अंतराय करूं." शेवटीं एक जुनेंसें धोतर बाबाजींनीं त्याला धुवायला दिलें. धोब्यानें तें मन लावून स्वच्छ धुतलें. विरलें होतें तिथें त्याची नीट डागडुजी केली आणि तें आणून दिलें. त्याचें तें प्रेम पाहून बाबाजी विरघळले. तें धोतर त्यांनीं किती दिवस तसेंच ठेवून दिलें होतें. त्यावर लेबल लावलें होतें— 'पीतांबर!'

आमटेजींनीं लग्न करायचें ठरवलें तेव्हां सर्वांनाच मोठा आश्चर्याचा धक्का बसला! अशा विक्षिप्त माणसानें लग्न कशाला करायचें? आपल्या प्रयोगांत बायको विघ्नरूप ठरते असा सर्व साधुसंतांचा आदेश. मायाजाळांत गुंतला कीं मुक्तीला अंतरलाच अशी वाणी कानींकपाळीं सतत आदळून भारतीय मनावर दृढ संस्कार झालेले. आणि लग्नहि साधेंसुधें नाहीं. प्रेमविवाह! महामहोपाध्याय घुलेशास्त्री यांची मुलगी. शंकराला वरायला पार्वती

झालीच कीं तयार ! सनातनी घराण्यांतली मुलगी. श्रमाश्रमसारख्या सब गोलंकारी ठिकाणीं नांदायला जायची. श्रमाश्रमांत आनंदी आनंद पसरला. रंकाच्या वैभवाची कल्पना आली. लग्नसोहळा अगदीं अनुपम झाला. इंदुमति घुले या साधना आमटे म्हणून श्रमाश्रमांत दाखल झाल्या. ह्या नव्या परिस्थितीशीं जुळवून घ्यायला त्यांना नांवाप्रमाणें अक्षरशः साधना करावी लागली. पण ती इतक्या सहज वृत्तीनें त्यांनीं केली कीं त्या जणूं जन्मोजन्मीं त्यांच्यांतीलच असाव्या !

पुढें आमटेजी नगरपालिकेसाठीं उभे राहिले आणि या सामान्य लोकांनीं त्यांना प्रचंड बहुमतानें निवडून दिलें. वरोरा नगरपालिकेचें अध्यक्षपदहि त्यांच्याचकडे आलें. त्यांचा कारभार फार चोख असे. परंतु त्यांच्या अध्यक्षपदामुळेंच एक नवी आपत्ति आली. भंग्यांच्या संघटनेचे आमटेजी अध्यक्ष होते आणि नगरपालिकेच्या अध्यक्षपदावरहि तेच ! भंग्यांनीं पगारवाढीची मागणी त्यांच्याकडे केली. काय करायचें ? वाढ देणें रास्त कीं अप्रशस्त ? भंग्यांच्या पुढाऱ्यानें त्यांच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता लावायच्या ? आमटेजींनीं त्यावर तोडगा शोधून काढला. ते म्हणाले, "हें पहा, तुमची मागणी योग्य कीं अयोग्य ह्याची शहानिशा सला करून घेतली पाहिजे. जर तुमचें म्हणणें रास्त असलें तर मात्र अर्थातच मी तुमच्या बाजूला राहीन, पण तुमचें मागणें गैर असेल तर मात्र तुम्हांला माझें ऐकावें लागेल." लोकांना समजेना कीं आमटेजी शहानिशा कशी काय करणार ?

आणि एक दिवस सकाळीं गांवांत एक आश्चर्यजनक दृश्य दिसलें. नगरपालिकेचे अध्यक्ष स्वतःच्या डोक्यावर मैल्याचें टिपडें घेऊन एका भंग्याला किती काम करावें लागतें, त्याचा अंदाज घेऊं लागले ! मैला म्हटला कीं नाकाला पदर लावणारे नगरपालिकेचे अधिकारी स्तिमित झाले ! आमटेजींची फजिती होईल, कारण भंग्यांचे पुढारीहि तेच आणि नगरपालिकेचे अध्यक्षहि तेच. त्यामुळें आयते कात्रींत सापडतील व फज्जा उडेल, या कल्पनेंत मशगूल असणाऱ्या मंडळींना या प्रकारानें धक्काच

बसला. भंग्यांनाहि हा प्रकार अकल्पनीय होता! पण हा प्रश्न बाजूलाच राहिला आणि आमटेजींच्या जीवनाची एकूण दिशाच बदलून जाईल, असा प्रसंग या काळांत घडला.

पावसाळ्याचे दिवस होते. आमटेजी आपलें मैलासफाईचें काम नित्याप्रमाणें करीत होते. एवढ्यांत धुवाधार पाऊस सुरू झाला! जिकडे-तिकडे धावपळ सुरू झाली. आमटेजी आपल्याच मस्तींत बेगुमानपणें मैल्याचें टिपडें डोक्यावर घेऊन जात होते. एवढ्यांत रस्त्यावरच्या चिखला-पाण्यांतून कोणीतरी खुरडतखुरडत जातांना दिसलें. त्या खुरडणाऱ्या व्यक्तीच्या अंगावरून, आपापला जीव सावरून लोक आश्रयाला-आडोशाला धावत होते, पण त्याला मात्र सगळे हिडिसफिडिस करीत होते.

आमटेजींचें लक्ष त्या खुरडणाऱ्या व्यक्तीकडे वेधलें! पण तें ओंगळवाणें रूप तें पाहून त्यांनीं आपल्याजवळचें एक रकटें त्याच्या अंगावर टाकलें. आणि ते तसेंच पुढें गेले. पण राहूनराहून मन त्याच प्रसंगाभोवतीं घोटाळूं लागलें. अपंगाला पाहून आपल्या मनांत वास्तविक करुणा उत्पन्न व्हायला पाहिजे होती. तशी ती आपल्या मनांत निर्माण झाली का? आपण रकटें त्या अपंगाच्या अंगावर टाकलें तें पावसापासून त्याचें रक्षण करण्यासाठीं टाकलें कीं आपल्यावरची जबाबदारी टाळण्यासाठीं? आपल्याला त्या अपंगाची किळस वाटली कीं भीति? आपण भ्यालों हें कबूल करायला त्याचें मन तयार नव्हतें. रानावनांत आपण काळवेळ न पाहतां हिंडलों, हिंस्र आणि विषारी प्राण्यांना तोंड दिलें. युद्धकाळांत स्त्रीची कुचेष्टा करणाऱ्या एका सोजिरांचें मानगूट बेगुमानपणें धरून एकाकी त्यांच्या टोळीचा हल्ला परतून हाडें मोडून घेतांनाहि आपल्या मनाला भीति चाटूनसुद्धा गेली नाहीं! गांधीजींनी-देखील आपल्या ह्या शौर्याची प्रशंसा केली. पण त्यांच्या लक्षांत आलें, हीं प्रशंसापत्रें या प्रसंगी आपली अब्रू बचावण्याला पुरेशीं नाहींत. आपण त्या रूपाला भ्यालों हेंच खरें! अपंगाला पाहून भिणें हा मानवतेवरील सर्वांत मोठा कलंक, असें त्यांना वाटलें. आपण ह्या बाबतींत उणे पडत


श्री मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे, ग्रंथालय

आहेत, याची त्यांना खंत वाटली. आणि त्यांनीं निश्चय केला कीं आपल्या अभय-साधनेंतील ही उणीव दूर केली पाहिजे. महारोगी हा कांहीं कोणी हिंस्त्र प्राणी नव्हे. त्याची दया आली पाहिजे. महारोगी पाहतांच मनांत करुणा निर्माण झाली पाहिजे आणि ती सेवेच्या रूपानें ती अभिव्यक्त झाली पाहिजे. आमटेजींनीं निश्चय केला कीं या महारोग्यांची आपण सेवा हातीं घ्यायची.

पण म्हणतात ना, 'मनांत येतें, हत्ती-घोडे पालखींत बैसावें। प्रभूंच्या मनांत वाटे याला पायीं चालवावें।' बाबाजींच्या मनांत आलें, पण सेवा करायची म्हणजे तरी काय? दानधर्माची–फुकट खायला घालण्याची सेवा ही खऱ्या अर्थानें सेवाच नव्हे. या रोगाचा भयंकरपणा विकलांगी माणसांत नाहीं, या रोगाचा खरा भयंकरपणा यांत आहे, कीं त्यामुळें माणसाची माणुसकी ओहोटीला लागलेली दिसते! माणसें देवीनें, कॉलरा-प्लेगनें लागलीं तरी त्यांना कोणीं अंतर देत नाहीं, पण या रोगानें माणूस पछाडल्याचें कळलें कीं तो जणूं जीवनांतून निर्वासितच होतो! त्याचा परिणाम असा होतो कीं रोग लपवून ठेवण्याकडे प्रवृत्ति होते. आणि लोकांच्या निदर्शनाला रोग येण्यापूर्वींच रोग्यानें कितीतरी लोकांना त्याचा प्रसाद दिलेला असतो! जुनीं पडकीं मंदिरें, किल्ले, वाडे यांच्या संरक्षणा-साठीं मानव किती प्रयत्न करतो? परंतु हे जीवनाचे ढासळते बुरूज सावरा-यची इच्छा त्याला होत नाहीं! डॉक्टरांनीं तरी रोगाला भिऊं नये, रोगपरिहाराचा प्रयत्न करावा ना? पण तोहि होतांना दिसेना. आमट्यांनीं कुष्ठसेवेचें ज्ञान मिळवायचा प्रयत्न चालविला, तेव्हां त्यांना आपल्या निश्चयापासून परावृत्त करण्याचाच सर्वांनीं प्रयत्न सुरू केला. एक तर आमटेजी पेशानें वकील, वैद्यकशास्त्राचें त्यांना फारसें ज्ञान नाहीं! पण त्यांची चिकाटी दांडगी. त्यांनीं कलकत्त्याच्या 'स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन' या संस्थेंत प्रवेश केला.

पण ह्या काळांत एक नवीन आपत्ति त्यांच्यावर कोसळली. त्यांच्या फुफ्फुसांत व्रण होऊन घशांतून रक्त पडूं लागलें. आमटेजींचा देह केवढा

धिप्पाड ! पोलादाच्या कांबेच्या रंगाचा आणि तसाच भक्कम. त्यांच्या तोंडावाटें रक्त पडूं लागलें तेव्हां सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें ! पण तशाहि स्थितींत आमटेजी कलकत्ता येथें गेले. हॉलंडमधील त्या एका मुलाची गोष्ट सांगतात ना ? तटाला भेग पडून समुद्राचें पाणी देशांत शिरून प्रलय होण्याचीं लक्षणें दिसूं लागतांच त्यानें प्राणांची पर्वा न करतां ती भेग अडवून धरून देश वांचवला. त्याचप्रमाणें महारोग्यांच्या निमित्तानें ओढवणारा प्रलय थांबविण्यासाठीं आमटेजी प्राणांची पर्वा न करतां सेवेसाठीं धांवले. आजहि रोग बरोबर वागवीतच त्यांचें काम चालू आहे. त्यांच्या ह्या साहसांत त्यांच्या पत्नीहि तितक्याच उत्साहानें व विश्वासानें सामील झाल्या आहेत.

परत येतांच आमटेजींनीं गांवांत एक दवाखाना सुरू करून उपचाराला सुरुवात केली. परंतु रोगावर उपचार ही महारोग्याची निकडीची गरज नसते. त्याची खरी गरज त्याला सामाजिक जीवनाचा लाभ घेतां येईल, असें ठिकाणीं निर्माण करणें ! आमटेजींनीं प्रांतिक सरकारशीं पत्रव्यवहार करून गांवाच्या एका बाजूला, जंगलापैकीं पन्नास एकर जमीन मिळवली. ही जमीन लागवडीला आणणें हें एक दिव्यच होतें ! जमिनींत जागजागीं प्रचंड शिळा आहेत. जंगल असें घनदाट आणि झाडांची जीवनशक्ति अशी प्रबळ कीं तोडलेलीं झाडें वर्षांत पुन्हा तरारून येत ! त्या जागेवर ‘आनंदवन मंगलधाम’ संस्थेची जून १९५१ मध्यें स्थापना करण्यांत आली. विनोबाजींच्या हस्तें या वसाहतीचें उद्‌घाटन झालें. प्रारंभीं एक झोपडें होतें. सहा रोग्यांचा मंगलधामांत समावेश होता. जंगलाचा प्रदेश. कधीं एखाद्या दिवशीं वाघ दारांतलें गुरू ओढून नेई. वाघाला त्या रक्ताची चटक लागूं नये व त्यानें रोजच्या रोज त्या भागांत येऊं नये म्हणून त्याच्या मागें लागून तें जनावर सोडवून आणावें लागे. सर्प-विंचवांची तर गणती करणेंच अशक्य. त्याहि स्थितींत साधनाताई आपल्या दोन गोजिरवाण्या लेकरांसह राहायला आल्या. मंगलधाममध्यें समाजजीवन निर्माण व्हावें, रोग्यांना कांहींतरी विरंगुळा म्हणून व्यवसाय मिळावा व

वसाहत शक्य तर स्वावलंबी व्हावी असा उद्देश. महारोग्यांची जत्राच तेथें भरूं लागली. रोगी यावेत आणि बाबासाहेब रक्त ओकीत असावें, असेंहि कधींकधीं घडे ! पण इतक्या दुरदुरून आशेनें आलेल्या लोकांना निराश होऊन परत जावें लागूं नये, म्हणून खाटेवर पडल्या-पडल्या ते पेशंट तपासीत.

दुसऱ्या एका वर्षीं मोठीच गंमत झाली. पावसाळा येऊन ठेपला. पण मंगलधाममधलीं घरें शाकारायचीं राहिलीं होतीं. शेताची मशागतहि व्हायची होती. शेती वसाहतीमधले सगळे लोक मोठ्या चिंतेंत होते. पण कुठूनतरी ही वार्ता आसपासच्या खेडोंपाडीं पोचली. एक दिवस उजाडलें तों पन्नास-पाऊणशें लोक बैल-नांगर आणि भाकरींचीं मोटलीं बांधून तेथें आले. त्यांनीं जमीन नांगरून दिली, घरें शाकारलीं. रोग्यांना आपल्यांतली भाकरी देऊन स्वतः खाल्ली. एका दिवसांत सगळी चिंता मिटली ! आसपासच्या गांवांत दरसाल मोठे भंडारे होत होते. आमटेजींचें सुंदर काम पाहून त्या गांवकऱ्यांनीं भंडारे बंद केले आणि या वसाहतीला एकेक दिवसाचें जेवण त्यांच्याकडून मिळूं लागलें. संकटच सत्य असलें कीं प्रभु हजार हातांनीं देतो, असा बाबासाहेबांचा अनुभव आहे.

आपल्याकडे जे रोगी येतील तेवढ्यांना उपचार करून भागणार नाहीं, हें बाबासाहेबांच्या ध्यानांत आलें. रोगाची लागण होतांच रोग निदर्शनाला आला तर उपचार चांगल्या प्रकारें करतां येतात व संसर्गहि पसरत नाहीं. आमटेजींनीं नव्या पद्धतीचें काम सुरू केलें. 'शोधा आणि उपचार करा' ( ट्रेस अँड ट्रीट ) पद्धत त्यांनीं सुरू केली. शाळेंतलीं मुलें त्यांनीं तपासलीं. गांवांतील माणसांची तपासणी केली व रोग्यांना उपचार सुरू केले. विदर्भांत महारोगी फार आहेत. वरोऱ्याच्या एका केंद्रानें भागणार नाहीं हें ओळखून त्यांनीं जागजागीं केंद्रें सुरू केलीं. भद्रावती, खडसंगी, खंबाडा, वून, गुमगांव या ठिकाणीं केंद्रें सुरू झालीं. नागपूरच्याजवळ एखादी वसाहत स्थापण्याची फार गरज होती. 'अशोकवन मंगलधाम' वसाहतीसाठीं जागा तर मिळाली, पण वसाहत उभी करायची तर पैसा हवा. एक दिवस नागपूर

इंडस्ट्रीजचे जोग यांनीं अवचितपणें आमटेजींना ह्या वसाहतीसाठीं दहा हजार रुपये आणून दिले !

सर्व्हिस सिव्हिल इंटर नॅशनल नांवाची एक आंतरराष्ट्रीय संघटना १९२० सालापासून जगांतल्या वेगवेगळ्या देशांत उभारणीचें काम स्वयंसेवकांमार्फत करीत असते. 'प्रत्यक्ष कार्य – केवळ शाब्दिक कळकळ नव्हे' (डीड्स् अँड नॉट वर्डस्) हें ह्या संस्थेचें ब्रीदवाक्य आहे. जगांत शांतता निर्माण व्हायची तर ती शब्दांनीं होणार नाहीं. युद्धांत जसें सहकार्य होतें त्याप्रमाणें शांततेसाठीं सर्वांनीं मिळून घाम कां गाळूं नये ? पिअर सेरेसोल यांनीं स्थापन केलेल्या ह्या आंतरराष्ट्रीय संघटनेचें लक्ष या केंद्राकडे वळलें आणि १९५४ सालामध्यें त्यांनीं श्रमदान छावणी उघडली. जपानपासून इंग्लंडपर्यंत वेगवेगळ्या देशांतले व भारतांतले श्रमसैनिक या छावणींत जमले व त्यांनीं तीन इमारती संस्थेसाठीं बांधल्या.

आमटेजींचे योग मोठे विलक्षण आहेत. एक ग्रीक कन्या त्यांच्या आश्रमांत राहून गेली. त्वचारोगांची ती एक नाणावलेली तज्ज्ञ आहे. उच्च विद्या-विभूषित आहे. 'फ्रॉम फूट टू हार्ट' ही तिची घोषणा आहे. पायांच्या रोगांच्या उपचारांत ती निपुण आहे. पायाचे रोग दुरुस्त करतां करतां रोग्यांचीं अंतःकरणेंहि सुधारण्याची अजब कला तिच्यांत आहे ! तिला ही वसाहत एवढी आवडली, कीं आनंदवनासाठीं ती स्वतः देणग्या जमवायचा प्रयत्न करतांना दिसते. एक पाश्चिमात्य तज्ञ डॉक्टर नुकतेच येऊन गेले. आपलीं भारी किंमतीचीं उपचारसाधनें घेऊन आनंदवनामध्यें सेवा करण्याची त्यांना तळमळ लागली. पण त्यासाठीं पन्नास-पाऊणशें हजार रुपयांची इमारतच हवी, ती इतक्यांत उपलब्ध होण्याचा संभव नसल्यानें ते परत गेले. महारोग्यांचीं निकोप मुलें त्यांच्या सहवासांत राहिलीं तर लौकर रोगाला बळी पडतात. तेव्हां त्या मुलांना वेगळें ठेवणें इष्ट असतें. पण महारोग्यांच्या मुलांना जवळ ठेवणार कोण ? साधनाताईंना दोन स्वतःचे मुलगे आहेत. शिवाय त्यांनीं महारोगी दांपत्याचीं मुलें जवळ बाळगलीं आहेत.

इतरत्र अशा वसाहतींना तुरुंगाचें रूप येतें. रोग्यांच्या जीवनांत आनंद खेळतांना दिसत नाहीं. आपल्या समोरून सांगाडे फिरत आहेत, असेंच पुष्कळ वेळां भासतें ! प्रार्थना होत असतात. श्रमिक जीवनाचा अढळ होतो. पण मनमोकळें, प्रसन्न वातावरण नसतें. सर्वत्र एक प्रकारचा धाक जाणवतो. आनंदवनांत असें कांहींच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. आमटेजींनीं महारोगी सेवेला वाहून घ्यायचें ठरवलें तेव्हां त्यांच्या मित्रानातेवाईकांनीं त्यांच्यावर शाब्दिक गौरवपुष्पें उधळलीं तरी व्यवहारांत ते सर्व दुरावलेच होते ! याचा सर्वांत जास्त जाच साधनाताईंना व्हायचा. जाणेंयेणें बंद झालें. सर्वजण संशयानें पछाडल्यासारखे त्यांच्याकडे पाहात. पण त्यांनीं या सर्व गोष्टींना मोठ्या धैर्यानें तोंड दिलें. वनांत आनंद निर्माण केला.

आमटेजींना आत-स्वकीयांशीं झुंजतांना निदान पत्नीचें पाठबळ तरी होतें, पण साधनाताईंची साधना त्या मानानें भारीच बिकट होती. आमटेजींची ह्या कामाकडे पाहण्याची दृष्टि मोकळी आणि निकोप आहे. सेवकांत प्रायः निरंतर दिसणारा अहंकार त्यांच्यांत नाहीं. व्रत-साधनेचें स्तोम नाहीं. आपण कांहीं जगदुद्धाराचा पत्कर घेतला आहे असा आव नाहीं. ह्या जीवनांत आपल्याला अनुपम आनंद लाभतो म्हणून आपण हें काम करतों, यांत परोपकार नसून प्रसन्नता आहे, असें ते मानतात. त्यांचे वडील एकदां त्यांच्याकडे आले होते. त्यांचें तें जंगलांत एकाकी राहाणें पाहून त्यांना गहिंवरून आलें. ते म्हणाले, "खरें म्हणजे वानप्रस्थाश्रमांत जायचें आमचें वय, तर तूंच ह्या जंगलांत येऊन राहिला आहेस !" त्यावर चिरंजीव म्हणाले, "येथें मी जंगलांत नाहीं, अफाट वैभवांत आहे ! जाईजुईचा सडा येथे पडतो आणि सर्वत्र सुगंध दरवळत असतो. इथे झाडें वारा घालतात. नक्षत्रखचित आकाश रात्रीं डोक्यावर रत्नाभरणाचें अपार वैभव खुलें करतें. हरणें अंगणांत बागडतात. नित्य नवजीवनाचें दर्शन होतें. कुबेरालाहि कदाचित् एवढें वैभव लाभत नसेल !"

माणूस साऱ्या जगांत सौंदर्य निर्माण करण्यासाठीं धडपडतो. आपल्या सभोवतीच्या वस्तूंत कला मिसळल्याशिवाय त्याला राहवतच नाहीं. पण

विकल वा उध्वस्त मानवांच्या जीवनांत सौंदर्य आणण्याची प्रेरणा त्याला लाभत नाहीं. असें कां व्हावें ? निर्जीव आणि अशाश्वत साधनांतून शाश्वत सौंदर्य साकार करण्याची हिंमत बाळगणाऱ्या मानवाला ह्या असुंदर बनलेल्या मानवांचीं जीवनें सुंदर बनविण्याची प्रेरणा कां लाभत नाहीं ? आमटेजींच्या अनुभूतीप्रमाणेंच त्यांचें चिंतनहि सखोल आणि विशाल आहे. प्रचंड सेवाकार्य उभारूनहि त्यांनीं जीवनाची चाकोरी होऊं दिलेली नाहीं.

चिंतन आणि प्रयोग यांच्या साधनांनीं त्यांचें काम सतत वाढतें आहे. त्याला नवकल्पनांचें आणि योजनांचे अंकुर फुटत आहेत. माणसाच्या जीवनाची चाकोरी झाली कीं एका बाजूला त्याच्या जीवनांत परिचितपणाचें स्वास्थ्य शिरत जातें आणि दुसऱ्या बाजूला मन बोथट, संवेदनाशून्य बनत जातें. आत्मगौरवाची भावना वाढते आणि कर्तृत्वाचा वृक्ष वठत जातो. नित्य यौवनशील माणसाच्या जीवनांत कर्तृत्वाचा आत्मविश्वास असतो आणि तरीहि एक प्रकारची अतृप्ती असते, ती त्याला नित्य नूतनतेचें वरदान देते.

महारोगी वसाहतींचें करुण वर्णन करतांना म्हटलें जातें, ' इट इज ए वर्ल्ड विदिन द वर्ल्ड, बट वर्ल्ड विदाऊट ए वर्ल्ड– जगांत असून जगाला पारखा झालेला हा मानवसमाज आहे ! ' असें कां व्हावें ? ही परिस्थिति त्यांना हतबल करते, त्याऐवजीं ती प्रेरणादायी कां ठरूं नये ? इथें रोगी नसून पुरुषार्थी आहेत. करुणेनें रोगी पहायला लोकांनीं येऊं नये तर रोगी केवढा पुरुषार्थ करतो तें पहायला यावें आणि निरोगी संवेदनाक्षम माणसाचेंहि तें स्फूर्तिस्थान बनावें, अशीं स्वप्नें आमटेजींना पडूं लागलीं. त्यांची विज्ञानाभिमुख कल्पकता, त्यांचें व्यवस्थापन कौशल्य आणि हीनदीनांत आत्मकर्तृत्वाची भावना चेतवण्याची त्यांची शक्ति यामुळें हें स्वप्न आकारास येऊं लागलें. महारोगी लोकांतूनच त्यांनीं उत्तम गोपाळ, मेंढपाळ उभे केले. जिद्दीनें ओसाडी फुलवणारे शेतकरी निर्माण झाले. अंबर चरख्यांतील सामर्थ्याची जाणीव देणारे, सूत्रकूट पर्वत उभारणारे कत्तिन उभे केले. महारोगी वसाहतींतून गांवाला उत्तम पुष्टिदायक गोरस

मणोगणती आज मिळत आहे. वैज्ञानिक पद्धतीनें केलेल्या शेतींतील भाजीपाला, फळें उजवीं ठरत आहेत. आनंदवनांतील धिप्पाड गोऱ्हे घ्यायला दूरदुरून माणसें येत आहेत. ग्रामोद्योगी तेलघाणींतून शुद्ध तेल पुरवलें जात आहे. पत्र्याचीं डबडीं जमवून त्यांतून सुंदर वस्तु निर्माण करणारी टिन–उद्योगशाळा उभी राहिली आहे. विहिरी खणून कातळांतून आपल्या जीर्ण हातांनीं पाणी काढणारे आधुनिक भगीरथ इथें आहेत. विजेचे फिटिंग असो कीं नळाचें काम असो, या वसाहतींतले तंत्रज्ञ उपयोगी पडत आहेत. दयेवर जगणारे नव्हेत तर नव्या आदर्श कृषि–उद्योगमय नगराची झलक दाखविणारे पुरुषार्थी नागरिक येथें आहेत.

आनंदवनाच्या कामाबद्दल माहिती वाचल्यावर ऑस्ट्रेलियांतील एका संस्थेनें त्यांना कांहीं टन गहूं पाठवण्याची तयारी दाखवली. ‘शांततेसाठीं हा गहूं पाठवीत आहोंत’ असें त्यांनीं कळवलें. आमटेजींनीं त्यांना लिहिलें, “तुमचा गहूं खायला असेल तोंवरच ही शांति टिकेल. गहूं संपला कीं, शांतता संपेल! तेव्हां गहूं पाठवण्याऐवजीं अशा तऱ्हेचा गहूं भरपूर निर्माण करण्याची कला आणि विज्ञान द्या. त्यांतूनच चिरआनंदमयी शांति निर्माण होईल. दान नाश करते, कर्तबगारीला संधि मिळण्यानें माणूस उभारणी करतो.”

आनंदवनांतील ही पुरुषार्थी रोगी माणसें आनंदानें धरतीमाय फुलवतांना पाहून निकोपांनीं स्फूर्ति घ्यावी, अशी त्यांची योजना आहे. वैज्ञानिक पद्धतीनें शेती करावी, उद्योगांची त्याला जोड द्यावी आणि त्यांतून उद्योगमय, समतानिष्ठ आणि कर्तबगारी फुलवणारा साम्ययोगी समाज निर्माण झालेला पहावा असें त्यांना वाटतें. सहकारी चळवळीचाहि ह्या कामीं हातभार लागेल असा त्यांचा विश्वास आहे. आज सहकारी चळवळीला कर्ज वाटणाऱ्या उदार सावकाराचें रूप आलें आहे! त्याऐवजीं सहकारी चळवळ म्हणजे आत्मकर्तृत्वाची बागशाही फुलवणारा अभिक्रम बनावा, असें त्यांना वाटतें. माणसांतली पुरुषार्थाची भावना जागी झाली कीं, लाचलुचपत, वशीलेबाजी, पक्षपात यांना जागाच रहात नाहीं. आपल्या बुद्धीवर आणि मनगटावर ज्यांचा विश्वास नसतो अशी आळशी, निर्बुद्ध

माणसेंच दुर्गुणांची वाढ करीत असतात. समाज-मंगल साधणाऱ्या साधनांनाहि अशीं माणसें विकृत करतात. ही स्थिति पालटावी आणि आनंदवन हें साम्ययोगी क्रांतीचें स्फूर्तिस्थान बनावें, अशीं स्वप्नें त्यांना पडत आहेत.

साम्य म्हणजे असेल तें वांटून सर्वांनीं दरिद्री बनणें नव्हे. साम्ययोग म्हणजे सहपुरुषार्थाच्या भावनेनें चैतन्यशील होऊन विपुल निर्माण करणें. साम्ययोग हा वैपुल्यांतच आकारास येतो. शेती आणि उद्योग या दोन पावलांनीं सारा समाज बदलतां येऊं शकेल, असें त्यांना वाटतें. जगभरचे लोक येतात आणि आनंदवनांतील हें वैभव पाहून आश्चर्यचकित होतात. उद्यांच्या नवभारताची झलक दाखविणारें हें आनंदवन आहे. तेथील तीं कर्तबगार माणसें आणि त्यांनीं फुलवलेलें कृषि आणि उद्योगाचें तें भांडार पाहिल्यावर लोक विचारतात, ' ती महारोग्यांची वसाहत कुठें आहे ? ' महारोग्यांसंबंधींच्या रूढ समाजकल्पनांतून असले प्रश्न विचारले जातात ! इथला महारोगी हा दीनदरिद्री, अपंग नाहीं, तो साम्ययोगी पुरुषार्थी सैनिक आहे.

आमटेजींचें एक आवडतें वाक्य आहे, " मी ईश्वराचा शोध घेऊं लागलों, पण तो मला गवसला नाहीं. मी आत्म्याच्या मागें लागलों तर त्यानें माझ्या हातावर तुरी दिली. पण मी माझ्या भावंडांत रमलों आणि मला देव गवसला, आत्मा लाधला आणि शिवाय भावाचाहि लाभ झाला. " आनंदवन एका बाजूला असेल, पण तिथल्या घामांत जीं फुलें फुललीं आहेत त्यांचा सुगंध भारतांतच नव्हे तर साऱ्या जगभर दरवळतो आहे. स्वतः कर्तबगारी दाखविणें ही थोरवी तर खरीच, पण इतरांची—विशेषतः अपंगांची कर्तबगारी फुलवणें हें धन्य काम आहे. आनंदवन ही एक देखणी पुरुषार्थ-यात्रा आहे.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
स्थळ ...... नों दि. 12-11-68
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 92808

३७३५५
२५.२॥
९२.१९९१८